मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | मंगळवार, २९ ऑक्टोबर २०२४ | वर्ष-२९ | अंक - १२९ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## आमचं घर कुणी फोडलं?



**बारामती :** बारामतीतून अर्ज दाखल केल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार आज भावुक झाल्याचं पाहायला मिळालं. पहिला फॉर्म मी भरणार होतो, असं म्हणत अजित पवारांनी उपस्थितांना भावनिक साद घातली. घरात एकोपा राहिला पाहिजे, आमचं घर कुणी फोडलं? असा भावनिक सवालही अजित पवारांनी यावेळी बारामतीकरांना केला. "माझी मागे चूक झाली, पण आता कोणी चूक केली. पहिला फॉर्म मी भरणार होतो. आम्ही सगळे तात्यासाहेब पवारांचं कुटुंब. आई सांगत होती, माझ्या दादाच्या विरोधात फॉर्म भरु नका. या पद्धतीने जे काही चाललं आहे ते बरोबर नाही. मोठ्या व्यक्तींनी यात मध्यस्थी करत बोलायला हवी होतं," असं अजित पवार म्हणाले.

सविस्तर वृत्त पान 6



शिंजो आबेंचा पक्ष 15 वर्षांनंतर बहुमतापासून दूर

पान 8

# खलाशाने तांडेलाचे डोके कापून बोट पेटवली




**प्रतिनिधी**
**देवगड**

कुणकेश्वर मंदिरासमोरील समुद्रामध्ये आज दुपारी 2 वा सुमारास सर्वांना हादरवणारी घटना घडली. रत्नागिरी, जयगड येथील पर्ससीन बोटीवरील खलाशांमध्ये झालेल्या वादामध्ये एका खलाशाने तांडेलचे डोकं कापून धडावेगळे केले. कापलेलं मुंडकं बोटीवरच ठेवून तिथेच आरोपी बसून राहिला. त्या आरोपीने बोटीवरील आणखी काही खलाशांवरही हल्ला केला. या घटनेने घाबरलेल्या खलाशांनी समुद्रात उड्या घेतल्या. तर आरोपी खलाशाने रागाने बोट पेटवून दिली. या घटनेने संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हा हादरला आहे.

देवगड येथील समुद्रात रत्नागिरी व आजूबाजूच्या परिसरातील मोठ्या प्रमाणावर बोटी मच्छीमारीसाठी आलेल्या होत्या. त्यातील राजीवडा येथील रफिक फणसोपकर यांची बोट ही मच्छीमारीसाठी देवगड समुद्रात आलेली होती. त्यावेळी त्या बोटीवरील खलाशांमध्ये वाद झाला त्यामध्ये आरोपी खलाशाने चक्क तांडेल याचे डोकं कापलं आणि ते त्याचं डोकं बोटीवर ठेवलं. खलाशी त्या कापलेल्या मुंडक्यासोबत तिथेच बसून राहिला. बोटीवरील आणखी काही खलाशांवरही त्याने हल्ला केला. या घटनेने बोटीवरील घाबरलेल्या खलाशांनी तात्काळ समुद्रात उड्या घेतल्या. त्यादरम्यानच आरोपी खलाशाने संपूर्ण बोटीला आग लावून दिली. त्या बोटीच्या आगीचे प्रचंड लोट तेथील समुद्रात पसरलेले दिसत होते. दरम्यान आजूबाजूला रत्नागिरीतील काही मच्छीमार बोटी होत्या त्यांनी बोटीवरच्या इतर जणांना वाचवण्याचा प्रयत्न केला.

पान 8 वर

# 'आपले सेवा केंद्रा'चा बोजा राज्यातील ३० हजार ग्रामपंचायतींवर

## शिंदे सरकारचा जाता-जात घेतलेला निर्णय ग्रामपंचायतींच्या मुळावर...

**सुनील ओसवाल**
**मुंबई**

राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये कार्यरत असणारे आपले सरकार सेवा केंद्रातील चालकांचे (ग्रामपंचायत) मानधन ग्रामपंचायत स्तरावरून अदा करण्याचा निर्णय शासनाने नुकताच घेतला आहे. या निर्णयामुळे कमी महसूल असलेल्या ग्रामपंचायतींच्या अडचणीत भर पडणार आहे.या निर्णयामुळे राज्यातील सुमारे 30 हजार आर्थिक भार पडणार असल्याने अनेक ग्रामपंचायतींना आर्थिक गणिते जुळवताना कसरत करावी लागणार आहे. दोन लाखाच्या आतील उत्पन्न असणाऱ्या ग्रामपंचायतीची अडचण येणार असल्याचे दिसून येते.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे पंचायतराज संस्थांच्या कारभारामध्ये पंचायत प्रकल्पांतर्गत एकसूत्रता व पारदर्शकता आणणे, नागरिकांना विविध प्रशासकीय विभागांतर्गत आवश्यक असलेले सेवा दाखले, त्यांच्या रहिवास क्षेत्रात कालबद्ध स्वरूपात मिळणे, इतर व्यावसायिक सेवा, बँकिंग सेवा ग्रामीण जनतेला एकाच ठिकाणी मिळाव्यात, या हेतूने 11 ऑगस्ट 2016 च्या शासन निर्णयान्वये राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये 'आपले सरकार सेवा केंद्र'स्थापन करून हा प्रकल्प केंद्र शासन प्रेरित कंपनीमार्फत राबवण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार कंपनीबरोबर करार करण्यात आला होता. 14 व्या वित्त आयोगाची मुदत संपल्यानंतर या करारास मुदतवाढ देण्यात आली होती. हा करार 30 जून 2024 ला संपला होता. संबंधित कंपनीची उच्चाधिकार समितीच्या मान्यतेने या प्रकल्पासाठी निवड करण्यात आली. मात्र, कंपनीने हा प्रकल्प चालवण्यास

पान 8 वर

### *लहान ग्रामपंचायतींना फटका*

*सरकारच्या या निर्णयाचा कमी लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायतींना बसण्याची शक्यता आहे. ज्या ग्रामपंचायतींचे वार्षिक उत्पन्न दोन लाखांच्या आत आहे, अशा ग्रामपंचायतींची या निर्णयाची अंमलबजावणी करताना कसरत होणार आहे. हातावर मोजता येतील अशा ग्रामपंचायतींची कर वसुली शंभर टक्के होत असते. प्रत्यक्ष येणारा कर आणि केंद्रचालकाला द्यावयाचे मानधन याचा मेळ बसणे शक्य होईल, असे वाटत नाही.*

### *मानधन खर्च माथी*

*ग्रामपंचायतींमध्ये कार्यरत आपले सरकार सेवा केंद्र चालकांना यापूर्वी शासनाच्या माध्यमातून मानधन दिले जात होते. यासाठी शासनाला कोट्यवधी रुपयांच्या निधीची तरतूद करावी लागत होती. मात्र, आता लाडकी बहीण योजनेसाठी सरकारच्या तिजोरीवर महिन्याला सुमारे चार हजार कोटींचा भार पडत आहे. त्यामुळे राज्य सरकारने केंद्र चालकांचे मानधन ग्रामपंचायतींच्या माथी मारल्याचा आरोप अनेक ग्रामपंचायत पदाधिकारी करत आहेत.*

# भाजपची 25 उमेदवारांची तिसरी यादी 3 आमदारांचं तिकीट कापलं!

## फडणवीसांचे तिसरे पीए होणार आमदार

**प्रतिनिधी**
**मुंबई**



भाजपानं आज तिसरी यादी 25 उमेदवारांची जाहीर केली. त्यामुळे आता महायुतीमध्ये भारतीय जनता पक्षाकडून 146 उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. विशेष म्हणजे मोर्शी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून देवेंद्र भुयार यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आता भाजपानंही या मतदारसंघातून उमेश यावलकर यांना उमेदवारी दिली आहे.

भाजपाने आज जाहीर केलेल्या उमेदवार यादीमध्ये तीन विद्यमान आमदारांची तिकिटं कापल्याचं दिसून येत आहे. त्यात आर्णीतून संदीप दुर्वे यांच्याऐवजी राजू तोडसाम तर नागपूर मध्यमधून विकास कुंभारे यांच्याऐवजी प्रवीण दटके यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. आर्वीतून दादाराव केचे यांच्याऐवजी सुमीत वानखेडे यांना तिकीट देण्यात आलं आहे. सुमीत हे देवेंद्र फडणवीस यांचे स्वीय सहाय्यक आहेत. अभिमन्यू पवार, श्रीकांत भारतीय यांच्यानंतर सुमीत हे आमदार होणारे फडणवीसांचे तिसरे स्वीय सहाय्यक ठरणार आहेत.

# भाजपने अखेर मित्रपक्षांना सोडल्या 4 जागा

**प्रतिनिधी**
**मुंबई**

भाजपने आतापर्यंत राज्यात 146 उमेदवार जाहीर केले आहेत. त्यानंतर भाजपने त्यांच्या कोट्यातून 4 जागा मित्रपक्षांना सोडल्या आहेत. भाजपने 4 जागा सोडून मित्रपक्षांची नाराजी दूर केल्याचं बोललं जात आहे.

भाजपने अमरावतीच्या बडनेरामध्ये रवी राणा यांना पाठिंबा जाहीर केला आहे. तर गंगाखेडमध्ये राष्ट्रीय समाज पक्षाच्या रत्नागर गुट्टे यांना समर्थन जाहीर केलं आहे. तर मुंबईतील कलिना विधानसभा मतदारसंघ रिपब्लिकन पक्षाला सोडला आहे. तसेच धारावी मतदारसंघातून रिपब्लिकनच्याच उमेदवाराला भाजप पाठींबा देणार आहे. त्याचबरोबर भाजपने शाहूवाडीतून जनसुराज्य शक्ती पक्षाच्या विनय कोरे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. भाजपने युवा स्वाभिमानी पक्ष, राष्ट्रीय समाज पक्ष, रिपाईं, जनसुराज्य शक्ती पक्ष या पक्षांना जागा सोडल्या.

## म ह त्वा चे

### टायगर अभी जिंदा है ! आजपासून आचारसंहिता मोडतोय...



**संगमनेर :** गेल्या दोन दिवसांपासून विखे आणि थोरात या दोन्ही नगरी कुटुंबातील वाद शिगेला पोहोचला असून समर्थकही एकमेकांविरोधात भिडले आहेत. माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी काल संगमनेर तालुक्यात जहाल भाषण केलं. टाळ्या, शिट्ट्यांच्या कडकडाटात सुजय विखेंचं भाषण रंगलं होतं. त्यातच, त्यांनी आचारसंहिता मोडत असल्याची थेट भाषा केली. जयश्री थोरात आणि सुजय विखे यांच्यामध्ये घमासान शाब्दिक युद्ध रंगलं आहे. सुजय विखे म्हणाले, "तुम्ही आमच्यावर आरोप करता. आमची सहनशीलता आमची कमजोरी समजू नका. आज या तारखेपासून मी आचारसंहिता मोडत आहे. जर उद्या कोणीही पातळी सोडून राधाकृष्ण विखे पाटलांविरोधात बोललं तर याद राखा 'टायगर अभी जिंदा है', असा धमकीवजा इशाराच त्यांनी विरोधकांना दिल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

### लफंग्यांना दिलेले चिन्ह गोठवा आणि मैदानात उतरा!



**मुंबई :** मुख्यमंत्रीपद भूषवणाऱ्या व्यक्तीलाही शक्तीप्रदर्शन करावे लागते, यातच त्यांची भीती स्पष्ट दिसून येत आहे, अशा शब्दांत शिवसेना खासदार संजय राऊत यांनी शिंदे सेनेला चांगलेच फटकारले. तसेच हिंमत असेल तर चोरांना आणि लफंग्यांना दिलेले शिवसेनेचे चिन्ह गोठवा आणि मैदानात उतरा,असे थेट आव्हानही संजय राऊत यांनी दिले. महायुतीत तीनपेक्षा जास्त चेहरे आहेत. सध्याच्या मुख्यमंत्र्यांचा चेहरा त्यात नसून इतरांचे चेहरे आहेत. भाजपवाले नेपाळ, म्यानमार, श्रीलंकाही जिंकू शकतात. ज्यांच्या हातात प्रचंड पैसा आणि त्यांच्या हातात ईव्हीएमची सुत्रे आहेत. ते कोठेही जिंकू शकतात. आपल्या छातीवर आणि मुलांच्या डोक्यावर हात ठेवत त्यांनी हिरयाणा कसे जिंकले, ते सांगावे. महाराष्ट्रात ते कोणत्या पद्धतीने लढत आहेत, तेदेखील त्यांनी सांगावे. शिवसेना, राष्ट्रवादी फोडत त्यांनी सत्ता मिळवली. फोडा, झोडा राज्य करा, ही त्यांची भूमिका आहे. त्यांच्यात लढण्याची हिंमत असेल तर सर्वात आधी त्यांनी चोरांना आणि लंफग्यांना दिलेले शिवसेनेचं चिन्ह गोठवावे आणि मैदानात उतरावे, असे आव्हानही संजय राऊत यांनी दिले.

### दानवेंच्या कन्येला शिंदे सेनेची उमेदवारी

**मुंबई :** शिंदे सेनेकडून उमेदवारांची तिसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. यात रावसाहेब दानवे यांच्या कन्या संजना जाधव यांना कन्नड विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. तर दोन जागा मित्र पक्षांना सोडण्यात आल्या आहेत. यापैकी हातकणंगलेची जागा जनसुराज्य पक्षाला, तर शिरोळची जागा शाहुविकास आघाडीला सोडण्यात आली आहे. दरम्यान, कालच शिवसेनेने 20 उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली होती.

# उद्धव ठाकरे 'देव', शिंदेंकडून घात !

## आ. वनगांच्या आत्महत्येच्या इशाऱ्यामुळे खळबळ

**प्रतिनिधी**
**पालघर**

राज्यात विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरु झाली आहे. सर्वच पक्षांनी जवळपास सर्व उमेदवार जाहीर केले आहेत. पालघर विधानसभेची जागा शिवसेनेसाठी महत्त्वाची जागा आहे. मात्र शिवसेनेत फूट पडल्यानंतर ही जागा कोणाच्या खात्यात जाणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार होते. दरम्यान पालघरचे विद्यमान आमदार श्रीनिवास वनगा यांचं तिकीट कापण्यात आले आहे. एकनाथ शिंदे यांच्या बंडात सहभागी झालेल्या 40 पैकी 39 जणांना उमेदवारी देण्यात आली. मात्र श्रीनिवास वनगा यांना डावलले आहे. पालघरमध्ये उद्धव ठाकरे यांची शिवसेना विरुद्ध एकनाथ शिंदे यांची



शिवसेना यांच्यात लढत पाहायला मिळणार असे वाटत होते, पण भाजपाने तेथून माजी खासदार राजेंद्र गावित यांना उमेदवारी दिली आहे.

एकनाथ शिंदे यांच्या बंडात साथ देणारे श्रीनिवास वनगा यांना तिकीट नाकारल्यानंतर मोठा धक्का बसला. माध्यमांशी बोलताना श्रीनिवास वनगा यांनी सांगितलं की, मी प्रामाणिकपणे काम करत असताना सर्वांनी ठरवून माझी उमेदवारी डावलली, त्यांनी सर्वांनी माझा घात केला. उद्धव ठाकरे माझ्यासाठी देव आहेत, त्यांची मला माफी मागायची आहे. वनगा हे रडताना दिसले. तिकीट कापल्याचा मोठा धक्का वनगा यांना बसला असून त्यांनी अन्न-पाण्याचा त्याग केला असल्याचे त्यांच्या पत्नीने माध्यमांना सांगितले आहे. खरं तर महायुतीमध्ये पालघरच्या जागेवर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडून राजेंद्र गावित यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. पालघरच्या जागेवर श्रीनिवास वनगा यांना येथून उमेदवारी नाकारण्यात आल्यानंतर डिप्रेशनमध्ये गेल्याची माहिती त्यांच्या पत्नी सुमन वनगा यांनी दिली आहे.

# जम्मू-कश्मीरमध्ये तीन दहशतवाद्यांचा खात्मा

**वृत्तसंस्था**
**श्रीनगर**

भारतीय लष्करांच्या रुग्णवाहिकेवर झालेल्या हल्ल्यानंतर सुरक्षा दलांनी तीन दहशतवाद्यांचा खात्मा केला असल्याची घटना जम्मू-काशमीरच्या अखनूर येथे घडली. सोशल मीडियावर तीन दहशतवाद्यांचे फोटो व्हायरल होत आहेत. आज सकाळी सातच्या सुमारास झालेल्या हल्ल्यानंतर लष्कराने घटनास्थळाला वेढा घालत कारवाईला सुरुवात केली.

दहशतवाद्यांना ठार केल्यानंतर सुरक्षा दलांनी त्यांच्या तपासावेळी काही शस्त्रे, दारुगोळा जप्त केला



आहे. तसेच लष्करांची कारवाई अद्यापही सुरु आहे. तसेच जम्मू-काश्मीर येथील अखनूर विभागात दहशतवाद्यांचे वाहन भटाल भागातील शिव मंदिराजवळून जात असताना त्यांना लक्ष्य केले गेले होते. यावेळी दहशतवाद्यांनी रुग्णवाहिकेवर गोळीबार केला.

दरम्यान, सध्या जम्मू-काश्मीर येथे उमर अब्दुल्ला मुख्यमंत्री आहेत. उमर अब्दुल्लांचे सरकार आल्यानंतर पुन्हा एकदा जम्मू-काश्मीर येथे दहशतवादाचे सावट निर्माण झाले आहे. काही दिवसांआधी दहशतवाद्यांनी लष्करांच्या गाडीवर हल्ला केला होता. यामध्ये काहीजण ठार झाले होते. तसेच काही दिवसांआधी बिहारचा एक युवक जम्मू येथे रोजगारासाठी गेला होता. त्यावेळी त्याच्यावर हल्ला करत त्याला ठार मारण्यात आले होते.

# मी मुख्यमंत्री नाही पण उपमुख्यमंत्री होणार...

**प्रतिनिधी**
**कागल**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा जोरदार प्रचार सुरु आहे. दरम्यान, अजित पवारांचा पक्ष दोन-दोन उपमुख्यमंत्रिपदे मिळावी यासाठी प्रयत्न करत असल्याची चर्चा रंगू लागली आहे. या पक्षातील वरिष्ठ नेते हसन मुश्रीफांच्या एका वक्तव्यामुळे या चर्चांनी जोर धरला आहे.

"महाराष्ट्रात महायुतीची सत्ता आल्यास मी उपमुख्यमंत्री होईन", असं वक्तव्य राज्याचे



वैद्यकीय शिक्षणमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार) कागल विधानसभेचे आमदार हसन मुश्रीफ यांनी केलं आहे. कागलमधील एका प्रचारसभेत बोलत असताना मुश्रीफांनी हे वक्तव्य केलं आहे.

पान 8 वर

# 2 जागा, 1 कॅबिनेट, 4 महामंडळे...

## महायुतीकडून रामदास आठवलेंची नाराजी दूर?

**प्रतिनिधी**
**मुंबई**



महायुतीच्या जागावाटपात रामदास आठवलेंच्या आरपीआय पक्षाने 21 जागांची मागणी केली होती. महायुतीच्या प्रमुख पक्षांच्या जागावाटपात आठवले यांच्या पक्षाला एकही जागा मिळाली नव्हती. त्यामुळे आठवले गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी होती. त्यांच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन करून नाराजी व्यक्त केली. त्यांनत आज सोमवारी आठवले गटाला महायुतीला दोन जागा सुटल्याची माहिती मिळत आहे. मुंबईतील धारावी आणि कलिना विधानसभा मतदारसंघ आरपीआय पक्षाला मिळाल्याची माहिती केंद्रीय मंत्री आठवले यांनी दिली आहे.

महायुतीची सत्ता आल्यानंतर एक विधानपरिषद सदस्यत्व, राज्यात एक कॅबिनेट मंत्रिपद आणि 4 महामंडळ अध्यक्षपदे आणि महामंडळ

पान 8 वर

### *कलिनामधून सिंह तर धारावीमधून कासारे किंवा वानखेडे ?*

*कलिना मतदारसंघातून अमाजित सिंह यांना रिपब्लिकन पक्षाची उमेदवारी जाहीर करण्यात आली असून उद्या धारावीमधून रिपब्लिकन पक्षाचे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे किंवा समीर वानखेडे यांच्या पैकी कोणाला उमेदवारी द्यायची याचा निर्णय घेण्यात येईल असे ना.रामदास आठवले यांनी आज सांगितले.*

# तनवाणींच्या माघारीमुळे ठाकरे सेना तोंडघशी

**प्रतिनिधी**
**संभाजीनगर**



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे संभाजीनगर मध्य मतदारसंघाचे उमेदवार किशनचंद तनवाणी पक्षाला तिकीट परत केले आहे. त्यामुळे ऐन निवडणुकीच्या तोंडावर ठाकरेंच्या पक्षाला जोरदार धक्का बसला असून ठाकरे सेनेला आता एका दिवसात नवीन उमेदवार उभा करावा लागणार आहे.

या मतदारसंघातून शिवसेनेच्या एकनाथ शिंदे यांच्या पक्षाकडून प्रदीप जैस्वाल यांना तिकीट मिळाले आहे. तर उद्धव ठाकरेंनी किशनचंद तनवाणींना उमेदवारी दिली होती. मात्र, आता तनवाणी यांनी माघार जाहीर केली आहे. तनवाणींच्या या निर्णयानंतर पक्षाकडून त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्यात आली असून पक्षाने त्यांना जिल्हाप्रमुख पदावरुन मुक्त केले आहे.

# 'टाटा एअरबस'चे मोदी आणि सांचेझ यांच्या हस्ते उद्घाटन

**वृत्तसंस्था**
**गांधीनगर**

स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ सध्या भारताच्या दौऱ्यावर आहेत. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमावेत गुजरात मध्ये ते विविध प्रकल्पांचे उद्घाटन करणार आहेत. या दरम्यान, त्यांनी वडोदरा येथील टाटा एरक्राफ्ट कॉम्पलेक्सचे उद्घाटन देखील केले. या एरक्राफ्ट कॉम्पलेक्समध्ये सी 295 प्रोग्रामच्या अंतर्गत 40 वाहतूक विमानांची निर्मीती भारतात होणार आहे.

सी 295 प्रोग्रामच्या अंतर्गत भारताला स्पेन कडून 16 विमानं मिळणार असून, उरलेल्या 40 विमानांची निर्मिती भारत करणार आहे. भारतीय सैन्यासाठी खासगी क्षेत्रामार्फत केलेली ही पहिलीच भारतीय निर्मिती आहे. यामध्ये निर्मितीपासून ते



चाचणी, डीलव्हरी, आणि विमानाच्या संपूर्ण मेंटेनंसची खबरदारी या टाटा एअरक्राफ्ट कॉम्पलेक्समध्ये घेण्यात येईल. या उद्घाटनाच्या वेळीस पंतप्रधान मोदी म्हणाले " टाटा एअरक्राफ्ट कॉम्पलेक्सच्या माध्यमातून भारत आणि स्पेन यांच्या मैत्री अधिक दृढ होणार आहे. मेक इन इंडीया आणि मेक फॉर वलर्डच्या दिशेने घेतलेली ही यशस्वी झेप आहे ."

रतन टाटा यांच्या विषयी बोलताना मोदी म्हणाले, "नुकतेच आपण देशाचे महान सुपुत्र रतन टाटा जी यांना गमावले. आज तो आपल्यात असते तर त्यांना आनंद झाला असता. कार्यक्रमाच्या वेळीस 2012 सालीच ही कल्पाना रतन टाटा यांनी मांडली होती याचा आवर्जून उल्लेख केला. " या प्रकल्पाची मूळ कल्पना एका दशकाहून अधिक काळापूर्वी, 2012मध्ये टाटा सन्सचे तत्कालीन अध्यक्ष, रतन टाटाजी यांनी मांडली होती. एअरबसशी संबंधीत निर्मीतीचे संकल्पनेचे नेतृत्व टाटा यांनी केले. आज हा प्रकल्प उभा राहतो आहे तो टाटा यांनी केलेल्या पायाभरणी मुळे. या अत्यंत पथदर्शी उपक्रमात त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वासाठी मी त्यांचे स्मरण करू इच्छितो."

### टाटा म्हणजे शिखररत्न !

स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ म्हणाले, आज या उपक्रमामुळे, युरोपच्या इतर कंपन्यांसाठी भारताचे समृद्ध दालन खुले होईल. या प्रकल्पामुळे दोन वेगळ्या देशांतील समृद्ध गोष्टींचा संगम होईल. टाटा म्हणजे औद्योगिक सामर्थ्याचे प्रतिक आहे. टाटा कंपनीचे प्रोडक्टस जगाच्या बाजारपेठेत लोकांसाठी उपलब्ध असतात. टाटा म्हणजे जणू एखादे शिखररत्न आहेत. हा प्रकल्प म्हणजे दोन्ही देशांमधील विश्वासार्हता आणि धोरणात्मक भागीदार म्हणून संबंध मजबूत करण्याची संधी आहे.

*मुंबई : मालाड पश्चिम विधान सभा मतदारसंघातील भाजपा उमेदवार विनोद शेलार यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यावेळी केंद्रिय मंत्री पीयूष गोयल आणि माजी खासदार गोपाळ शेट्टी त्यांच्यासोबत उपस्थित होते.*



## थोडक्यात

### पराग शाह आज उमेदवारी अर्ज भरणार



**मुंबई:** विधानसभा निवडणूक अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस असल्याने सर्वच राजकीय पक्ष आणि अपक्ष उमेदवार आपला अर्ज भरणार आहेत. मुंबईतील सर्व चित्र आता स्पस्ट झाले असून सर्वत्र उमेदवार जाहीर झाले आहेत. घाटकोपर पूर्व येथील भाजपा उमेदवाराची प्रतीक्षा संपली असून येथील आमदार पराग शाह यांचे नाव जाहीर करण्यात आले आहे. 170- घाटकोपर पूर्व विधानसभा भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आर. पी. आय. महायुती उमेदवार पराग शाह यांचा उमेदवारी अर्ज आज मंगळवार दिनांक 29 ऑक्टोबर 2024 रोजी भरण्यात येणार असून दुपारी 12 वाजता स्टारबक्स समोर, 60 फीट रोड, घाटकोपर (पूर्व) येथून अर्ज भरण्यासाठी भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते या रॅली मध्ये वाजत गाजत सहभागी होणार आहेत.

### मुंबई पोलिसांकडून वर्षभरात 485 कोटींचे अंमलीपदार्थ जप्त

**मुंबई:** गेल्या दोन वर्षांत मेफेड्रोनचे (एमडी) सातहून अधिक कारखाने उद्ध्वस्त करणाऱ्या मुंबई पोलिसांनी पहिल्या नऊ महिन्यांत ४८५ कोटींचे अमलीपदार्थ जप्त केले आहेत. याप्रकरणी ८६० गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यात १०१० आरोपींना अटक करण्यात आले आहे. यावर्षी सर्वाधिक म्हणजे साडेचारशे कोटी रुपयांचे एमडी पोलिसांनी विविध कारवायांमध्ये जप्त केले आहे. गेल्यावर्षी याच कालावधीत केवळ ६२ कोटी रुपये किमतीचे अमलीपदार्थ जप्त करण्यात आले होते.मुंबई पोलिसांच्या कारवाईत अंमलीपदार्थांचे सेवन करणाऱ्या ५०९० व्यक्तींना अटक करण्यात आली आहे.

### चोपड्यातून ठाकरे सेनेचा उमेदवार बदलला

**मुंबई:** मुंबई महानगरपालिकेतील शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) यांनी स्वेच्छा निवृत्ती घेऊन शिवसेना उबाठा मध्ये प्रवेश केला होता व त्यांना शनिवारी चोपडा येथील उमेदवारीही देण्यात आली होती. पण काल त्यांची उमेदवारी रद्द करून त्यांच्या ऐवजी प्रभाकर सोनवणे यांना संधी देण्यात आली. चोपडा मतदार संघात राजू तडवी यांच्या उमेदवारीला जोरदार विरोध झाल्याने त्यांची उमेदवारी रद्द केल्याची चर्चा आहे. भाजपच्या प्रभाकर सोनवणे यांनी काल ठाकरे गटात पक्ष प्रवेश केला व त्यांना लगेच चोपडा येथून उमेदवारी देण्यात आली आहे. याअगोदर राजू तडवी यांच्या नावाची घोषणा झाली होती त्यामुळे तडवी यांची नोकरीही गेली आणि मिळालेली उमेदवारीही गेली आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## वसई-नालासोपारा-बोईसर निवडणुकीची रणधुमाळी

# आ. ठाकूर पिता -पुत्र आणि पाटलांचा विजयासाठी उमेदवारी अर्ज दाखल



**प्रतिनिधी**
■ **वसई**

आगामी विधानसभा निवडणुकीत वसई तालुक्यात प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे. वसई विधानसभेच्या सातव्या विजयासाठी आ. हितेंद्र ठाकूर, नालासोपारातील चौथ्या विजयासाठी आ. क्षितिज ठाकूर आणि बोईसरमधून दुसऱ्यांदा विजय मिळवण्यासाठी राजेश पाटील यांनी सोमवारी त्यांच्या कार्यकर्त्यांच्या उत्साही गर्दीत आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

वसई, नालासोपारा आणि बोईसर या तीन विधानसभा मतदारसंघांत उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सोमवारी उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांनी तहसील कार्यालयाच्या परिसरात प्रचंड गर्दी केली होती. वसई येथे आ. हितेंद्र ठाकूर यांनी भव्य मिरवणुकीने येऊन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्या सोबत त्यांची पत्नी आणि माजी महापौर प्रविणा ठाकूर, बविआचे ज्येष्ठ नेते बबनशेठ नाईक, माजी महापौर नारायण मानकर, प्रविण शेट्टी, आणि अजीव पाटील उपस्थित होते.

दुपारी नालासोपारा विधानसभा मतदारसंघात आ. क्षितिज ठाकूर यांच्या समर्थनार्थ हजारो कार्यकर्त्यांची भव्य रॅली काढण्यात आली. बविआ भवनपासून म्हाडा कॉलनीपर्यंत काढण्यात आलेल्या या रॅलीत बाईकस्वार आणि सुमारे ४०० वाहनांचा ताफा सहभागी झाला. ढोलताशा, बेंजो, आणि कच्चीबाजा यांच्या गजरात परिसर गजबजून गेला. यावेळी क्षितिज ठाकूर यांच्यासोबत त्यांची आई प्रविणा ठाकूर, माजी खासदार बळीराम जाधव, तसेच अनेक आजी-माजी नगरसेवक आणि सभापती उपस्थित होते.

अर्ज दाखल करण्याचा मंगळवार हा अंतिम दिवस असून आजही अशाच प्रकारे मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे.

## 'तिकीटासाठी पक्षांतराची दौड'

# राजेंद्र गावितांच्या बदलत्या राजकीय निष्ठेवर मतदार संतप्त

**प्रतिनिधी**
■ **वसई**

पालघर जिल्ह्यात माजी खासदार राजेंद्र गावित यांच्या सातत्याने बदलत्या राजकीय भूमिकांवर मतदारांमध्ये तीव्र नाराजीचा सूर आहे. विधानसभा आणि लोकसभेतील तिकीट मिळवण्यासाठी गावित यांनी अनेकवेळा पक्षांतर केल्याने त्यांची 'पक्षांतराची दौड' चर्चा आणि टीकेचा विषय ठरली आहे. आता पुन्हा एकदा त्यांनी भाजपातून शिंदे गटात प्रवेश केला असून, त्याचा रोष मतदारांमध्ये दिसून येतो आहे.

गेल्या काही वर्षांत गावित यांचा राजकीय प्रवास विविध पक्षांतून होत असल्याचे दिसले आहे. 2018 मध्ये पालघर लोकसभा पोटनिवडणुकीत त्यांनी भाजपात प्रवेश केला आणि विद्यमान खासदार श्रीनिवास वनगा यांना मागे टाकत लोकसभा तिकीट मिळवले होते. 2019 मध्ये शिवसेना-भाजप युती झाल्यावर, पालघर लोकसभा जागा शिवसेनेला मिळाल्याने गावित यांनी भाजप सोडून शिवसेनेत प्रवेश केला. त्यावेळीही त्यांनी श्रीनिवास वनगा यांना बाजूला करत शिवसेनेच्या तिकीटावर निवडणूक लढवली आणि विजय मिळवला.

मात्र सध्याच्या निवडणुकीत भाजपाने पालघर लोकसभा मतदारसंघात तिकीट नाकारल्याने गावित यांनी विधानसभा निवडणुकीकडे वळण्याचा निर्णय घेतला. त्यांनी शिंदे गटाच्या विद्यमान आमदार श्रीनिवास वनगा यांना बाजूला करत आपला दावा केला. या अखेरच्या पक्षांतरामुळे पालघर मतदारसंघातील शिवसैनिकांतही नाराजीचे वातावरण पसरले आहे.

***पालघरमध्ये नाराजीचे वातावरण***

*गावित यांच्या वारंवार होणाऱ्या पक्षांतरामुळे मतदारांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. त्यांच्या या निष्ठा बदलण्याच्या निर्णयामुळे गावित यांना आगामी विधानसभा निवडणुकीत मतदारांचा रोष सहन करावा लागेल, असे स्थानिक राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे.*

# नालासोपारातील 41 अनधिकृत इमारतींना तात्पुरता दिलासा

## निवडणूक आयोगाच्या हिरव्या कंदीलची प्रतीक्षा

**प्रतिनिधी**
■ **वसई**

नालासोपारामध्ये बांधलेल्या 41 अनधिकृत इमारतींवर कारवाईसाठी 31 ऑक्टोबर ही अंतिम मुदत देण्यात आली होती. आणि या मुदतीनंतर कोणत्याही क्षणी त्या इमारतींवर कारवाई होण्याची शक्यता होती. मात्र, सद्याच्या निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे या कारवाईला थोडा वेळ लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे त्या इमारतींमधील रहिवाशांना सध्या तात्पुरता दिलासा मिळाला आहे.

या इमारतींच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निष्कासनाचा आदेश दिला असून इमारतीतील सुमारे तीन हजार कुटुंबांना घरे खाली करण्यासाठी 31 ऑक्टोबरपर्यंतची मुदत होती.परंतू , आचारसंहितेच्या काळात कोणतीही कायदेशीर कारवाई करण्यासाठी निवडणूक आयोगाची परवानगी आवश्यक आहे. त्यामुळे आचारसंहितेच्या संवेदनशील काळात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी निवडणूक आयोगाकडून हिरवा कंदील मिळेपर्यंत ही कारवाई थांबविण्यात आली आहे.

बहुजन विकास आघाडीचे माजी नगरसेवक सिताराम गुप्ता यांनी आरक्षित भूखंडांवर या 41 अनधिकृत इमारती उभारल्या असून यामुळे सुमारे तीन हजार कुटुंबांची फसवणूक झाली आहे. पालिकेने या कारवाईसाठी निवडणूक आयोगाच्या परवानगीसाठी पत्रव्यवहार केला आहे. आता निवडणूक आयोग या प्रकरणी काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

*मुंबई : मुंबई महापालिकेचे माजी शिक्षणाधिकारी राजू तडवी यांनी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश करून चोपडा विधानसभा मतदारसंघात उमेदवारी मिळवली आहे . उद्धव ठाकरे यांनी राजू तडवी यांना एबी फॉर्म दिला असून चोपडा विधानसभा मतदारसंघाचे ते उमेदवार असतील .काही दिवसापूर्वीच राजू तडवी यांनी मुंबई महापालिका शिक्षण अधिकारी पदावरून स्वेच्छा निवृत्ती घेतली आणि आपली राजकीय कारकीर्द सुरू केली आहे.*



# मविआ सत्तेत आल्यानंतर मुंबई पब्लिक स्कुल मॉडेल राज्यभर राबवा - आ. रईस शेख

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

समाजवादी पक्षाचे भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख यांनी शिवसेना नेते माजी मंत्री आणि आमदार आदित्य ठाकरे यांची भेट घेऊन महाविकास आघाडी सरकार सत्तेत आल्यावर मुंबई पब्लिक स्कुल मॉडेल राज्यभर महाराष्ट्र पब्लिक स्कूल या नावाने राबविण्याची मागणी केली. तसेच त्याची सुरवात भिवंडीतून करण्याचीही मागणी शेख यांनी केली. यावेळी आदित्य ठाकरे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे रईस शेख यांनी सांगितले.

शेख यांनी मातोश्री निवासस्थानी आदित्य ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान विविध सामाजिक आणि राजकीय विषयांवर चर्चा झाल्या. त्यामध्ये त्यांनी भिवंडी मध्ये २२/६२ क्रमांकाच्या शाळेचा पुनर्विकास करून ठाणे जिल्ह्यातील पहिली डिजिटल शाळा निर्माण केली याबाबतही चर्चा केली.

आदित्य ठाकरे यांच्या पुढाकाराने बृहन्मुंबई महापालिका शाळांमध्ये 'मुंबई पब्लिक स्कूल' (एमपीएस) मॉडेल राबविले गेले. या मॉडेलमुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इंग्रजी शाळांमध्ये २७ टक्के तर पूर्व प्राथमिक वर्गात १२५ टक्के विद्यार्थी प्रवेश वाढले होते. बृहन्मुंबई महापालिकेच्या शाळांकडे विद्यार्थी व पालकांचा कमी झालेला ओघ पुन्हा वाढला आहे, असेही शेख यांनी नमूद केले.

या विधानसभा निवडणुकीनंतर 'मविआ'ची सत्ता राज्यात येईल. आगामी सरकारमध्ये आदित्य ठाकरे धोरणकर्त्यांची भूमिका बजावतील. त्यामुळे बृहन्मुंबई महापालिका शाळांमध्ये राबवलेले 'मुंबई पब्लिक स्कूल' मॉडेल राज्यातील सर्व सरकारी शाळांमध्ये 'महाराष्ट्र पब्लिक स्कूल' या नावाने राबवावे. आपण मुंबईत यशस्वीरीत्या राबविलेल्या नावीन्यपूर्ण असा उपक्रम राज्यभर विस्तारित करणे गरजेचे आहे. महविकास आघाडीचे सरकार आल्यावर आपण ह्या नावीन्यपूर्ण उपक्रमाचा प्राधान्याने विस्तार करावा आणि त्याचा प्रारंभ भिवंडीतून करावा, अशी मागणी केल्याचे शेख यांनी नमूद केले.

# नालासोपाऱ्यात काँग्रेसचा 'उत्तर भारतीय मास्टरस्ट्रोक' उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसैनिकांत अस्वस्थता

**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसई विधानसभा पाठोपाठ नालासोपारा मतदारसंघातील उमेदवारीच्या वाटपावरून शिवसेना (ठाकरे गट) आणि काँग्रेस यांच्यात तणाव निर्माण झाला आहे. ठाकरे गटाचा मजबूत आधार असलेल्या नालासोपारा मतदारसंघात काँग्रेसने उमेदवारी मिळवल्याने शिवसैनिकांत नाराजी पसरली आहे. काँग्रेसने महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पाटोळे यांच्या स्वीय सहाय्यक संदीप पांडे यांना नालासोपारा मतदारसंघातून उमेदवारी देत उत्तर भारतीय कार्ड खेळले आहे. मात्र वसईकर आणि स्थानिक कार्यकर्त्यांचे लक्ष या खेळीच्या यशस्वीतेकडे लागले आहे.

नालासोपाऱ्यात ठाकरे गटाचे पंकज देशमुख यांच्यासारखा लोकप्रिय चेहरा असताना काँग्रेसच्या उमेदवाराला प्राधान्य दिल्यामुळे शिवसैनिक अस्वस्थ झाले आहेत. शिवसेनेची वसई, नालासोपारा, बोईसर आणि पालघर या मतदारसंघांमध्ये परंपरागत पकड असताना यावेळी त्यांना फक्त बोईसर व पालघरमध्ये उमेदवारी मिळाली आहे, त्यामुळे नाराजी वाढली आहे.

शिवसैनिकांना आता काँग्रेस उमेदवाराच्या प्रचारात उतरावे लागणार आहे, ज्यात उत्तर भारतीय चेहऱ्याचा समावेश आहे.

***नालासोपाऱ्यात रंगणार चौरंगी लढत***

*नालासोपारा मतदारसंघात बहुजन विकास आघाडीचे विद्यमान आमदार क्षितीज ठाकूर, भाजप-महायुतीचे राजन नाईक, काँग्रेस-महाविकास आघाडीचे संदीप पांडे आणि स्वराज अभियानचे संस्थापक धनंजय गावडे अशी चौरंगी लढत होणार आहे. गावडे यांच्या अपक्ष उमेदवारीमुळे मतविभाजनाचा अंदाज बांधला जात आहे.तर महाविकास आघाडीचे उत्तर भारतीय कार्ड यशस्वी होते की नाही, हे पाहणे रंजक ठरणार आहे.*

# माऊंट मेरी नागरी सहकारी पतपेढीचा रौप्यमहोत्सवी वर्धापनदिन उत्साहात साजरा



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

माऊंट मेरी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित या पतपेढीने साल २०२४ मध्ये रौप्य महोत्सवी वर्ष साजरे केले नुकताच रंगशारदा सभागृहात रौप्य महोत्सवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सुरेल जीवन गाणी, नृत्य तसेच मान्यवरांच्या व सभासदांच्या उपस्थिश्री विनायक राऊत (शिवसेना सचिव माजी खासदार सिंधुदुर्ग) , अनिल परब (आमदार विभाग प्रमुख) , आशिष शेलार (आमदार ,मुंबई अध्यक्ष भाजपा ), शिवाजीराव नलावडे ( अध्यक्ष बृहन्मुंबई नागरिक सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित), सुनील खाडे (सल्लागार), पांडुरंग उपळकर (कायदेशीर सल्लागार) , सुदेश डूबे (उपविभाग प्रमुख) या सर्व मान्यवरांनी पतपेढीच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देऊन मोलाचे मार्गदर्शन केले.

पतपेढीच्या मुख्य कार्यक्रमात रौप्य महोत्सवी वर्षाच्या स्मरणिकेचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच उपस्थित मान्यवरांचे पतपेढीच्या वतीने यथोचित शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित 10 माजी संचालक आणि मोलाची आर्थिक ठेव पतपेढीत जमा करून विश्वास दाखवलेल्या चार संस्थाना सन्मानित करण्यात आले.

पतपेढीचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठल बंड यांनी सभागृहाला संबोधित करताना मागील २४ वर्षाचा आढावा घेतला कोविड सारख्या कठीण परिस्थितीची आठवण करून दिली.चांगल्या वाईट प्रसंगातून आपण कसा मार्ग काढत पतपेढीची स्वमालकीची जागा मिळवून सुसज्ज असे कार्यालय सुरू केल्याचे अभिमानाने सांगितले. सभासदांनी दाखवलेला विश्वास दिलेली साथ आणि कर्मचारी वर्गाने मन लावून केलेली सेवा यामुळे आपण यशस्वी झाल्याचे सांगितले.असे सहकार्य यापुढेही लाभावे असे सांगून आभार व्यक्त केले. सरचिटणीस प्रभाकर मांडवकर यांनी पतपेढीच्या उलाढालीचे गुंतवणुकीची स्थिर स्थावर मालमत्तेची माहिती देऊन सभासदांना दिलासा दिला व उपस्थितांचे आभार मानले.

# कुर्ल्यातून मंगेश कुडाळकर यांनी वाजतगाजत उमेदवारी अर्ज भरला



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचे शेवटचे एक दिवस असल्याने उमेदवारांची अर्ज दाखल करण्यासाठी लगबग सुरु होती. कुर्ला विधानसभा क्षेत्रातील महायुती शिवसेनेचे अधिकृत उमेदवार मंगेश कुडाळकर यांचा सोमवार दिनांक 28 ऑक्टोबर रोजी नामांकन अर्ज दाखल करण्यात आले आहे. शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, शाखा क्रमांक 169, आर्यन हॉस्पिटल, स.गो. बर्वे मार्ग, कुर्ला (पूर्व) येथून महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते, शिवसैनिकांची भव्य रॅली काढण्यात आली.

यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष सुषम सावंत यांच्यासह अनेक पदाधिकारी आमदार मंगेश कुडाळकर यांचा अर्ज भरण्यासाठी उपस्थित होते.यावेळी आमदार मंगेश कुडाळकर यांनी ठीक ठिकाणी स्थानिक मंदिरात अभिषेक पूजा, देवदर्शन आणि छत्रपती शिवाजी महाराजांना नमन करत पुष्प अर्पण करून अर्ज भरण्यास गेले. दरम्यान आमदार मंगेश कुडाळकर यांच्या अर्ज भरण्यास निघालेल्या रॅली मध्ये भगव्यामय वातावरणात हजारो च्या संख्येने स्थानिक नागरिक, पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

### जोगेश्वरी येथे किल्ले बांधणी प्रशिक्षण वर्ग

**मुंबई:** अस्मिता सामाजिक सांस्कृतिक व शैक्षणिक वारसा जपणाऱ्या संस्थेने शनिवार (ता. २६) ते सोमवार (ता. २८) या कालावधीत तीन दिवसांचा किल्ले बांधणी प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. शेवटच्या दिवशी प्रशिक्षण वर्गाची सांगता व शिवकालीन किल्ले बांधणी प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम अस्मिता भवन, जोगेश्वरी (पूर्व) येथे आयोजित केला होता. इतिहासाचे अभ्यासक गिरीश चित्रे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या शिबिरात एकूण १९८ शिबिरार्थींनी व त्यांच्या पालकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या वेळी अनिल नलावडे म्हणाले की, प्रत्येक दिवाळीत मेहनतीने, अथक प्रयत्नांनी तयार केलेल्या या गड दुर्गांना दिवाळीनंतर वाया जाऊ न देता या सर्वच प्रतिकृती महाराष्ट्रातील शाळांच्या मुख्य प्रांगणात ठेवल्या पाहिजेत. जेणेकरून विद्यार्थ्यांवर योग्य ते संस्कार घडवून आणता येतील.

# आदिवासी मुलांनी दिला वाघ बारसेतून मतदान जनजागृतीचा संदेश !

**प्रतिनिधी**
■ **मोखाडा**

आदिवासी, दुर्गम भागात दसरा झाल्यानंतर आदिवासी मुले गावोगावी जाऊन हातात लाकडी तलवार घेऊन बिदाई मागतात. त्याला येऊ द्या रं येऊ द्या वाघ्याची घेर असं म्हटलं जातं. मात्र, या आदिवासी संस्कृतीचे जतन करून कोचाळे येथील लहान मुले व युवकांनी वाघ बारसेतून गावागावात जाऊन मतदानाचे महत्व पटवून देऊन जनजागृती केली आहे.

## संस्कृतीमधून मतदान करण्याचे केले आवाहन



सध्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. उमेदवारांसह गल्लोगल्ली निवडणुकीतील चर्चांना उधाण आले आहे. निवडणूक अयोगाकडूनही याची परिपूर्ण तयारी झाली असून विविध मार्गाने लोकशाहीच्या उत्सवात सर्वांनी सहभागी होऊन आपले बहुमूल्य मताचा अधिकार जोपासावा यासाठी प्रयत्न करत आहे. यातच आदिवासी भागातील वाघ्यानी आपल्या संस्कृतीचे दर्शन घडवत मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले आहे.

दसरा झाल्यावर चार ते पाच दिवसानंतर ग्रामीण भागात पुन्हा एकदा भोंडवाई च्या पारंपरिक गीताप्रमाणे ' यंवद्या रे यंवद्या वाघ्याची घेर वाघे ' या आवाजाने परीसर दुमदुमून जात आहे. विज्ञान युगाच्या काळात आजही ग्रामीण भागात महिला, मुली तसेच मुलांकडून आपल्या पंरपरेला जपुन ती पुढे चालविण्याची चढाओढ सुरू आहे. दसऱ्यानंतर गावोगावी फिरून मुलांकडून ' यंवद्या रे यंवद्या वाघ्याची घेर वाघे ' ही साद घालून बिदागी स्वरुपात धान्य किंवा पैसे घेतले जातात आणि बार्शीच्या दिवशी ( वाघ देवतेला ) नैवेद्य दाखवून ते धान्य मुलं आनंदाने शिजवून खातात. अशी पूर्वापार चालत आलेली परंपरा आहे. त्यात कोचाळे गावातील मुलांनी भर घालत मतदानाचे महत्व पटवून दिले.

गावोगावी फिरून बिदागी स्वरुपात धान्य किंवा पैसे घेणारे वाघे यांची मागण्याची आणि बोलण्याची परंपरा काही किलोमीटर अंतरावर आपणास बदलेली दिसून येईल. गावोगावी किंवा बाजारपेठेत बिदागी मागण्यासाठी चार पाच मुलं एकत्र येतात याचा पोशाख जरी साधा असला तरी सुद्धा त्यांच्या कानांवर दोन्ही बाजूने झेंडूची फुले लावलेली असतात तर हातात लाकडापासून तयार केलेली तलवार असते तसेच एका मुलाच्या हातात धान्य घेण्यासाठी पिशवी असते अशा प्रकारे ते आपला वेश तयार करून गावातील घरासमोर पोहचले का ' येवंद्या रे यंवद्या वाघ्याची घेर वाघे ' अशी गर्जना करून घरातील माणसांना ओरडून साद घालतात व धान्य स्वरुपात बिदागी जमा करतात.

**जाहीर सूचना**

या द्वारे तमाम जनतेस सुचित करण्यात येते की शितल श्रीपती आंब्रे हे नाव आहे. या नावामध्ये माझ्या वडिलांचे नाव श्रीपती नसुन ते श्रीपत आहे. यापुढे ते शितल श्रीपत आंब्रे हे नाव असणार आहे. याची तमाम जनतेनी नोंद घ्यावी ही नम्र विनंती. या वर कोणाचीही हरकत असेल तर त्यांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.
बिल्डिंग नं. 20, रूम नंबर. 78
BDD चाळ, बावला मशिदीजवळ
एन.एम. जोशी मार्ग, मुंबई 400013.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 129
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - १२९
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

# संजय उपाध्याय यांना बोरिवलीतून भाजपाची उमेदवारी

**मुंबई :** भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस संजय उपाध्याय यांनी पक्षाप्रती असलेल्या प्रतिक्षा आणि प्रामाणिकपणाचे फळ त्यांना मिळाले आहे. बोरिवली विधानसभेतून संजय उपाध्याय यांना भाजपाची उमेदवारी मिळाली आहे. संजय उपाध्याय हे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे सदस्य होते. ते भारतीय जनता युवा मोर्चाचे अध्यक्षही राहिले आहेत. संजय उपाध्याय गेल्या तीन दशकांहून अधिक काळ भाजपमध्ये सक्रिय आहेत. संजय उपाध्याय यांना विलेपार्ले विधानसभेचे तिकीट न मिळाल्याने मुंबईतील संपूर्ण उत्तर भारतीय समाजात नुकतेच संताप आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. ती नाराजी दूर करत भाजपने अखेर संजय उपाध्याय यांना बोरिवली मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. हा मतदार संघ भाजपासाठी सुरक्षित असा विभाग आहे.



# उमेदवारी न मिळाल्याने भाजप, ठाकरे शिवसेना आणि काँग्रेसमध्ये नाराजी

## तिन्ही पक्षांत बंडखोरी होण्याची शक्यता

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतीय जनता पक्षाने 35 उमेदवारांची तिसरी यादी काल जाहीर केली. त्यात सर्वांचे लक्ष लागून राहिलेल्या बोरिवलीतून संजय उपाध्याय यांना तिकीट देण्यात आले आहे. त्यामुळे बोरीवलीत भाजप कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. स्थानिक उमेदवार हवा अशी त्यांची मागणी होती. लोकसभा निवडणुकीत विद्यमान खासदार असलेल्या गोपाळ शेट्टी यांना तिकीट नाकारून बाहेरच्या पियूष गोयल यांना उमेदवारी देण्यात आली होती. आताही बाहेरचा उमेदवार लादल्याने कार्यकर्त्यांनी या उमेदवाराला विरोध करीत गोपाळ शेट्टी किंवा शिवानंद शेट्टी यांना उमेदवारी देण्याची मागणी केली.

भाजपच्या तिसऱ्या यादीत बहुतांश विवादित जागा होत्या. भाजप नेते संजय पांडे वर्सोवा मतदारसंघातून तिकीट मागत होते, तिथे भाजपने माजी आमदार भारती लवेकर यांना पुन्हा तिकीट दिले आहे. तर घाटकोपर पूर्व येथे माजी आमदार पराग शहा आणि माजी मंत्री प्रकाश मेहता यांच्याशिवाय प्रवीण छेडा हेही घाटकोपर पूर्व मतदारसंघातून तिकीट मागत होते, मात्र येथून पुन्हा पराग शहा यांना तिकीट देण्यात आले.

मात्र सर्वात धक्कादायक निर्णय बोरिवलीचा होता. येथून गोपाळ शेट्टी यांना तिकीट देण्याची चर्चा होती मात्र अचानक संजय उपाध्याय यांना तिकीट देण्यात आले. ही भाजपची सर्वात सुरक्षित जागा मानली जाते. लोकसभेचे तिकीट गोपाळ शेट्टी यांना न देता ते पियुष गोयल यांना देण्यात आले. गोपाळ शेट्टी यांची पुन्हा एकदा निराशा केली आहे.

मुंबईत काँग्रेस ने मुस्लिम उमेदवारांची निराशा केली आहे. अंधेरी पश्चिम मधून माजी नगरसेवक व मुंबई काँग्रेस चे उपाध्यक्ष मोहसिन हैदर हे इच्छुक होते. पण तेथून हैदर यांना उमेदवारी न देता नेहमी प्रमाणे अशोक जाधव यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे यापूर्वी दोन वेळा त्यांचा तेथून पराभव झाला आहे. या मतदार संघात हैदर यांची ताकद आहे. मोठ्या प्रमाणात मुस्लिम मतदार तेथे आहेत.त्यामुळे हैदर प्रचंड नाराज झाले आहेत ते एम आय एम पक्षाचे तिकीट मिळविण्याच्या प्रयत्नात आहेत असे समजते. वर्सोवा मतदार संघ शिवसेना उध्दव ठाकरे यांच्या कडे गेला आहे.तिथे शिवसेनेने हरून खान या शाखा प्रमुखाला उमेदवारी देण्यात आली आहे. तेथून उबाठा चे माजी नगरसेवक राजू पेडणेकर इच्छुक होते. पेडणेकर यांनी बंडाचा झेंडा उभारला आहे.

वांद्रे पूर्व, भायखळा, मुलुंड, वर्सोवा, घाटकोपर येथून काँग्रेस चे मुस्लिम कार्यकर्ते इच्छुक होते. पण डावलण्यात आले आहे. त्यामुळे तिथे मुस्लिम कार्यकर्ते बंडखोरीच्या तयारीत आहेत असे समजते. गेल्यावेळी मुंबईतून काँग्रेस चे चार मुस्लिम आमदार निवडून आले होते. यावेळी सहा जागा मिळणार होत्या पण चार च जागा देण्यात आल्या आहेत. सायन कोळीवाडा येथून काँग्रेस कडे पालिकेतील विरोधी पक्ष नेते रवी राजा यांनी तिकीट मागितले होते पण त्यांना न दिल्याने दुसऱ्याला दिले त्यामुळे तेही नाराज झाले आहेत. आज एका पत्रकार परिषदेत ते आपली भूमिका जाहीर करणार आहेत. कालिना येथे ही ७६ हजार मुस्लिम मतदार आहेत. ती जागा शिवसेना उबाठा कडे गेली आहे. तेथून माजी नगरसेवक अश्रफ आझमी इच्छुक होते. तिथेही मुस्लिमांमध्ये नाराजी आहे. काँग्रेस ने ज्या जागा विजयी होऊ शकतात अशाच जागा घ्यायला हव्या होत्या पण त्यांनी कांदिवली, बोरिवली की ज्या भाजपच्या जागा आहेत. तिथे काँग्रेस उमेदवार विजयी होऊ शकत नाही असे मतदार संघ घेतले आहे.त्यामुळे मुंबईत काँग्रेसला नुकसान होण्याची शक्यता एका माजी नगरसेवकाने व्यक्त केली आहे.

आज उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यानंतरच कुणी कुठे बंडखोरी केली हे स्पष्ट होणार आहे.मात्र भायखळा येथून महा विकास आघाडीत ही जागा ठाकरे शिवसेनेला मिळाली आहे. तरीही काँग्रेसच्या मधु चव्हाण यांनी तेथून काल आपला उमेदवारी अर्ज भरला आहे.

### दोन्ही माजी खासदारांना भाजपने डावलले

*भाजपने बोरीवलीत गोपाळ शेट्टी तर घाटकोपर पूर्व येथून मनोज कोटक यांना डावलले आहे. २०१७ च्या लोकसभा निवडणुकीत हे दोघेही निवडून आले होते. पण २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत या दोघांनाही डावलण्यात आले. किमान विधानसभा निवडणुकीत तिकीट मिळेल अशी त्यांना आशा होती पण या दोन्ही माजी खासदारांना भाजपने डावलले. घाटकोपर पूर्व येथून मनोज कोटक इच्छुक होते.*

# रूग्णसेवेत तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून रूग्णालय व्यवस्थापन करणे गरजेचे - भूषण गगराणी



प्रतिनिधी
■ मुंबई

आरोग्य विभागातील प्रत्येक डॉक्टर, परिचारीका, कर्मचारी, कामगार हे अत्यंत महत्वाचा घटक आहेत. प्रत्येकाने आपली जबाबदारी तसेच नेमून दिलेले काम निष्ठेने आणि तळमळीने करणे गरजेचे आहे. कामाच्या ठिकाणी मनापासून, निष्ठेने आणि ध्येयाने कामाची पद्धती ही इतरांना प्रेरणा ठरायला हवी, असे प्रतिपादन बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री भूषण गगराणी केले. शीव येथील लोकमान्य टिळक सर्वसाधारण रूग्णालयाच्या सभागृहात आरोग्य कर्मचारी संवाद कार्यक्रमात ते सोमवारी बोलत होते. रूग्णालयाच्या ठिकाणी अधिकाधिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्तमोत्तम आरोग्य सुविधा देण्याचे उद्दिष्ट असायले हवे, असेही ते यावेळी म्हणाले.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगर ठिकाणी सेवा देताना रूग्णांसोबत किमान नातेवाईक उपस्थित राहतील यासाठी आरोग्य यंत्रणेमध्ये समन्वय असायला हवा. डिजिटल तंत्रज्ञानाची मदत घेऊन हेल्थ मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टिम (एचएमआयएस) च्या माध्यमातून रूग्णांच्या नातेवाईकांची संख्या रूग्णालयाच्या ठिकाणी मर्यादीत ठेवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. त्यामुळे रूग्णांना अधिक दर्जात्मक पद्धतीने सेवा देणे शक्य होईल. तसेच रूग्णसेवेत येणारे अडथळेही कमी होतील. सर्वसामान्यांमध्ये महानगरपालिकेच्या रूग्णसेवेबाबतची प्रतिमा सुधारण्याच्या अनुषंगाने अधिकाधिक प्रयत्न करायला हवेत. त्यामुळे रूग्णालयाच्या ठिकाणी आया, वॉर्डबॉय, स्वच्छता कर्मचारी यांनी आपली जबाबदारी चोख पार पाडण्याची गरज आहे. रूग्णालयातील स्वच्छतागृहे नियमित वापरात असतात. याठिकाणी सर्वाधिक प्राधान्याने स्वच्छता करणे गरजेचे असल्याचेही ते म्हणाले.

लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रूग्णालय, राजे एडवर्ड स्मारक (केईएम रूग्णालय) येथील वैद्यकीय रूग्णालयात शिक्षण घेतलेले वैद्यकीय विद्यार्थी आज जगभरात सेवा देत आहेत, ही अतिशय गौरवाची बाब असल्याचे गगराणी यांनी नमूद केले. या रूग्णालयाच्या विद्यार्थ्यांच्या कामगिरीची दखल अनेक मोठ्या देशांच्या रूग्णसेवेतील योगदानासाठी घेतल्याचेही ते म्हणाले. मध्यवर्ती रूग्णालयाच्या ठिकाणी औषध तुटवड्याच्या अनुषंगाने खरेदी खात्याच्या माध्यमातून ही गैरसोय कमी कशी करता येईल, यासाठीची पावले उचलण्यात येतील, असेही त्यांनी आश्वस्त केले.

# उमेदवार, पक्षांसाठी निवडणुकीबाबतच्या परवानग्या ऑनलाईन मिळण्यासाठी 'सुविधा 2.0' मोबाईल ॲप

प्रतिनिधी
■ मुंबई

भारत निवडणूक आयोगाने (ECI) 'सुविधा 2.0' हे मोबाईल ॲप अद्ययावत केले असून याद्वारे उमेदवार आणि पक्षांना आता कोणत्याही ठिकाणाहून सहजपणे निवडणूक मोहिमेच्या परवानग्या ऑनलाईन सुविधेद्वारे मिळणार आहेत. यापूर्वी फक्त ऑनलाईन पोर्टलवरच अर्ज सादर करता येत होते, पण आता नवीन ॲपद्वारे सर्व प्रक्रिया मोबाईलवरून करता येणार असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

सुविधा 2.0 हे मोबाईल ॲप वापरण्यास सहज आणि अधिक सुरक्षित आहे. या ॲपच्या खास वैशिष्ट्यांमध्ये उमेदवारांना अर्ज डाउनलोड करणे, प्रचारासंदर्भातील परवानग्या मागवणे, अर्ज केलेल्या परवानगी संदर्भात सद्यस्थिती जाणून घेणे आणि मंजुरीची प्रत डाउनलोड करणे आदी बाबी समाविष्ट आहेत. या ॲपमध्ये नामनिर्देशन प्रक्रिया, निवडणूक वेळापत्रक आणि निवडणूक आयोगाच्या ताज्या अद्ययावत सूचना व आदेश देखील उपलब्ध असतील.

हे ॲप अँड्रॉइडसाठी गुगल प्ले स्टोरवर https://play.google.com/store/apps/details?id=suvidha.eci.gov.in.candidateapp&pli=1 यावर आणि आयओएससाठी ॲपल ॲप स्टोरवर https://apps.apple.com/app/suvidha-candidate/id6449588487 या लिंकवर उपलब्ध आहे.

# मी लोकांखातर,त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी निवडणूक लढवतोय!

## सदा सरवणकर यांचा उमेदवारी माघारी घ्यायला नकार

प्रतिनिधी
■ मुंबई

शिवसेनेने माहीममधून सदा सरवणकर यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर, भाजपा मात्र त्यांनी माघार घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त करत आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांनी माहीम मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला असून त्यांची बिनविरोध निवड व्हावी अशी भाजपाची अपेक्षा आहे. आशिष शेलार यांनी हे जाहीरपणे बोलूनही दाखवले आहे. मनसेने लोकसभेत दिलेल्या पाठिंब्याची परतफेड करावी अशी महायुतीची अपेक्षा आहे. मात्र सदा सरवणकर अजिबात माघार घेण्याच्या भूमिकेत नाही. एका मराठी टीव्ही वहिनीला दिलेल्या मुलाखतीत



त्यांनी मी लोकांखातर ,त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी निवडणूक लढवतोय असे उत्तर दिले.

मनसेने लोकसभेत महायुतीला पाठिंबा दिल्याच्या बदल्यात तुमचा बळी दिला जात आहे का? असे विचारलं असता सदा सरवणकर यांनी अजिबात नाही असे उत्तर दिले. ते म्हणाले की, "निवडणूक ही मतदारांच्या अपेक्षांवर अवलंबून असते. प्रत्येक मतदाराला आपल्याला सहज भेटणारा, विकासाचा दृष्टीकोन ठेवणारा, आपल्यातील एक उमेदवार, आमदार असावा असे वाटते. मतदारांचा मी उभे राहायला हवे आणि निवडून यायला हवे असा निश्चय आहे'.

तुम्ही माघार घेण्यासंदर्भातील चर्चा का रंगल्या आहेत असे विचारले असता त्यांनी सांगितले की, 'माध्यमांमधून जास्त चर्चे ऐकू येत आहे. आमच्या तोंडून, कार्यकर्त्याकडून असं काही ऐकायला मिळणार नाही. आपल्याला निवडणूक लढवायची आहे आणि दादर, माहीम, प्रभादेवाचा आमदार म्हणून विधानसभेत जायचं आहे, लोकांचे प्रश्न सोडवायचे आहेत. ही लोकभावना आहे, म्हणून मला लोकांखातर, पदाधिकाऱ्यांसाठी लढायचे आहे.

"यासंदर्भात कोणताही निर्णय झालेला नाही. चर्चेला स्वातंत्र्य आहे, तुम्ही चर्चा करु शकता. पण निर्धार मतदार, पदाधिकारी, शाखाप्रमुख, कार्यकर्ते यांचा आहे. माझ्याशी यासंदर्भात कोणी काही बोललेलं नाही. मुख्यमंत्र्यांनी मला एबी फॉर्म दिला, निवडणुकीसाठी आवश्यक साहित्या दिले. यापेक्षा आणखी काय बोलायला हवे, असेही सदा सरवणकर म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज ठाकरेंनी विनंती केली तर तुम्ही माघार घेणार का? असे विचारलं असता ते म्हणाले, 'माझ्या थांबण्याचा प्रश्न नाही. मतदार काय बोलतो हे महत्वाचे आहे. आमचे पदधिकारी यांच्या भावनाही महत्त्वाच्या आहेत. येथे शिवसेना प्रमुखांचे विचार महत्वाचे आहेत. हे विचार सोडून कोणी आग्रह करेल असे वाटत नाही. अर्ज भरणार आहोत, माघार कशाला घ्यावी'.

# कमीत कमी वायू व ध्वनी प्रदूषण करणारे फटाके फोडावेत - पालिका प्रशासन

## फटाके फोडण्याची वेळ रात्री १०.०० वाजेपर्यंत मर्यादित ठेवावी

प्रतिनिधी
■ मुंबई

प्रकाशाचा सण, सणांचा राजा, दीपोत्सव अशी ओळख असणारा दिवाळीचा सण मुंबईकरांनी अधिकाधिक पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करावा. तसेच दिवे लावताना व फटाके फोडताना आपल्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, विशेष करून लहान मुलांची जास्त काळजी घ्यावी. ध्वनी विरहित फटाक्यांचा वापर करण्यास प्राधान्य देवून कमीत कमी वायू व ध्वनी प्रदूषण करणारे फटाके फोडावेत. फटाके फोडण्याची वेळ रात्री १०.०० वाजेपर्यंत मर्यादित ठेवावी, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासानाद्वारे दिवाळीच्या शुभेच्छांसह करण्यात आले आहे.

दिवाळीचा मंगलमय सण मुंबईकर मोठ्या उत्साहाने साजरा करतात. हा सण साजरा करताना फटाक्यांची आतषबाजी, पणत्यांची - दिव्यांची सजावट, विद्युत रोशणाई इत्यादी बाबी मोठ्या प्रमाणात केल्या जातात. फटाक्यांची आतषबाजीमुळे वायू व ध्वनी प्रदूषण होते. प्रदूषणास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेतल्यास दिवाळीचा आनंद अधिक चांगल्या रितीने, अधिक संस्मरणीय पद्धतीने घेता येईल.

प्रदूषण नियंत्रणासंदर्भात महानगरपालिकेच्या वतीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने दीपावली सणामध्ये नागरिकांनी फटाके फोडण्याची वेळ रात्री १०.०० वाजेपर्यंत मर्यादित ठेवावी. त्यातही शक्यतो कमीत कमी वायू व ध्वनी प्रदूषण करणारे



फटाके फोडावेत. फटाक्यांच्या प्रदूषित हवेमुळे लहान मुले, गर्भवती महिला, वृद्ध व्यक्ती, दम्यासारख्या आजाराचे रुग्ण अशा सर्वांनाच आरोग्याचा त्रास होतो. त्यासोबतच, पर्यावरणाचे देखील नुकसान होते, ही बाब देखील सर्वांनी कृपया लक्षात घ्यावी, असे देखील आवाहन महानगरपालिका प्रशासनाने केले आहे.

### पालिकेचे सूचनावजा आवाहन

*१. दिवाळी हा प्रकाशाचा सण आहे. तो प्रकाशासोबत साजरा करण्यास प्राधान्य देवून ध्वनी व वायू प्रदूषण टाळावे.*
*२. ध्वनी विरहित फटाक्यांचा वापर करण्यास प्राधान्य द्यावे.*
*३. कमीत कमी वायू प्रदूषण करणारे फटाके फोडावेत.*
*४. फटाके फोडण्याची वेळ रात्री १०.०० वाजेपर्यंत मर्यादित ठेवावी.*
*५. ज्येष्ठ नागरिक व हृदयरुग्णांप्रती जबाबदारी जाणून तीव्र आवाजाचे फटाके फोडणे टाळावे.*
*६. सुरक्षिततेस सर्वोच्च महत्व द्यावे.*
*७. फटाके फोडताना शक्यतो सूती कपडे परिधान करावेत. सैलसर (Oversized) कपडे वापरू नयेत.*
*८. फटाके फोडताना ते मोकळ्या जागी फोडावेत.*
*९. गर्दीची ठिकाणे, अरूंद गल्ली यांसारख्या ठिकाणी फटाके फोडू नयेत.*
*१०. फटाके फोडताना मुलांसोबत मोठ्या व्यक्तींनी सोबत रहावे.*
*११. फटाके फोडताना सुरक्षिततेचा भाग म्हणून पाण्याने भरलेली बादली, वाळू इत्यादी बाबी जवळ बाळगाव्यात.*
*१२. फटाके फोडताना कोरडी पाने, कागद किंवा कोणतीही इतर सामुग्री जाळू नये.*

*सर्व नागरिकांनी या आवाहनाला प्रतिसाद द्यावा. दीपावलीचा सण हा सर्वांसाठी आनंददायी, सुरक्षित व पर्यावरणपूरकरितीने साजरा करणे हे सामाजिक हिताचे आहे, अशी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून नम्र विनंती करण्यात आले आहे.*

# बी. जी. देशमुख वार्षिक निबंध स्पर्धेचे आयोजन

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतीय लोक प्रशासन संस्थेच्या महाराष्ट्र विभागीय शाखातर्फे आयोजित बी. जी. देशमुख वार्षिक निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सन २०२४- २०२५ या वर्षात निबंधस्पर्धेसाठी विकसित भारत- 'सन २०४७',(Viksit Bharat-India in 2047, उपेक्षितांसाठी सार्वजनिक धोरण (Public Policy for the Marginalized)आणि शासन सेवेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) उपयोग(Use of Artificial Intelligence in Government) या विषयांवर निबंध सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

निबंध कोणत्याही एका विषयावर इंग्रजी किंवा मराठीतून सादर करावयाचा आहे. निबंध ३ हजार शब्दांपेक्षा कमी आणि ५ हजार शब्दांपेक्षा जास्त नसावा, निबंध हा विषयाच्या अनुषंगाने विश्लेषणात्मक, संशोधनपर व पदव्युत्तर दर्जाचा असणे अपेक्षित आहे. निबंध कागदाच्या एकाच पृष्ठभागावर टंकलिखित करुन त्यावर केवळ टोपणनांव लिहून चार प्रतीत २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सादर करावा. स्पर्धकाने निबंधावर आपले नाव किंवा कोणत्याही प्रकारची ओळख नमूद करु नये, निबंधाच्या प्रती व त्या सोबत वेगळ्या लिफाफ्यात स्पर्धकाचे नाव (मराठी व इंग्रजीतून); टोपणनाव, पत्ता, संपर्क क्रमांक व ई-मेल ॲड्रेस नमूद करुन निबंधासोबत पाठवावे. या स्पर्धेसाठी पहिले बक्षिस १० हजार रुपये, दुसरे बक्षिस ७ हजार ५०० रुपये, तिसरे बक्षीस ५ हजार रुपये, उत्तेजनार्थ बक्षिस दोन हजार रुपये देण्यात येणार आहेत.

योग्य त्या गुणवत्तेचा निबंध नसल्यास स्पर्धकास बक्षीस न देण्याचा किंवा बक्षिसाची रक्कम कमी करण्याचा अधिकार संस्था राखून ठेवीत आहे. बक्षीस देण्याबाबत संस्थेचा निर्णय अंतिम राहील. संस्थेच्यावतीने यापूर्वी घेतलेल्या स्पर्धेत विजेता ठरलेला किंवा उत्तेजनार्थ बक्षीस प्राप्त स्पर्धक हा लगतची तीन वर्षे या स्पर्धेत भाग घेण्यास पात्र ठरणार नाही.

टोपणनांव लिहिलेल्या निबंधाच्या चार प्रती व त्यासोबत वेगळ्या लिफाफ्यात स्पर्धकाचे संपूर्ण नाव (इंग्रजी व मराठी), टोपणनाव, पत्ता व संपर्क क्रमांक व ई-मेल ॲड्रेस लिहिलेली माहिती एकत्रित एका मोठ्या लिफाफ्यामध्ये बंद करुन त्यावर 'बी. जी. देशमुख वार्षिक निबंध स्पर्धा, २०२४-२०२५' असे नमूद करावे. हा लिफाफा 'मानद अध्यक्ष, भारतीय लोक प्रशासन संस्था, महाराष्ट्र विभागीय शाखा, तळ मजला, बँक ऑफ महाराष्ट्राच्या बाजूला, मादम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०००३२' या पत्त्यावर दिनांक २८/२/२०२५ पर्यंत पाठवावा. माहितीसाठी कृपया दूरध्वनी क्रमांक (०२२) २२७९ ३४३० किंवा ईमेल: js.mrb-iipa@gov.in द्वारे संपर्क साधावा.

# राष्ट्रवादीच्या प्रवक्त्या सना मलिक यांचा उमेदवारी अर्ज दाखल



प्रतिनिधी
■ मुंबई

राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सना मलिक यांनी 28 ऑक्टोबर 2024 रोजी अणुशक्ती नगर विधानसभा मतदारसंघासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या नामांकनादरम्यान त्यांचे वडील नवाब मलिक यांच्यासह हजारो समर्थक भव्य रॅलीत सहभागी झाले होते. सना मलिक यांनी आपल्या समर्थकांसह उमेदवारी अर्ज भरण्याची रॅली सुरू केली आणि देवनार कार्यालयापासून सुमारे दीड किलोमीटर चालत स्थानिक निवडणूक कार्यालयात (चेंबूर चिल्ड्रन होम) उमेदवारी अर्ज भरला. यावेळी सना मलिक म्हणाली की, मी काही पॅराशूट उमेदवार नाही जी आज येऊन उभी राहिली आहे. मी गेल्या अनेक वर्षांपासून अणुशक्ती नगरमध्ये काम करत आहे. आणि मी फक्त माझ्या कामाच्या नावावर लोकांकडून मते मागत आहे आणि मला पूर्ण विश्वास आहे की अणुशक्ती नगरची जनता मला पूर्ण साथ देईल कारण मी फक्त नवाब मलिकची मुलगी नाही तर मी अणुशक्ती नगरची मुलगी सुद्धा आहे.

# उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईत 54 लाख किमतीचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विविध पथकांनी ठाणे जिल्ह्यामध्ये मुंब्रा वळण रस्ता, येथे भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याची वाहतूक करीत असलेल्या वाहनावर आणि सहकार नगर, लिंक रोड, चेंबूर, मुंबई या ठिकाणी परराज्यात निर्मित असलेला भांग मिश्रीत पदार्थांची वाहतूक करणाऱ्या वाहनावर 26 ऑक्टोबर रोजी कारवाई केली.

यामध्ये चेंबूर येथील कारवाईत 5 व मुंब्रा येथील कारवाईमध्ये 2 अशा एकूण 7 आरोपींना अटक करण्यात आली आहे. या दोन्ही कारवाईमध्ये एकूण 54 लाख 48 हजार 600 रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या मुद्देमालापैकी चेंबूर येथे 35 लाख 73 हजार 400 व मुंब्रा येथे 18 लाख 75 हजार 200 रूपयांचा समावेश आहे.

या गुन्ह्यातील आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम 1949 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या कारवाईमध्ये जप्त केलेल्या साहित्यामध्ये 3 टेम्पो वाहने, 2232 किलो भांग मिश्रीत पदार्थ, परराज्यातील भारतीय बनावटीचे 120 बॉक्स विदेशी मद्य



आदींचा समावेश आहे.

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक प्रसाद सुर्वे, कोकण विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार यांनी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली. मुंब्रा येथील कारवाई ठाणे अधिक्षक प्रवीण तांबे, उपअधीक्षक वैद्य, श्री. पोकळे, ए. डी देशमुख, यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

चेंबूर येथील गुन्ह्यामध्ये दुय्यम निरीक्षक विशाल सकपाळ, रिंकेश दांगट, हनुमंत यादव, सहा. दुय्यम निरीक्षक महावीर कोळेकर, जवान केतन वझे, भाऊसाहेब कराड, हनुमंत गाढवे, विजय पाटील, नारायण जानकर, श्रीराम राठोड, अमित सानप, कुणाल तडवी यांनी कारवाई केली. तसेच मुंब्रा येथील कारवाईमध्ये निरीक्षक एम.पी धनशेट्टी, दुय्यम निरीक्षक एन. आर. महाले, दुय्यम निरीक्षक एस. आर मिसाळ,सहायक दुय्यम निरीक्षक बी. जी थोरात, जवान खेमनर, आर. एस पाटील, पी. ए. महाजन, पी. एस नागरे, एम. जी शेख, श्रीमती एस.एस. यादव यांनी सहभाग घेतला, असे कोकण उपआयुक्त प्रदीप पवार यांनी कळविले आहे.

# मुंबई सेंट्रलच्या बीआयटी चाळ रहिवाशांचा निवडणूकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा

## बीडीडी चाळींच्या धर्तीवर पुनर्विकासाची रहिवाशांची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई सेंट्रल येथील बीआयटी चाळींचा पुनर्विकास बीडीडी चाळींच्या धर्तीवर करावा व त्याकरीता मुंबई महानगरपालिकेने धोरण निश्चित करून निविदा काढाव्या या मागणीसाठी चाळीतील रहिवासी एकवटले असून त्यांनी आपली विधानसभा निवडणूकीवर बहिष्कार टाकण्याचे ठरवले आहे.

मुंबई सेंट्रल येथील बीआयटीच्या १९ इमारतींचा पुनर्विकास करण्याचा प्रयत्न २००६ सालापासून सुरू आहे. मात्र त्यात आतापर्यंत अनेक वाद निर्माण झाले आहेत. त्यामुळे गेली कित्येक वर्षे या चाळींचा पुनर्विकास रखडला आहे. या चाळ समूहात रहिवाशांच्या दोन संघटना असून त्यापैकी बी आय टी चाळ सेवा संघा या रहिवासी संघटनेने नुकतेच आंदोलन केले व निवडणूकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला.

मुंबईतील सर्वच बीआयटी चाळींना १०० वर्षे पूर्ण झालेली असल्याने बीडीडी चाळींच्या पुनर्विकास धोरणानुसारच बीआयटी चाळींचा पुनर्विकास करावा अशी मागणी चाळवासियांची आहे. जुने संमतीपत्र दाखवून रेटण्यात येत असलेल्या प्रस्तावाला या संघटनेने विरोध केला आहे. पालिका प्रशासनाने स्वतः निविदा मागवून विकासकाची निवड करावी अशी मागणी चाळीतील रहिवासी गेल्या अनेक महिन्यांपासून करत आहेत. मात्र पालिका प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे चाळकऱ्यांनी हा पवित्रा घेतला आहे.

कोणतीही जोखीम न घेणे, ही सर्वात मोठी जोखीम आहे.



- रतन टाटा
प्रसिद्ध उद्योगपती

वृत्तमानस
मुंबई, मंगळवार, २९ ऑक्टोबर २०२४

# तुकडेबंदी कायद्यात बदल स्वागतार्ह

राज्यात तुकडेबंदी कायद्याचा भंग करून झालेले जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार नियमित करण्याचा निर्णय अलीकडेच सरकारने घेतल्याने त्यावर अनेक मत-मतांतरे व्यक्त होत आहेत. हा निर्णय कितपत योग्य याबाबत साशंकता व्यक्त होत असली तरी त्याचा फायदा अनेक शेतकऱ्यांना विशेषतः लहान शेतकऱ्यांना होण्याचा अंदाज आहे. राज्यात तुकडेबंदी लागू आहे. या तुकडेबंदी कायद्यात नमूद केल्याप्रमाणे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी शेतजमीन विकत घेता येत नाही. किफायतशीर शेती करण्यास अडचण येईल, असे जमिनीचे लहान-लहान तुकडे होऊ नयेत, हा तुकडेबंदीसंबंधीच्या तरतुदीचा उद्देश आहे. तुकडेबंदी कायद्यामुळे शेतीचे तुकडे पाडून विक्री करण्यास बंदी आहे. भूधारण क्षेत्राचे फार लहान तुकडे झाल्याने उत्पादनात अडथळा येतो. त्यामुळे जमिनीचे लहान तुकडे होऊ नयेत, या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आणि आहे त्या तुकड्यांचे शक्य तितके एकत्रीकरण करून प्रत्येक तुकड्याचे सरासरी क्षेत्रफळ वाढवणे, हा या कायद्यामागचा उद्देश आहे. परिपत्रकानुसार १, २, ३ अशी गुंठ्यांमध्ये शेतजमीन खरेदी-विक्री करण्याला निर्बंध आले होते. आता हा निर्बंध उठविण्याचा मानस आहे. या निर्णयामुळे ज्या लोकांनी एक- दोन गुंठ्यांमध्ये जमिनीची खरेदी- विक्री केली त्यांचे व्यवहार नियमित होतील. जमिनीच्या त्या तुकड्यांचे फेरफार निघून सातबारा उताऱ्यावर मालकांच्या नावांची नोंद होईल. ज्यांनी कुणी जमिनीचा तुकडा घेतला असेल त्यांना त्यावर बांधकाम करता येईल किंवा त्याच्या आधारावर कर्जही घेता येऊ शकेल, असे सांगण्यात येते. नवीन कायद्यानुसार शेतरस्त्यासाठी, घरकुल योजनेतील घर बांधण्यासाठी, विहिरीसाठी जमिनीचा गुंठ्यांमध्ये व्यवहार करता येणार आहे. तसेच या कारणांसाठी शेतकऱ्यांना जमीन खरेदी-विक्री करता येणार आहे. राज्यात तुकडेबंदी कायद्याचा भंग करून ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत झालेले जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार चालू बाजारमूल्य दराच्या (रेडीरेकनर) पाच टक्के शुल्क आकारून नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे राज्यातील दोन- अडीच कोटी लोकांना मोठा दिलासा मिळण्याचा अंदाज आहे. मात्र १ जानेवारी २०२४ पासून आतापर्यंतच्या आणि यापुढील काळात होणाऱ्या गुंठेवारीतील बांधकामांचे काय, हा प्रश्न अद्याप अनुत्तरितच आहे. तुकडेबंदी कायद्यामध्ये अनेक पळवाटा काढण्यात आल्या होत्या. राज्यात तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन करून मोठ्या प्रमाणात जमिनीच्या खरेदी- विक्रीचे व्यवहार झाले आहेत. अशा व्यवहारांच्या सातबारा उताऱ्यावर 'तुकडेबंदी विरुद्ध व्यवहार' अशी नोंद करण्यात येत असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. अशा ठिकाणचे खरेदी- विक्री व्यवहार करताना अडचणी येत होत्या. राज्यातील महानगरांत आणि नव्याने विकसित होणाऱ्या - भागांत महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे जमिनीला सोन्याचे भाव आले आहेत. त्यामुळे रिअल इस्टेट क्षेत्रातील मध्यस्थांमार्फत शेतकऱ्यांना पैशाची भुरळ पाडून तुकड्या तुकड्यांत जमीन विकण्यास प्रवृत्त केले जाते. मात्र पुढे जमिनीचे किंवा जमिनीवर केलेल्या बांधकामातील सदनिकांचे खरेदी- - विक्री व्यवहार करण्यात कायदेशीर अडचणी येतात. एका सातबारा उताऱ्यावर अनेकांची नावे लागल्याचे सातबारा संगणकीकरण प्रकल्पाच्या कामावेळी निदर्शनास आले आहे. - तुकडेबंदी कायदा १९४७ सालचा असून, तो कालबाह्य झाला आहे. कायद्यात जमिनीचे तुकडे पाडण्यास बंदी असली तरी तुकडे पडणे थांबत नाही ही वस्तुस्थिती आहे. कारण परिस्थितीनुसार प्रत्येकाला गुंठा, दोन गुंठे जमीन लागते. प्रत्येक जण थेट २० गुंठे जमीन खरेदी करू शकत नव्हता. महसुलाशी संबंधित महत्त्वाच्या कायद्यांचा अभ्यास करण्यासाठी आणि आवश्यकतेनुसार महसूल कायद्यांमध्ये बदल करण्यासाठी शिफारशी सुचवण्याकरिता राज्य सरकारने निवृत्त सनदी अधिकारी उमाकांत दांगट यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. समितीने सरकारला तुकडेबंदी कायदा रद्द करण्याची शिफारस केली होती. अर्धा एकरपेक्षा कमी बागायती किंवा दोन एकरपेक्षा कमी जिरायती जमीन खरेदी-विक्रीला बंदी घालणारा तसेच एक-दोन गुंठे जमीन खरेदीस प्रतिबंध करणारा महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबतचा १९४७ हा तुकडेबंदी कायदा आता कालबाह्य झाला आहे. या कायद्यामुळे लोकांची मोठी अडचण होत असून तो रद्दच करावा, अशी महत्त्वपूर्ण शिफारस समितीने केली होती. जमिनीच्या तुकड्याचा खरेदी-विक्रीचा व्यवहार नियमित करण्यासाठी सरकारनं जारी केलेला अध्यादेश तात्काळ स्वरूपात अमलात येणार आहे. पण यासाठीची प्रक्रिया नेमकी कशी पार पडेल, याबाबत संभ्रम कायम आहे. एखाद्या निर्णयाची किंवा योजनेची कार्यपद्धती, अंमलबजावणी किंवा त्यासाठी लागणारी कागदपत्रे याबाबतची माहिती सरकारच्या शासन निर्णयात किंवा परिपत्रकात दिली जाते. पण तुकडेबंदी कायद्यातील या नवीन सुधारणेबाबत शासन निर्णय प्रसिद्ध झाल्याचं दिसत नाही. सध्या राज्यात निवडणूक असल्यामुळे आणि आचारसंहिता लागू असल्यामुळे तसा निर्णय येण्याचीही तूर्तास शक्यता नाही. असे असले तरी सरकारी अध्यादेशाला सहा महिने कायद्याचं स्वरूप असतं. जमिनीचा तुकडा नियमानुकूल करण्याच्या प्रक्रियेसाठी तहसीलदारांकडे अर्ज करता येऊ शकतो. अर्जासोबत जमिनीच्या व्यवहारांची कागदपत्रे जोडावी लागतील. यामध्ये जमिनीचा सातबारा उतारा, खरेदी खत, जमीन ज्या क्षेत्रात येते त्यानुसार जमिनीचं रेडीरेकनप्रमाणे मूल्य सांगणारा उतारा जोडावा लागेल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार राज्यात तुकडेबंदी लागू आहे. म्हणजे काय तर तुकडेबंदी कायद्यात नमूद केल्याप्रमाणे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी शेतजमीन विकत घेता येत नाही. याबाबतच्या परिपत्रकानुसार, १, २, ३ अशी गुंठ्यांमध्ये शेतजमीन खरेदी-विक्री करण्याला निर्बंध आले होते. या परिपत्रकाला विरोधही झाला होता. हे प्रकरण न्यायालयात गेले होते. त्यानंतर सरकारनं प्रसिद्ध केलेल्या राजपत्रानुसार राज्यातल्या सगळ्या जिल्ह्यांमध्ये जिरायत जमिनीसाठी २० गुंठे, तर बागायत जमिनीसाठी १० गुंठे एवढं तुकड्याचे प्रमाणभूत क्षेत्र नमूद करण्यात आले. पण बऱ्याचशा शेतकऱ्यांना विहिरीसाठी, शेतरस्त्यासाठी किंवा इतर काही कारणास्तव १, २, ३ गुंठ्यांमध्ये जमिनी खरेदी किंवा विक्री करावी लागते. त्यावर राज्य सरकारने तुकडेबंदी कायद्यात सुधारणा करीत काही बाबींसाठी गुंठेवारीची अट शिथिल केली होती. त्यानुसार विहिरीसाठी, शेतरस्त्यासाठी, सार्वजनिक प्रयोजनासाठी भूसंपादन केल्यानंतर किंवा थेट खरेदी केल्यानंतर प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी असलेल्या शिल्लक जमिनीसाठी आणि केंद्र-राज्याच्या ग्रामीण घरकुल योजनेच्या प्रयोजनासाठी या चार कारणांसाठी गुंठ्यांमध्ये जमिनीचा व्यवहार करता येणे शक्य झाले. आता सरकारने जमिनीचे तुकडे नियमानुकूल करण्याचा निर्णय घेतल्यानंतर तुकडेबंदी कायदा रद्द होणार का, असा सवाल आहे. दांगट समितीचा अहवाल सरकारने स्वीकारला, मात्र तुकडेबंदी कायदा रद्द करण्याच्या प्रक्रियेला विलंब लागणार आहे. असे असले तरी नागरिकांना दिलासा देण्यासाठी ३१ डिसेंबर २०२३ पर्यंन झालेले जमीन हस्तांतरण विभाजन व्यवहार नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वित्त विभागाने असे व्यवहार करण्यासाठी प्रचलित बाजारमूल्याच्या २५ टक्के शुल्क आकारून नियमित करण्याची भूमिका घेतली होती. मात्र ती अमान्य करून केवळ पाच टक्के शुल्क घेऊन हे व्यवहार नियमित करण्याचा निर्णय घेतला गेला असून, तो समाधानकारक मानावा लागेल.

# दिपावली: ज्ञानाच्या प्रकाशाने केलं, अज्ञानाच्या अंधाराचं दहन

दिपावली म्हणजे स्नेहाच्या-प्रेमाच्या प्रकाशाची उधळण होय.दिवाळी-दीपोत्सव म्हणजे खऱ्या अर्थाने आनंदाचा-प्रकाशाचा सण आहे.वास्तवात हा उत्सव समृद्धी देऊन मानवी जीवन प्रकाशमान करणारा आहे.वर्ष भरातल्या चिंता,भय,ताणतणाव,दुरावा, महामारी यांची मरगळ झटकून टाकत,नव्या उमेदीने जीवनाला सुखमय- आनंदमय करणारा हा सण आहे.अज्ञानाचा अंधार नाहिसा करून मानवी जीवनात ज्ञानाचा प्रकाश प्रज्वलित करण्याच्या उद्देशाने हा सण खऱ्या अर्थानं साजरा केला जातो.तात्पर्य,दीपावली म्हणजे मानवी जीवनातला दुःखरुपी अंधार नष्ट करणारा दीप मांगल्याचे प्रतिक आहे.सारांश,दीपोत्सव साजरा करणे म्हणजेच दीपावली साजरी करणे होय.

सोनपावलांनी येणाऱ्या दिवाळीच्या प्रत्येक दिवसाला आध्यात्मिक-सांस्कृतिक महत्व आहे.धनत्रयोदशीपासून ते भाऊबीजपर्यंत प्रत्येक क्षण न क्षण हर्षोल्हासात साजरा केला जातो.तथापि, दीपावलीचा शुभारंभ हा खऱ्या अर्थाने वसुबारस ने होत असून,सायंकाळी गाय- वासरूची पूजा करून त्यांना नैवद्य खाऊ घातले जाते. त्यानंतर धनत्रयोदशी ला देवापुढे धन,धान्य व धने ठेऊन त्याची पूजा करतात.अन् सायंकाळी दक्षिण दिशेला कणकेचे दिवे लावून त्यांची पूजा केली जाते.

नरक चतुर्दशी च्या दिवशी घरातील सर्व लहान-मोठे सदस्य पहाटे अभ्यंगस्नान करतात.अन् त्यानंतर अंगणात फटाके फोडतात.पौराणिक आख्यायिकेनुसार ह्याच दिवशी भगवान श्रीकृष्णाने नरकासुर राक्षसाचा वध केला होता.महत्वाचे म्हणजे ह्याच दिवशी लक्ष्मीपूजन देखील असून,वद्य अमावस्येला सायंकाळी लक्ष्मी-कुबेरचे पूजन केलं जातं.धन-धान्य समृद्धी व सौख्य नांदावं,हे त्याचं प्रतिक असतं.

त्यानंतर कार्तिक शुद्ध प्रतिपदेला असलेल्या बलिप्रतिपदा म्हणजेच ज्यास आपण दिपावली पाडवा असे म्हणतो.हा दिवस साडे तीन मुहूर्तापैकी एक असून,ह्या दिवशी कोणत्याही शुभ कार्याची सुरुवात केली जाते.या शुभ दिनी पत्नी ही पतीला ओवाळून त्यांच्यासाठी दीर्घायुष्य चिंतिते.तर तिला याप्रसंगी तिच्या आवडीची साडीचोळी वा दागदागिने भेट म्हणून दिली जातात.त्या नंतर भाऊबीज च्या दिवशी बहीण आपल्या भाऊरायाला ओवाळून पेढा भरवते अन् त्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी देवाला प्रार्थना करते.भाऊ पण बहिणीला



ओवाळणीप्रित्यर्थ तिच्या आवडीची भेटवस्तू देतो.या मंगलमय दिनी दागदागिन्यांची खरेदीही मोठ्या प्रमाणात केली जाते. वास्तवात हा सण म्हणजे आनंदाची पर्वणीच!

दीपावलीच्या चार-पाच दिवसांच्या काळात घरोघरी रोषणाई केली जाते.तसेच घरांच्या ओट्यावर-गॅलरीत मातीच्या पणत्या लावून सभोवतालचा परिसर प्रकाशमय केला जातो. वास्तवात हा दिव्यांचा- रोषणाईचा सण आहे.दीपावलीच्या काळात आपल्या आया-भगिनी अंगणात आकर्षक रांगोळ्या काढून सर्वांचे लक्ष वेधित असतात.रंगबिरंगी आकाश कंदिलांची उभारणी,नातेवाईक - मित्रमंडळीला फराळाची मेजवानी अन् फटाक्यांची आतिषबाजीमुळे तर सारा परिसर दुमदुमुन जातो.प्रत्येक जण पारंपरिक वेशभूषा करून इतरांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत असतो.चमचमीत फराळावर ताव मारून दिवाळीचा आनंद लुटण्याची मजा काही औरच असते. याशिवाय नातेवाईकांना-आप्तमित्रांना दिवाळीनिमित्त दिल्या जाणाऱ्या शुभेच्छांना तर पारावारच उरत नाही.ग्रीटिंग कार्ड देऊन वा मोबाईलद्वारे मेसेज पाठवूनही दीपावलीच्या शुभेच्छा व्यक्त केल्या जातात.येनकेनप्रकारे आपल्या मित्रांना,सगेसाईंना आपल्या दिपावली शुभेच्छा पोहोचविण्याचा हा सर्वंकष प्रयत्न असतो.

काळ कितीही बदलो,पण आगरी-कोळी समाजाची दिवाळी दरवर्षी पारंपरिक पद्धतीने मोठ्या धूमधडाक्यात साजरी होत असते.त्यांचं आपल्या पारंपरिक संस्कृतीशी घट्ट नातं आहे. मुंबई,ठाणे,कोकणातील भूमिपुत्रांची दिवाळी साजरी करण्याची पद्धत काही आगळीवेगळीच असते.बलिप्रतिपदेला हे लोक पारंपरिक पद्धतीने बैलांची मनोभावे पूजा करत असतात. आपल्या शेतीत भरपूर उत्पन्न निघो,

धनधान्याची भरभराट होवो,या पार्श्वभूमीवर आगरी-कोळी लोक इडा पिडा टळो,बळीचे राज्य येवो असे देवाला साकडे घालत भाताच्या पेंढ्या आपापल्या घरासमोर जाळत असतात. तसेच लक्ष्मी पुजनच्या दिवशी हे लोक रात्रीच्या वेळी तांदळाच्या पीठाची बैलाची प्रतिकृती तयार करून गावभर मिरवतात.अशा भव्यदिव्य पद्धतीने आगरी-कोळी लोक आपली दिवाळी साजरी करतात.दीपावलीच्या आगरी-कोळी बंधू-भगिनींना ठाणेकरांतर्फे हार्दिक शुभेच्छा!

बंधू-भगिनींनो,फटाक्यांची आतिषबाजी करताना ध्वनी प्रदूषण अन् वायू प्रदूषणाचे प्रमाण वाढू नये,याची प्रत्येकाने काळजी घ्यावी.खबरदारीचे उपाय म्हणून सुतळी बॉम्बसारखे धोकादायक फटाके लहान मुलांपासून दूर ठेवावेत. रुग्णांना त्रास होऊ नये,या दृष्टीने आपापल्या भागातील हॉस्पिटलच्या आवारात फटाक्यांची आतिषबाजी करू नये.आतंकवादी शक्तींचे दुष्ट मनसुबे समूळ नष्ट करण्यासाठी आपण सर्वधर्मीय नागरिक एकसंघ होऊया अन् आपला देश सर्वदृष्टीने बळकट करूया.

दिपावली हा पारंपरिक भारतीय सण मतभेद-मनभेद विसरून तुम्ही आम्ही सर्वजण आपली हजारो वर्षांपूर्वीची हिंदू संस्कृती व परंपरा अधिकाधिक समृद्ध करण्याचा एकदिलाने प्रयत्न करूया.खरं तर,दिपावली हा सण आता धर्ममर्यादा ओलांडून त्यानं राष्ट्रीय उत्सवाचे स्वरूप प्राप्त केलं, ही अभिमानाची गोष्ट आहे.यातूनच खऱ्या अर्थाने धार्मिक सहिष्णुता प्रस्थापित होऊन सर्वधर्मसमभाव च्या संकल्पनेस चालना मिळेल.मित्रहो,आपणा सर्वांना यंदाची दिपावली सुखा-समाधानाची,आनंदाची प्रकाशमय व भरभराटीची जावो,ही ईश्वर चरणी प्रार्थना!

- रणवीरसिंह राजपूत
ठाणे/नंदुरबार

# थेंबे थेंबे तळे साचे...

**(जगभर काटकसर किंवा बचत दिन 31 आक्टोंबर ला साजरा होतो. भारतात तो 30 आक्टोबरला साजरा होतो. या दिनाच्या निमित्ताने बचतीचा घेतलेला आढावा व या दिनाचे महत्व )**

जागतिक बचत बँकेत 1924 साली मिलान इटली येथे पहिली कॉंगेस भरली होती. या कॉंग्रेसमध्ये शेवटच्या दिवशी म्हणजेच 31 आक्टोंबर 1924 ला जागतीक बचत किंवा काटकसर दिन जगभर साजरा करण्याचा निर्णय घेतला गेला. त्याचा अंमल प्रत्यक्षांत 1925 साली झाला.

**थेंबे थेंबे साचे तळे, सुखी राहतील मुले बाळे ।**

याचा स्विकार अमेरिकेतील व स्पेनमधील बँकानी घेतला. या मागे नागरीकांचे जीवनमान सुधारणे हाच होता. 1921 सालीही अशा प्रकारचा प्रयत्न झाला होता. परंतु जर्मनी मध्ये 1923 मध्ये आलेल्या आर्थिक मंदीमुळे तेथील नागरीकांनी याकडे त्यावेळी पाठ फिरविली. त्यानंतर हळू हळू सुधारण होत गेल्याने तेथील नागरीकही कालांतराने समाविष्ठ झाले. नागरीकांचे जीवन सुखकर व्हावे, उतार वयांत आर्थिक तरतूद असावी, भविष्यांतील आर्थिक तरतूद, मुलांच्या शिक्षण व मुलींच्या लग्नासाठी लागणारे खर्च, आजारी व वृधत्वातील तरतूद, यासाठी बचत करणे महत्वाचे आहे. आपण एकदम काहीही करू शकत नाही. अनेक कुटुम्बात थोडे थोडे सोने घेण्याची प्रथा आहे. याचा उपयोग मुलींच्या लग्नाच्या वेळी होऊ शकतो. एकदम सोने घेणे शक्य होत नाही. थोडी थोडी बचत केल्यास त्याचा उपयोग मुला मुलींच्या शिक्षणासाठी सुध्दा होऊ शकतो. आज अनेक ठिकाणी खाजगी नोकरीत अशास्वतीचे जीवन असते. अशा वेळी काही अघटित घडल्यास व नोकरीला मुकावे लागल्यास अल्पबचतीचा उपयोग कामी येतो. काही वेळा गंभीर आजाराने ग्रासले जाते अशा वेळी या साठलेल्या पैशाचा उपयोग होतो. या द्रष्टीने अनेक बचत बँकेमध्ये अनेक प्रकारच्या बचतीच्या स्कीम आस्तित्वात असतात. भारतातील पोस्ट खाते या द्रष्टीने कार्यतत्पर आहे. दरमहा बचत खाते, रिकरिंग डिपॉझिट), सुकन्या बचत योजना इत्यादि. भारतात सुध्दा हा बचत दिन मोठ्या प्रमाणांत साजरा केला जातो. विविध प्रकारची पोस्टर्स, व हँडबिले यामधून प्रचार केला जातो. बँका जास्तीत जास्त बचत करावी या द्रष्टीने अनेक योजना जाहीर करतात जेणे करून नागरीक जास्तीत जास्त बचत करतील. या दिवशी अनेक सरकारी उपक्रमही सुध्दा आखले जातात व बचतील प्रोत्साहन दिले जाते. यामध्ये स्त्रियांच्या विविध संगठना, व्यावसायिक, शाळा, व खेळांच्या संघटना भाग घेतात. भारतात मात्र 1984 नंतर हा दिवस 30 आक्टोंबर ला साजरा केला जातो. 31 आक्टो 1984 ला पंतप्रधान इंदिरा गांधींचे निधन झाल्यामुळे त्यानंतर अल्पबचत दिवस 31 ऐवजी 30 ला साजरा करण्याचा निर्णय घेतला गेला. नॅशनल सेविंग्ज इन्स्टिट्युट देशांत विविध प्रकारचे बचत कार्यक्रम आखत असते. व नागरीकांना याचे महत्व पटवून देण्याचे महत्वाचे कार्य करत असते. अनेक शाळामधूनही मुलांना बचतीचे महत्व पटविले जाते 2014 नंतर मोदी सरकारने नागरीकांची बचत खाती उघडण्याचा महत्वकांक्षी निर्णय घेतला. यामुळे देशांत33 कोटीहून अधिक नागरीकांनी बँकेत खाती उघडली. व नागरीकांनी या खात्यात एक लाखाहून अधिक रुपयाची गुंतवणूक केली. अल्पबचतीमुळे वैयक्तिक फायदा होतोच... पण राष्ट्राला सुध्दा त्याचा फायदा होऊ शकतो. लोकमान्य टिळकांच्या कारकिर्दीत पैसा फंड कारखाना लोकांच्या कडून पै पै गोळा करून निर्माण केला गेला. हे बचतीचे ज्वलंत उदाहरण आहे. आपणही नियमित बचत करूया व आपल्या भावी काळाच्या सुखासाठी प्रयत्न करूया आपल्या बरोबर राष्ट्राचाही बचत निश्चितच होणार आहे

- शांताराम वाघ
पुणे

## पत्र मानस

### यंदाची दिवाळी महागाईने ग्रस्त जनता त्रस्त!

यंदा महागाई प्रचंड प्रमाणात वाढत आहे. महागाईने सर्वसामान्य जनता त्रस्त असून "राजकीय नेते. तूपाशी गरीब जनता उपाशी अशी स्थिती आहे. महागाई, बेरोजगारी, गरीबी वाढत असून गरीब माणूस गरीबच होत आहे. श्रीमंत माणूस अधिक श्रीमंत होत असून आर्थिक विषमत्त प्रमाणात वाढत आहे. त्यात दिवाळीत फटाक्यांमुळे हवा आणि ध्वनी प्रदूषण वाढण्याचा धोका आहे. पर्यावरणाचा तोल धासळत आहे. निसर्गात पर्यावरणपूरक संतुलन, वातावरण बिघडत असून दिवाळी खरेदीसाठी तसेच निवडणुकीमुळे सर्वत्र गर्दीच गर्दी दिसत आहे. तसेच दैनंदिन प्रवासात सर्वांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. रेल्वे प्रवासात प्रचंड गर्दी, खचाखच भरुन येणाऱ्या लोकल गाड्या जीवघेणा प्रवास ठरत आहे.रस्ते वाहतूकीत अपघातांचे प्रमाण वाढतच आहे. वाहतूक कोंडीमुळे वाहनचालकांना प्रवाशांना प्रवास करणे दिवसेंदिवस कठीन होत आहे. महागाई नियंत्रणात आणली पाहिजे. आर्थिक विषमता दूर केली पाहिजे. दिवाळीत फटाक्यामुळे हवा आणि ध्वनी प्रदूषण कमी करणाचा प्रयत्न करणे,वाहतूक कोंडीची जटिल समस्या युद्ध पातळीवर सोडविली गेली पाहिजे, सरकारने महागाईची समस्या युद्ध पातळीवर सोडविली पाहिजे.

**- शशिकांत रा सावंत, डोंबिवली**

### यंदाची राजकीय दिवाळी आनंदी आनंद..

महाराष्ट्र राज्यात २०२४ विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीची धामधूम सुरू आहे.राजकीय पक्ष सुद्धा आपल्या पक्षात मनीपावर,मसलपावर असलेल्या नेत्यांच्या स्वागतासाठी सर्व निर्बंध बाजुला ठेवून आतूर आहेत. आज तो येथे आहे,उद्या तो कुठे असेल सांगणे कठीण तरीही उमेदवारास उमेदवारी देऊ पुढे चालले आहेत.तत्कालीन निवडणूक आयुक्तांनी निवडणूक प्रचार करण्याच्या पद्धतीत अनेक बदल केले होते. उमेदवारांच्या प्रचारार्थ भिंती रंगवू नयेत, बॅनरबाजी बंद , गाड्यांवर लाऊडस्पीकर लावून घोषणा बाजी बंद इतक्या प्रथा बंद केल्या.आताच्या निवडणूक आयोगाकडून एक अपेक्षा आहे.उमेदवार नामनिर्देशन पत्र भरण्यासाठी जातो तेव्हा त्याच्या सोबत सूचक, अनुमोदक महत्वाचे आहेत. ते असावेत पण हजारो समर्थनार्थ लोक आणण्याची गरज काय ? आधीच रस्ते अरुंद, रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहने उभी असतात. उमेदवार मिरवणुकीने येणार म्हणून महत्वाचे रस्त्यावरील दररोजच्या वाहतुकीत बदल,नाका बंदी, कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी अधिकचा पोलीस बंदोबस्त वाढवावा लागतो.ग्रामीण भागातील लोकांच्या हालांना पारावार नाही. राजकीय गणिते जमवण्यासाठी मतदारांना खूष ठेवण्यासाठी जे जे करता येईल ते चालू आहे.निवडणूक अधिकार्यांनी जप्त केलेल्या रक्कमांचे आकडे कोट्यांतील आहेत. पूर्वी राजकीय पक्षांकडून दिवाळीत रवा,साखर,मैदा मोफत वाटत असत. आता ते दिवस गेले आता रोखीत व्यवहार होतात. दिवाळीत फटाके वाजवणे वेगळाच आनंद असतो.पैसे खर्च होतात हे माहीत असूनही महागडे फटाके फुटतात. आकाशात उंच जावून फुटणारे फटाके अधिक धोकादायक आहेत. फटाक्यांचा धूर प्राणवायू दुषित करतो,आवाजाचे प्रदुषण वाढते.हे माहीत असून देखील सरकार यावर निर्बंध आणीत नाही,हे विशेष. निवडणूक काळातील वाहतूक कोंडीवर उपाय शासनानेच काढावेत.गोरगरीबांना लक्ष्मी लाभो आणि दिवाळी आनंदाची जावो याच शुभेच्छा.

**- महादेव गोळवसकर, कुर्ला**

### लोकशाहीची निवडणुक घराणेशाहीच्या व परिवारांच्या पथ्यावर ?

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची धामधुम जोरात सुरू आहे. उमेदवारीचा फॉर्म भरणे, प्रचार करणे, सभा घेणे ,भेटीगाठी करणे सारे सुरू आहे. निवडणुकीत घराणेशाहीच्या नातलगांची परिवारांची परस्पर विरोधी पक्षीय निवडणुक लढवणे , चुरशीची करामत पहायला मिळणार आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाले तेच मुळात काही लोकांसाठीच आहे की काय ?असे वाटायला लागले आहे. बाप ,आजी माजी नगरसेवक, आमदार, खासदार, मंत्री असतात. त्यामुळे निवडणुकीच्या रिंगणात काका विरूद्ध पुतण्या , वडील विरूद्ध मुलगा, पती विरूद्ध पत्नी याशिवाय नात्या नात्याच्या विरोधात विरूद्ध पक्षीय निवडणुक लढवली जात आहे. आपला मुलगा किंवा मुलगी किंवा बायको आमदार किंवा मोठा राजकीय पुढारी व्हायला हवा. यासाठी ताकदीनिशी शक्य तेवढे प्रयत्न केले जातात. वेळ प्रसंगी कसलीही तमा न बाळगता पक्ष निष्ठा बाजुला ठेवुन पक्ष बदलतो. करोडो रूपये खर्च करून उमेदवारीचे तिकीट आणतो. पक्ष फंडाला पैसे देतो. इतके काही यशस्वी मनासारखे झालेच नाही तर अपक्ष निवडणुकीची धमकी दिली जाते. एकंदरीत काय तर , निवडणुकीत पाण्यासारखा पैसा ओतला जातोय.. काहीही करून आपल्या मुलाला किंवा मुलीला किंवा बायकोला निवडुन आणण्याचा प्रयत्न होतोय. हा विचित्र गोतावळाच देशाच्या लोकशाहीच्या वाट्याला आला आहे. आज एकेका कुटुंबात बाप शिवसेनेत तर मुलगा मनसेत, काका राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये तर पुतण्या राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये असल्याने घराघरातच पक्षीय राजकारण पहायला मिळत आहे. याच जागी त्याच्या विरोधात उभा असलेला सर्वसामान्य उमेदवार पैशाच्या अभावामुळे निवडणुक हारतो निवडुन आलाच तर त्याच्या विरोधात कोर्टात केस टाकुन जेरीस आणले जाते. आज ठाकरे परिवार असो, राणे परिवार असो , भुजबळ परिवार असो, चव्हाण परिवार असो. यांच्या घरातला एक किंवा दोन किंवा त्यापेक्षा जास्तच व्यक्ती राजकीय पदावर म्हणजेच नगरसेवक, आमदार, खासदार, किंवा मंत्री असलेले दिसुन आलेली पहायला मिळत आहेत. घराणेशाही व परिवारवादात आपले स्थान जमवुन ठेवले जाते . त्यामुळे कार्यकर्त्याकडुन वर्षानुवर्षे संदरंज्या उचलणे, पोस्टर लावणे हीच कामे करवुन घेतात. निष्ठावान कार्यकर्ते विकले जातात किवा गप्प केले जाते सद्या हेच राजकारणात सर्रास चालले आहे. पक्ष निवडुन येण्यासाठी नियतीने हेच करायला भाग पडले आहे.घराणेशाही व परिवारवाद हा तर सर्वसामांन्यासाठी मोठा अडसर आहे.

**- अनंत दत्taराम दाभोळकर, अंधेरी**

### सणासुदीच्या दिवसात दूध कसे महाग होते?

वर्षभरात गाई- म्हशीच्या दूधाची निर्मिती तेवढी होते तेवढे दूध ग्राहकांना वितरित होते.पण, जेव्हा हिंदू,मुस्लिम धर्मियांचे सण असतात तेव्हा दुधाची अधिक मागणी असते.काही वर्षापूर्वी महानंदा दूध डेअरी दररोज अकरा लाख लिटर दूध संकलीत करीत होती आता,हा आकडा लाख - दिड लाखावर आला. अशीच स्थिती अन्य डेरींची आहे.गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दसरा,दिवाळी,रमजान ईद इत्यादी सणांत खवा,मावा,श्रीखंड, आम्रखंड, लोणी,मिठाई आणि तत्सम खाद्यपदार्थांसाठी दूध कमी पडले,दुधाचा तुटवडा आहे अशा बातम्यांतून कधीच समजले नाही मग,सणासुदातील दुधाचा अधिकचा पुरवठा कोठून होतो ? बर्याचदा दुधात भेसळ झाल्याची प्रकरणे उघडकीस आल्यानंतर अन्न व औषध महामंडळ प्रशासन दखल घेऊन कारवाई करते.भेसळ दुध किंवा दुग्धजन्य पदार्थ बाजारात येतातच कसे ?शासनानेच कायदेशीर कारवाई करून भेसळ थांबवावी.

**- महादेव गोळवसकर, कुर्ला** ■

## दिवाळीनिमित्त फटाका विक्रीकरिता उच्च न्यायालयाच्या नियमांचे पालन व्हावे - आयुक्त

**भाईंदर :** मिरा भाईंदर महानगरपालिकेने मा. आयुक्त श्री. संजय काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली यंदा दिवाळी सणानिमित्त फटाका विक्री करिता मा. उच्च न्यायालयाच्या नियमांचे तंतोतंत पालन व्हावे व ही दिवाळी अगदी सुरक्षितपणे साजरी करता यावी या करिता शहरात महापालिकेने ठरवुन दिलेल्या जागांवर व खाजगी मोकळ्या भुखंडात फटाका विक्रीस परवानगी देण्याचे धोरण हाती घेतले आहे. सदर धोरणाची अंमलबजावणी अगदी काटेकोरपणे व्हावी याकरिता आज महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने अनधिकृतपणे फटाका विक्री व्यवसाय करणाऱ्या व्यवसायांवर कडक कारवाई केली. संपुर्ण दिवसभर सुरु असलेल्या या कारवाईत अग्निशमन विभागाने अनधिकृतपणे फटाका विक्री व्यवसाय करणाऱ्या दुकानीतील फटाक्यांचा मालावर अग्निशमन वाहनातील पाणी मारुन फटाके निकामी केले, तसेच काही ठिकाणी माल जप्त करण्यात आला व जप्त केलेला माल साठवुन न ठेवता तो माल जमिनीत पुरण्याची कारवाई करण्यात आली.



## महत्त्वाचे

### गतिमंद मुलांचा कौशल्य विकास

**पनवेल :** येथे डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक असक्षम मुलांची विशेष शाळा १९९५ पासून चालविण्यात येत आहे. विशेष विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून त्यांचे निदान व उपचार, विशेष शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण देणारी ही पहिली शाळा ठरली आहे. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, शारीरिक, विकासाबरोबर त्यांना व्यावसायिकदृष्ट्या सक्षम करणे हा शाळेचा उद्देश आहे. या मुलांनी दिवाळीसाठी लागणारे साहित्य तयार करून खऱ्या अर्थाने दीपोत्सव साजरा केला आहे.शाळेमध्ये सध्या ११० विद्यार्थी थेरपी, विशेष शिक्षण व प्रशिक्षण घेत आहेत. शाळेच्या व्यावसायिक विभागामध्ये विविध वस्तू बनविल्या जातात. यामध्ये विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास करताना समाजात सामान्य व्यक्तींप्रमाणे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करणे हा मुख्य उद्देश आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली दिवाळीसाठी पणत्या, आकाश कंदील, उटणे, इन्स्टन्ट रांगोळ्या, आकर्षक तोरणे, आर्टिफिशियल ज्वेलरी, कापडी बॅग, की होल्डर, होममेड साबण, वाती, टी कोस्टर, अगरबत्ती, अगरबत्ती स्टॅन्ड, स्वस्तिक, पेपर बॅग, कंठी, घुंगुर कड्या अशा सुंदर वस्तू तयार केल्या आहेत. या विशेष विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या उत्पादनांना व्यावसायिक बाजार उपलब्ध व्हावा यासाठी विविध संस्था, सामाजिक क्लब यांनी आयोजित केलेल्या दिवाळी मेळाव्यामध्ये स्टॉल लावून सहभागी होतात.

### स्कायवॉकवर प्रवाशाला चोरट्यांनी लुटले

**कल्याण :** कल्याण रेल्वे स्थानकातील स्कायवॉकवर रात्रीच्या वेळेत एका २१ वर्षाच्या तरूणाला दोन अनोळखी तरूणांनी लुटले. चोरट्यांनी प्रवासी तरूणाजवळील पिशवी, मोबाईल असा एकूण सात हजाराहून अधिक रकमेचा ऐवज चोरून नेला आहे. पोलिसांनी सांगितले, तक्रारदार मेहरान मेमन कल्याण रेल्वे स्थानकातील स्कायवॉकवरून फलाटाच्या दिशेने येत होते. ते मोबाईलवर बोलत होते. मेहरान चालत असताना त्याच्या पाठीमागून तो अनोळखी तरूण आले. त्यांनी मेहरान यांना काही कळण्याच्या आत हाताचा ठोसा त्याच्या डोक्यात मारला. अचानक घडलेल्या या प्रकाराने तक्रारदार घाबरला. मारहाण करणारे तरूण मेहरान याच्या जवळील पिशवीची मागणी करू लागले. त्याने पिशवी देण्यास नकार दिला.

### दूषित पाण्यामुळे कुंडलिका नदीतील मासे मृत्यूमुखी

**रोहा :** महाराष्ट्र औद्योगिक वसाहती धाटाव औद्योगिक क्षेत्रांमधील कारखान्यांचे सामाईक प्रक्रिया केंद्राद्वारे राजरोसपणे विसर्ग करण्यात आलेलया प्रदूषित पाण्याने डावा तीर कुंडलिका नदी पात्रातील जिवंतमासे मृत्यूमुखी पडून पाण्यावर तरंगू लागले आहेत. शिवाय प्रदूषित पाण्यामुळे हजारो एक्कर जमीन नापीक झाली व भातशेतीचे मोठे नुकसान झाले असून, कोळी बांधवांचा पारंपरिक मासे व्यवसाय धोक्यात येऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. याबाबत स्थानिक भूमिपुत्र तथा कोळी महासंघ, कोळी समाज होडी-पागी बांधव आक्रमक झाले आहेत.

# ठाण्यात जोरदार शक्तिप्रदर्शन करत मुख्यमंत्र्यांनी भरला अर्ज

## सहपरिवार अर्ज केला दाखल

**प्रतिनिधी**
**ठाणे**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी आज कोपरी पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे कुटुंबीय आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक मुख्यमंत्र्यांचे वडील वडील संभाजी शिंदे, पत्नी सौ. लता शिंदे, सून सौ. वृषाली



शिंदे, नातू रुद्रांश तसेच हेदेखील उपस्थित होते.

ठाण्यात जोरदार शक्तिप्रदर्शन करत एकनाथ शिंदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केलाय. एकनाथ शिंदे यांना पाठिंबा देण्यासाठी शिवसेनेचे अनेक नेते आणि कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

कोपरी-पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघातून एकनाथ शिंदे यांच्याविरोधात ठाकरेंच्या शिवसेनेचे केदार दिघे हे निवडणूक लढवीत आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मंगळवारी शेवटची तारीख आहे. विधानसभेच्या निवडणुका 20 नोव्हेंबरला होणार असून, 23 नोव्हेंबरला सर्व 288 मतदारसंघांसाठी मतमोजणी होणार आहे. 2019 च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला 105 जागा, शिवसेनेला 56 आणि काँग्रेसला 44 जागा मिळाल्या होत्या. 2014 मध्ये भाजपाला 122, शिवसेनेला 63 आणि काँग्रेसला 42 जागा मिळाल्या होत्या.

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी आज बारामती विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. अजित पवार यांचे पुतणे आणि शरद पवार यांचे नातू युगेंद्र पवार हेही बारामती मतदारसंघातून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहेत. त्यामुळं बारामतीत यंदा अजित पवार विरुद्ध युगेंद्र पवार असा काका-पुतण्यातील सामना पाहायला मिळणार आहे.

# ठाण्यातील तिन्ही जागा महायूतीच्याच

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा विश्वास




**प्रतिनिधी**
**ठाणे**

ठाणे आधीही भगवे होते आणि पुढेही भगवेच राहणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे रेकॉर्डब्रेक मतांनी विजयी होतील आणि ठाण्यातील तिन्ही जागा महायूतीच्याच निवडून येतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केला. सोमवार, २८ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फडणवीसांच्या उपस्थितीत कोपरी-पाचपाखडी विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्या समर्थनार्थ भव्य रॅली काढण्यात आली होती.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ठाण्यातील सर्व रेकॉर्ड तोडणार आहेत. ठाण्यातील भाजपच्या दोन आणि शिवसेनेची एक या तिन्ही जागा प्रचंड बहुमताने निवडून येतील. संपूर्ण ठाणे महायूतीच्या मागे उभे राहिल. ठाणे आधीही भगवे होते आणि पुढेही भगवेच राहणार आहे."

***धर्मवीर आनंद दिघेंचा वारसा शिंदेंकडेच!***

*ते पुढे म्हणाले की, "केवळ रक्ताच्या नात्याने वारसा येत नाही. वारसा विचाराने आणि कृतीने येतो. त्यामुळे विचाराने आणि कृतीने धर्मवीर आनंद दिघेंचा वारसा एकनाथ शिंदेंकडेच आहे. आम्ही प्रत्येक निवडणूकीकडे आव्हान म्हणून पाहतो. लोक पुन्हा आमच्याकडे सत्ता देतील. मुंबई महायूतीची ताकत आहे. त्यामुळे मुंबई मोदींजींच्या सोबत आहे. देशातील ५२ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात आल्याने विरोधकांच्या पोटात दुखत आहे. त्यामुळे हे काँग्रेसी गुजरातचे अँबॅसिडर बनले आहे. हिंदूत्व हा आमच्यासाठी निवडणूकीचा नाही तर जगण्याचा मुद्दा आहे," असेही ते म्हणाले.*

# लोकशाहीला मजबूत करा ; मतदानाचा हक्क बजावा

## जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे आवाहन

**प्रतिनिधी**
**उरण**

लोकशाही मजबूत बनविण्यासाठी आपण मतदान करणे गरजेचे आहे. मत आपला अधिकार आहे तशीच आपली जबाबदारी देखील आहे म्हणून प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क प्राधान्याने बजावणे नितांत गरजेचे असल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

१९० उरण विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रियेचा आढावा घेण्यासाठी रायगड जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी उरण जासई येथील निवडणूक केंद्राला नुकताच भेट दिली तसेच निवडणूक प्रक्रियेचा आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, निवडणूक निर्णय अधिकारी जनार्दन कासार, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार डॉ उध्दव कदम, शासकीय अधिकारी, पोलीस अधिकारी उपस्थित होते.यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार डॉ उध्दव कदम, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा गटविकास अधिकारी समीर वाठारकर, सहाय्यक निवडणूकनिर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी समीर जाधव, पोलीस अधिकारी व कर्मचारी ही उपस्थित होते.

# नागरिकांच्या भेटी घेऊन मतदान करण्याविषयी जनजागृती

**प्रतिनिधी**
**भाईंदर**

20 नोव्हेंबर रोजी होणा-या निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यादृष्टीने 150 व 151 विधानसभा निवडणूक कार्यालयांप्रमाणेच नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार स्वीपचे नोडल अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली विविध पातळयांवर मतदार जनजागृती करण्यात येत असून त्याकरिता वेगवेगळया माध्यमांचा वापर करण्यात येत आहे.

या अनुषंगाने ऐरोलीमध्ये से 5 येथील सरस्वती विद्यालयाच्या वतीने परिसरात जनजागृती रॅली काढून नागरिकांपर्यंत मतदान करण्याचा संदेश व आवाहन पोहचविण्यात आले.

त्याचप्रमाणे सकाळच्या वेळी उद्यानांमध्ये जॉगींग करण्यासाठी व योगासने करण्यासाठी मोठया प्रमाणावर नागरिक उपस्थित




असतात हे लक्षात घेऊन स्वीप पथकाने सेक्टर 10 ऐरोली येथील उद्यानात नागरिकांची भेट घेऊन त्यांना मतदानाचे महत्व पटवून दिले तसेच 20 नोव्हेंबरला मतदान करण्याचे आवाहन करीत मतदार प्रतिज्ञाही घेण्यात आली.

अशाच प्रकारे सेक्टर 5 येथील भाजी मार्केटमध्ये भाजी विक्रेते व खरेदी करण्यासाठी येणारे ग्राहक यांच्या भेटी घेऊन स्वीप पथकाने मतदान करण्याविषयी आवाहन केले व मतदान हे आपले कर्तव्य असल्याची जाणीव करुन दिली.

याशिवाय बेलापूर व ऐरोली या दोन्ही मतदार संघाच्या स्वीप पथकांनी रविवार सुट्टीचा दिवस असल्याने सोसायट्यांमध्ये रहिवाशांच्या भेटी घेऊन प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजावावा यासाठी व्यापक जनजागृती केली.

# संदीप नाईक यांनी प्रवेश करताच मंगेश आमले लढणार अपक्ष

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटात बंडखोरी

**प्रतिनिधी**
**नवी मुंबई**

तुम्ही घर पाडायचे ते आम्ही बांधायचे कौल चढवायचे आणि पुन्हा ते घर आदेश येताच तुमच्या ताब्यात द्यायचे हे आता चालणार नाही. असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते मंगेश आमले यांनी खंत व्यक्त करत अपक्ष बेलापूर विधानसभा लढण्याचा निर्णय त्यांनी वाशीतील मेळाव्यात जाहीर केला. मला निवडणुकीची तयारी करा असा आदेश आला मात्र अचानक संदीप नाईक यांनी प्रवेश करताच मला बाजूला सारले असा दावाही त्यांनी केला




नवी मुंबईत गेल्या काही दिवसात सातत्याने धक्कादायक राजकीय घडामोडी घडत आहेत. भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या पाठोपाठ आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते मंगेश आमले यांनीही बंडाचे निशाण फडकावले आहे. आज वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात पार पडलेल्या मेळाव्यात त्यांनी अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला आहे.

अनेक वर्षांपासून राष्ट्रवादीचे काम करत आहे. २०१९ मध्ये एका कुटुंबाने दुसऱ्या पक्षात प्रवेश केल्याने राष्ट्रवादी रिकामी झाली त्यावेळी आम्ही १० लोक शरद पवार यांना भेटून आम्ही पक्ष पुन्हा उभा करू असे पवारांना आश्वासीत केले. पक्षाच्या पडत्या काळात संघटन केले जागावले. २०१९ मध्ये कामाला लागा म्हणून सांगितले अचानक शांत बसण्यास सांगितले या वेळेससुद्धा निवडणूक कामाला लागा सांगण्यात आले, जोमाने कामाला लागलो, घरोघरी तुतारी पोहचवली.

# पोलीस स्टेशनमध्ये गोळीबार करणाऱ्याला बक्षीस म्हणून उमेदवारी

## महेश गायकवाड यांचा भाजपला टोला

**प्रतिनिधी**
**कल्याण**

कल्याण पूर्व मतदार संघात महायुतीत आज बंडाची ठिणगी पडली आहे. महायुतीकडून भाजपने गणपत गायकवाड यांच्या पत्नी सुलभा गायकवाड यांना उमेदवारी दिल्यानंतर शिवसेना शहर प्रमुख महेश गायकवाड यांनी शक्ती प्रदर्शन करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. कल्याण पूर्वेत ज्यांनी भ्रष्टाचार केला. पोलीस स्टेशनमध्ये गोळीबार केला; अशा व्यक्तीला बक्षीस म्हणून उमेदवारी दिल्याचा टोला त्यांनी यावेळी भाजपला लगावला.

कल्याण पूर्व मतदार संघात भाजपा उमेदवार सुलभा गायकवाड यांच्या विरोधात शिवसेना शहर प्रमुख यांनी आज अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून रणशिंग फुंकले आहे. यावेळी



बोलताना महेश गायकवाड यांनी गेल्या पंधरा वर्षात कल्याण पूर्वेत विकास झालेला नाही नाकर्तेपणा आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात ही लढाई आहे. कल्याण पूर्व येथील जनतेने ही निवडणूक सामान्य माणसाच्यावतीने लढण्यास सांगितले म्हणून लढत असल्याचे स्पष्ट केले.

वरिष्ठांनी सांगितलं युतीचा धर्म पाळा. मात्र खासदार श्रीकांत शिंदे निवडणूक लढवत होते. तेव्हा ते जिंकणार होतेच, मात्र आजचा उमेदवार या उबाठा उमेदवाराच्या गळाभेट करत होत्या. त्यांचा सर्रास प्रचार करत होत्या. त्यामुळे त्यांनी आम्हाला बंडखोरीची भाषा आणि कोणती भाषा शिकवू नये असा टोला लगावला.

# वंचितच्या उमेदवारावर बलात्काराचा गुन्हा दाखल

**प्रतिनिधी**
**उल्हासनगर**

वंचितचे घोषित उमेदवार संजय गुप्ता यांच्यावर नवीमुंबई एपीएमसी पोलीस ठाण्यात शनिवारी बलात्काराचा गुन्हा दाखल झाला. गुप्ता यांनी सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल करून आपल्याला फसविले असल्याचे म्हटले आहे. तसेच सोमवारी त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

उल्हासनगर मतदारसंघातून



वंचित बहुजन आघाडीने संजय गुप्ता यांची उमेदवारी गेल्या आठवड्यात घोषित केली. दरम्यान २६ ऑक्टोबर रोजी शनिवारी नवीमुंबई एपीएमसी पोलीस ठाण्यात त्यांच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल झाला. पीडित महिला उल्हासनगर पूर्वेत राहणारी असून तिला बिझनेस सेट करून देतो. असे आमिष दाखवून ऑगस्ट मध्ये अत्याचार केल्याचे महिलेने तक्रारीत म्हटले आहे. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुप्ता यांच्यावर गुन्हा दाखल झाला असून पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत. गुप्ता हे शहरातील भाजप उत्तर भारतीय सेलचे अध्यक्ष होते.

# 134 कामगारांना मुक्त न करणाऱ्या साहाय्यक आयुक्तांना शिस्तभंग कारवाईच्या नोटिसा

**प्रतिनिधी**
**कल्याण**

कल्याण डोंबिवली पालिकेतील अनेक वर्ष एकाच प्रभागात ठाण मांडून बसलेल्या दहा प्रभागातील फेरीवाला हटाव, अतिक्रमण नियंत्रण पथकातील १३४ कामगारांच्या बदल्या अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी केल्या आहेत. हे बदली कामगार प्रभागातील अनुभव कर्मचारी असल्याने प्रभागातील साहाय्यक आयुक्त त्यांना मुक्त करण्यास किंवा नव्याने येणारे बदली कामगार हजर करून घेण्यास टाळाटाळ करत आहेत.

बदली करूनही अनेक कामगार आपल्या बदलीच्या ठिकाणी साहाय्यक आयुक्तांच्या नाकर्तेपणामुळे हजर होत नसल्याची बाब अतिरिक्त आयुक्त गायकवाड, उपायुक्त अवधूत तावडे यांच्या निदर्शनास आली. उपायुक्त तावडे यांनी दहा प्रभागातील साहाय्यक आयुक्तांना कारणे दाखवा नोटीस बजावून आपल्या प्रभागातील



बदली झालेल्या फेरीवाला हटाव, अतिक्रमण नियंत्रण पथकातील कामगारांना तातडीने मुक्त करण्याचे आणि बदली होऊन प्रभागात दाखल होणाऱ्या कामगारांना तातडीने हजर करून घेण्याचे आदेश दिले आहेत. आयुक्तांनी कामगारांचे बदली आदेश काढले की बदलीच्या ठिकाणी हजर व्हायचे नाही. राजकीय दबाव आणून बदली रद्द करून घेण्याची कल्याण डोंबिवली पालिकेतील अनेक वर्षाची प्रथा आहे.

# पर्यावरणपूरक व प्लास्टिकमुक्त दिवाळी साजरी करा!

## महानगरपालिकेचे आवाहन

**प्रतिनिधी**
**नवी मुंबई**

नाविन्यपूर्ण उपक्रमांव्दारे स्वच्छतेमध्ये नेहमीच आघाडीवर असणा-या नवी मुंबई शहरातील जागरुक नागरिकांनी भारतातील सर्वात मोठा सण असणारा दिवाळी उत्सव हा 'पर्यावरणशील, फटाकेमुक्त व प्लास्टिकमुक्त' साजरा करण्याविषयी नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने जाहीर आवाहन करण्यात आले असून यादृष्टीने महानगरपालिकाही तशा प्रकारची कार्यवाही करीत आहे.

दिवाळीपूर्वी नागरिक मोठया प्रमाणात आपल्या घराची साफसफाई करत असतात. अशावेळी नागरिकांनी आपल्याला नको असलेल्या, टाकून देणार असलेल्या वस्तू नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने शहरात 92 ठिकाणी उभारलेल्या 'थ्री



आर' सेंटरमध्ये आणून ठेवाव्यात, जेणेकरून त्या गरजूंपर्यंत पोहचून त्यांची दिवाळी आनंदात जाईल तसेच उर्वरित कच-याची विल्हेवाट लावणे सोयीचे ठरेल असे आवाहन करण्यात आले आहे.

शहर स्वच्छ ठेवण्यात स्वच्छतामित्र आणि स्वच्छतासखींचे फार मोठे योगदान असून कच-याचे वर्गीकरण करण्यातून तसेच महानगरपालिकेने निश्चित केलेल्या योग्य जागी कचरापेट्यांमध्ये योग्य प्रकारे कचरा टाकण्यातून आपल्या स्वच्छताकर्मींना करावे लागणारे अतिरिक्त काम कमी करून दिलासा द्यावा असे आवाहन आहे. तसेच कोणत्याही प्रकारे उघड्यावर कचरा जाळून वायू प्रदूषण वाढू न देण्याची खबरदारी घ्यावी असेही आवाहन करण्यात आलेले आहे.दिवाळीपूर्वी शहर स्वच्छतेची विशेष सखोल स्वच्छता मोहीम आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून शहरातील मुख्य मार्गांवरील दुभाजकांचे कॉर्नर्स व पदपथ येथील गाळ सुकून झालेली माती काळजीपूर्वक साफ करण्यात येत आहे. याकरिता मॅकेनिकल स्विपींग वाहने तसेच वॉटर स्प्रेईंग वाहने यांचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. यामध्ये अग्निशमन विभागाचेही विशेष सहकार्य मिळत आहे. पावसाळी कालावधीत पावसासोबत वाहून आलेली माती रस्त्यांच्या कडेला गाळ स्वरुपात जमा होते व पाऊस थांबल्यानंतर वाहनांच्या रहदारीमुळे हवेत उडून प्रदूषणात वाढ होते. ही बाब लक्षात घेत ही रस्त्यांच्या कडेला साचलेली माती जमा करण्यात येत असून त्यानंतर या रस्त्यांची जेटींग मशीनव्दारे पाणी मारुन सफाई करण्यात येत आहे.

# दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त सामुहिक प्रतिज्ञा ग्रहण

**प्रतिनिधी**
**नवी मुंबई**

केंद्रीय दक्षता आयोगाने जाहीर केल्यानुसार नगरविकास विभागाच्या परिपत्रकानुसार 28 ऑक्टोबर ते 3 नोव्हेंबर 2024 या कालावधीत 'दक्षता जनजागृती सप्ताह (Vigilance Awarness Week)' साजरा करण्यात येत आहे.

'सत्यनिष्ठेच्या संस्कृतीच्या माध्यमातून राष्ट्रसमृध्दी (Culture of Intergrity for Nation's Prosperity)' या संकल्पनेनुसार 'दक्षता जनजागृती सप्ताह' साजरा करण्यात येत असून नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयामध्ये आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांच्या समवेत विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी यांनी मुख्यालयातील ॲम्फीथिएटर येथे भष्टाचार निर्मूलनाची सामुहिक प्रतिज्ञा ग्रहण केली.

याप्रसंगी सुरुवातीला दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त महाराष्ट्र



राज्याचे राज्यपाल श्री.सी.पी राधाकृष्णन यांचा शुभेच्छा संदेश वाचून दाखविण्यात आला. यावेळी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी अधिकारी, कर्मचारी यांच्याशी संवाद साधताना सजग नागरिक आणि जबाबदार अधिकारी या दोन्ही भूमिका पार पाडताना कार्यपध्दतीत सुधारणा, कर्तव्यनिष्ठा व सचोटी राखली आणि आत्मचिंतन करुन शासकिय कामकाज, दैनंदिन व्यवहार व वर्तणूक यामध्ये सुधारणा केली तर त्याचा फायदा संस्था तसेच समाजाला होईल असे मत व्यक्त केले. दक्षता जनजागृती सप्ताह आपल्याला जबाबदार अधिकारी व शासकिय प्रतिनिधी म्हणून कर्तव्य पार पाडण्याची जाणीव करुन देणारा असल्याचे सांगत त्यानुसार आपण नियमितपणे वर्तणूक ठेवली पाहिजे असेही आयुक्त म्हणाले. 'आपल्या देशाच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक प्रगतीमध्ये भ्रष्टाचार हा प्रमुख अडथळा आहे.

## मुख्य बाजारपेठेत प्रचार रॅलीने होतेय वाहतूक कोंडी

**नाशिक :** विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याकरीता इच्छुक उमेदवारांनी आठवड्याचा पहिला दिवस सोमवारचा (ता. २८) मुहूर्त निवडला. परंतु त्यामुळे ऐनदिवाळीच्या खरेदीमुळे गजबजलेल्या बाजारपेठा इच्छुकांच्या रॅलीने वाहतूक कोंडीत सापडल्या. तर, जिल्हाधिकारी कार्यालयाला पोलीस छावणीचे स्वरुप आले होते. मात्र या कडेकोट बंदोबस्तामुळे वाहतुकीची कोंडी होऊन बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांना पोलीसांच्या दबंगगिरीला सामोरे जावे लागले. त्याचप्रमाणे इच्छुक उमेदवारांसमवेत मोजक्याच कार्यकर्त्यांना प्रवेश दिला जात असल्याने काही कार्यकर्त्यांना पोलिसांच्या रोषाला सामोरे जावे लागले. दुपारनंतर मात्र वाहतूक सुरळीत झाली. विधानसभा निवडणुकीची धामधुम सुरू झाली आहे. शहरासह जिल्ह्यातील राजकीय पक्षांचे उमेदवार निश्चित झाल्याने लढतींचे चित्र स्पष्ट झाले आहे. त्यामुळे सोमवारी बहुतांशी इच्छुकांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा मुहूर्त निवडला. राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी रॅली काढत अर्ज दाखल करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय गाठले.



### महत्त्वाचे

#### विजांच्या कडकडाटात दिवाळीचं स्वागत

**पुणे :** मागील काही दिवसांपासून तयारीला लागलेल्या अनेकांचाच उत्साह आता शिगेला पोहोचला आहे. कारण, दिवाळीचा सण अखेर सुरू झाला आहे. दिवाळीच्या निमित्तानं खरेदी असो किंवा सजावटीची तयारी असो प्रत्येकजण या साऱ्यामध्ये उत्साहानं सहभागी होत असतानाच या वातावरणावर पावसामुळं विरजण पडताना दिसणार आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार पुढील 24 तास किंबहुना पुढील चार ते पाच दिवस राज्यामध्ये पावसासाठी पोषक वातावरण निर्मिती होणार असून, त्यामुळं मध्य महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाड्यातील काही भागांमध्ये वीजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. 'दाना' चक्रीवादळानंतर आता हवेतील बाष्पाचा पश्चिमेकडे प्रवास सुरू झाला आहे. ज्यामुळं दिवाळीच्या दिवसांदरम्यान राज्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. चक्रीवादळानंतर अरबी समुद्राच्या नैऋत्य भागामध्ये वाऱ्यांची चक्राकार स्थिती कायम आहे. ज्यामुळं पावसाचा अंदाज कायम आहे. दरम्यान, विदर्भासह राज्याच्या पश्चिम घाटमाध्यावरील परिसरामध्ये पहाटेच्या वेळी हवेत गारठा जाणवण्यास सुरुवात झाली आहे. असं असलं तरीही उष्णतेचा दाह मात्र दुपारच्या वेळेत अडचणी वाढवताना दिसणार आहे ही बाब नाकारता येत नाही.

#### बीड जिल्हा रुग्णालयात रक्ताचा तुटवडा

**बीड :** जिल्हा रुग्णालयातील वाढती ऋण संख्या पाहता. दररोज अडीच ते तीन हजार रुग्ण उपचारासाठी दवाखान्यात येत आहे जिल्हा रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर शस्त्रक्रिया ही दैनंदिन होत आहेत. आपत्कालीन अपघात विभाग, शस्त्रक्रिया विभाग,त्याचबरोबर जिल्हाभरातून हेमोफिलिया, थैलेसिनियाचे काही बाल रुग्ण सुद्धा आहेत त्यांना आठवड्याला पंधरा दिवसाला रक्त द्यावाच लागत, त्यामुळे जिल्हा रुग्णालयात दिवसा काठी 40 ते 45 रक्त बॅग पुरवठा रुग्णांना केला जातो. सध्याच्या स्थितीत बीड जिल्हा रुग्णालयात रक्तपुरवठा विभागात कोणत्याच गटाचे रक्त शिल्लक नाही. त्यामुळे मोठा तुटवडा सध्या पाहायला मिळत आहे.

#### भाऊबीजेला मार्केट यार्डातील भाजीपाला विभाग सुरू

**पुणे :** दिवाळीत दरवर्षी भाऊबीजेच्या दिवशी मार्केट यार्डातील फळे, भाजीपाला विभागाचे कामकाज बंद ठेवण्यात येते. यंदा रविवारी (३ नोव्हेंबर) भाऊबीज आहे. शनिवारी (२ नोव्हेंबर) बाजार आवारास साप्ताहिक सुटी असते. सलग दोन दिवस मार्केट यार्डातील घाऊक बाजाराचे काम बंद राहिल्यास बाजारात भाजीपाल्याचा तुटवडा निर्माण होईल. त्यामुळे यंदा भाऊबीजेच्या दिवशी फळे, भाजीपाला विभाग, तसेच पान बाजाराचे कामकाज नियमित सुरू राहणार आहे.सलग दोन दिवस बाजार आवाराचे कामकाज बंद ठेवल्यास भाजीपाल्याची आवक होणार नाही. सणासुदीत नागरिकांना भाजीपाला उपलब्ध होणार नाही. त्यामुळे यंदा भाऊबीजेच्या दिवशी बाजार आवाराचे कामकाज नेहमीप्रमाणे सुरू राहणार आहे.

## लोकसभेत माझ्याकडून जी चूक झाली, तीच चूक आता ते करतायत!

### अजित पवार यांचा शरद पवारांना टोला

प्रतिनिधी
■ पुणे

उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी लोकसभा निवडणुकीत आपल्याकडून जी चूक झाली तीच चूक या निवडणुकीत शरद पवार करत असल्याचा दावा केला. लोकसभा निवडणुकीत कुटुंबातील उमेदवाराविरोधात उमेदवार देण्याची मोठी चूक माझ्याकडून झाली. ती चूक आता त्यांच्याकडून होत आहे, असे ते म्हणालेत.

अजित पवार यांनी सोमवारी बारामती विधानसभा मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या ठिकाणी राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने युगेंद्र पवार यांना उमेदवारी दिली आहे. त्यांनीही आज आपला अर्ज शरद पवार व खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत दाखल केला.



यामुळे बारामतीत लोकसभेनंतर पुन्हा एकदा पवार विरुद्ध पवार असा सामना रंगणार आहे. अजित पवारांनी अर्ज दाखल करण्यापूर्वी मोठे शक्तिप्रदर्शन केले. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवाराचा पक्ष लोकसभेला आपल्याकडून जी चूक झाली तीच करत असल्याचा दावा केला. लोकसभा निवडणुकीत बारामतीत शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांना अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी आव्हान दिले होते. त्यात सुनेत्रा यांचा पराभव झाला होता. अजित पवार यासंबंधी म्हणाले, लोकसभेला सुप्रिया सुळे यांच्याविरोधात सुनेत्रा पवार यांना उभे करून मी चूक केली. पण आता युगेंद्र पवार यांना माझ्याविरोधात उभे करून तीच चूक ते करत आहेत. त्यांनी (शरद पवार) असे करायला नको होते. लोकशाही शासन पद्धतीत सर्वांना निवडणूक लढवण्याचा अधिकार आहे.

#### माझ्यासाठी नातेसंबंध खूप महत्त्वाचे - सुप्रिया सुळे

*शरद पवार यांच्या उपस्थितीत युगेंद्र पवार यांनी देखील आज आपला उमेदवारी अर्ज भरला आहे. यामुळं बारामतीत पुन्हा एकदा काका-पुतण्या यांच्या लढाईत कोण बाजी मारणार याकडं सर्वांचं लक्ष लागलंय. यावरच आता राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या (शरदचंद्र पवार) खासदार सुप्रिया सुळे यांनी भाष्य केलंय. "बारामतीच्या जनतेनं नेहमीच शरद पवार साहेबांवर खूप प्रेम केलंय. देशात कुठंही गेलं तरी बारामती ही पवारांची बारामती म्हणूनच ओळखली जाते. बारामतीच्या जनतेशी असलेलं आमचं नातं हे केवळ प्रेमानं विनलेलं आहे. त्यामुळं ते नक्कीच आम्हाला साथ देतील." तसंच माझ्यासाठी नातेसंबंध खूप महत्त्वाचे आहेत, असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या.*

## फसवणूक करण्यात वडिलांनी पूजा खेडकरला टाकले मागे

### लोकसभेतील अर्जात पत्नी असल्याचा उल्लेख तर विधानसभेत घटस्फोटीत असल्याचे नमूद

प्रतिनिधी
■ अहमदनगर

माजी प्रशिक्षणार्थी पूजा खेडकर ही 2023 च्या बॅचच्या आयएएस अधिकारी आहे. मात्र वादात सापडल्यानंतर पूजा खेडकर हिला केंद्र सरकारने भारतीय प्रशासकीय सेवेतून बडतर्फ केले आहे. पूजा खेडकरवर कारवाई सुरू असताना तिच्या आई आणि वडिलांबद्दल अनेक धक्कादायक दावे समोर येत होते. अशातच आता पूजा खेडकरचे वडील दिलीप खेडकरही वादात सापडण्याची शक्यता आहे. त्यांच्या वैवाहिक स्थितीबाबत आता प्रश्न उपस्थित होताना दिसत आहेत.

पूजा खेडकर हिचे वडील दिलीप खेडकर हे अहमदनगर दक्षिण मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून विधानसभेची निवडणूक लढवणार





आहेत. यासाठी त्यांनी नुकताच त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मात्र उमेदवारी अर्ज दाखल करताना सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रामुळे आता नवा होण्याची शक्यता आहे. कारण दिलीप खेडकर यांनी आपल्या उमेदवारी अर्जात ते घटस्फोटित असल्याचे म्हटले आहे. मात्र मागील लोकसभा निवडणुकीवेळी त्यांनी आपण विवाहित असून मनोरमा खेडकर पत्नी असल्याचा दावा प्रतिज्ञापत्रातून केला होता. त्यामुळे आता लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या मधल्या काळात घटस्फोट झाल्याची चर्चा आहे, पण हे खरे नाही. एका इंग्रजी वृत्तपत्राने दिलेल्या बातमीनुसार, बहुजन आघाडी पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवणारे दिलीप खेडकर आणि मनोरमा खेडकर यांनी 2009 मध्ये परस्पर संमतीने घटस्फोटासाठी पुण्यातील कौटुंबिक न्यायालयात अर्ज केला होता.

## नाराज कार्यकर्त्यांनी नाना पटोलेंची गाडी धरली रोखून

### पोलिसांनी मध्यस्थी करत नेले सभास्थळी

प्रतिनिधी
■ गोंदिया

गोंदिया जिल्ह्यातील मोरगाव अर्जुनी विधानसभेत काँग्रेसने तिरोड्याचे माजी आमदार दिलीप बनसोड यांना उमेदवारी दिली आहे. बाहेरचा उमेदवार दिल्यामुळे नाना पटोले यांची गाडी स्थानिक इच्छुक उमेदवारांनी रोखून धरली होती. यावेळी कार्यकर्त्यांनी पटोले यांच्याजवळ प्रचंड रोष व्यक्त केला.

विधानसभा निवडणुकीसाठी मोरगाव अर्जुनी विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे स्थानिकांना



उमेदवारी न देता दिलीप बनसोडे यांना उमेदवारी दिल्याने काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली होती. दरम्यान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे गोंदिया येथे सभेसाठी आले असता, कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर रोष व्यक्त करत गाडी अडवून धरली होती. बराच वेळ हा गोंधळ सुरु होता.

## रॅली, सभा, शक्तीप्रदर्शन पण 1 मिनिटांचा उशीर भोवला

### सलील देशमुखांचा अर्ज दाखल करुन घेतलाच नाही

प्रतिनिधी
■ नागपूर

कार्यकर्त्यांची प्रचंड गर्दी आणि उत्साह काटोल विधानसभा मतदारसंघाचे मविआचे उमेदवार सलील देशमुख यांना भोवला आहे. झालं असं कि उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठीचे अवघे दोन मिनिटांचा उशीर झाल्यामुळे सलील देशमुखांना आपला उमेदवारी अर्ज दाखल करता आला नाहीये. त्यामुळे आता ते उद्या मंगळवारला सकाळी 11 वाजता आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. मात्र 2019 ची जी काहाणी अनिल देशमुख यांच्या



सोबत घडली तीच घटना आज त्यांच्या पुत्राच्या बाबतीत घडल्याने जुनी आठवण नव्याने ताजी झाली आहे.

2019 मध्ये अनिल देशमुख यांना उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवसाच्या आदल्या दिवशी ( जसं आजचा दिवस आहे) उमेदवारी अर्ज दाखल करताना दोन मिनिटांचा उशीर झाला होता. त्यानंतर अनिल देशमुख यांनी दुसऱ्या दिवशी त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला होता. आज सलील देशमुख यांच्या संदर्भातही तसेच घडले आहे.

उद्या पुन्हा आई-वडील आणि मित्र पक्षांच्या नेत्यांसह येऊन उमेदवारी अर्ज दाखल करेल. आज उमेदवारी अर्ज दाखल करताना एक मिनिटाचा उशीर झाला. बाईकवर येऊन वेळेत पोहोचण्याचा प्रयत्न केला, मात्र एक मिनिट उशीर झाल्यामुळे आज उमेदवारी अर्ज दाखल करू शकलो नाही. आमच्या वकिलांनी सर्व काळजी घेतली आहे.

## चंदगडमध्ये शिवाजी पाटलांच्या बंडखोरीने महायुतीत उभी फूट

### हातकणंगले आणि शिरोळमध्येही तिढा

प्रतिनिधी
■ कोल्हापूर

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगेल विधानसभा मतदारसंघ आणि शिरोळ विधानसभा मतदारसंघांमध्ये महायुतीचा तिढा अजूनही कायम असताना चंदगडमध्ये महायुतीमध्ये उभी फूट पडली आहे. भाजप नेते शिवाजी पाटील यांनी आज प्रचंड शक्तीप्रदर्शन करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला.

त्यामुळे अजित पवार गटाकडून रिंगणात असलेल्या आमदार राजेश



पाटील यांच्या अडचणी वाढल्या आहेत. राजेश पाटील यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून नंदाताई बाभुळकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. नंदाताई बाभुळकर यांच्या उमेदवारीने सुद्धा महाविकास आघाडीमध्ये यापूर्वीच वादाची ठिणगी पडली आहे. त्यामुळे आता या वादामध्ये आता कोण बाजी मारणार याचे उत्तर 23 नोव्हेंबर रोजीच मिळणार आहे. गेल्या काही दिवसांपासून शिवाजी पाटील हे तुतारी फुंकणार असल्याची चर्चा रंगली होती. मात्र, शिवाजी पाटील यांनी तसा कोणताही निर्णय न घेता अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

## तासवडे टोलनाक्यावर आठ कोटींचा ऐवज जप्त

प्रतिनिधी
■ सातारा

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तासवडे टोलनाक्यावर तपासणी दरम्यान ५ कोटींचं सोनं आणि ६० किलो चांदीचा समावेश आहे. ही कारवाई FST पथक, GST अधिकारी, आयकर अधिकारी, तहसीलदार आणि कराड नगरपालिका मुख्याधिकाऱ्यांच्या संयुक्त पथकाने केली. जप्त ऐवजाच्या तपासणीमध्ये ९ किलो सोने आणि ६० किलो चांदी असल्याचे आढळून झाले. त्याची अंदाजे किंमत ७ कोटी ५३ लाख रुपये आहे.



सध्या आयकर विभागाकडून इनवाइसची पडताळणी सुरू आहे. तोपर्यंत सोन्या-चांदीचे दागिने पोलीस संरक्षणाखाली ठेवले आहेत. जप्त ऐवज तळबीड पोलीस ठाण्यातून कराड कोषागारात सुरक्षितपणे नेण्याची जबाबदारी कराड उत्तर FST पथकाने घेतली आहे. तासवडे टोलनाक्यावर सापडलं घबाड- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तासवडे टोलनाक्यावर वाहनांची तपासणी केली जात आहे. रविवारी रात्री कोल्हापूरकडून मुंबईकडे निघालेल्या कारचा संशय आल्यानं पोलिसांनी त्या कारची तपासणी केली. यावेळी पोलिसांनी कारमध्ये सोनं आणि चांदी मिळून ५ कोटींचं घबाड सापडलं. तळबीड पोलिसांनी संबंधित कार, सोनं आणि चांदी ताब्यात घेतली.

## संभाजीनगरच्या 'लेडी डॉन'चा हवेत गोळीबार

### सिटी चौक पोलिसांकडून अटक

प्रतिनिधी
■ संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगरातील एका लेडी डॉनचा हवेत गोळीबार करतानाचा व्हिडिओ चांगलाच वायरल झाला होता. या व्हिडीओवरून पोलिसांनी कारवाई करत सदर तरुणीला ताब्यात घेतले आहे. तसेच तिच्याकडून कट्ट्यासह काडतूस जप्त केले आहेत.

छत्रपती संभाजीनगर परिसरात हा प्रकार उघडकीस आला आहे. हवेत गोळीबार करताना तरुणीने व्हिडीओ केला असून या व्हिडीओ सोशल



मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. ह्या व्हिडिओत एक २४ वर्षाची तरुणी सर्रासपणे गावठी कट्टा हातात घेऊन गोळीबार करताना दिसत आहे. या व्हिडिओबाबत सिटी चौक पोलिसांना माहिती मिळताच त्यावरून तरुणीचा शोध घेतला. यावेळी त्या तरुणीकडे एक गावठी कट्टा,एक जिवंत काडतूस, एक चाकू इत्यादी साहित्य मिळून आली. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या राखी गणेश मुरमुरे असे लेडी डॉनचे नाव आहे. तिच्याकडून सर्व साहित्य जप्त करण्यात आले.

## आधी खाकी, मग बाकी; निवडणुकीमुळे पोलिसांच्या रजा, सुट्ट्या रद्द

प्रतिनिधी
■ सिंधुदुर्ग

गणेशोत्सव, नवरात्रोत्सवानंतर यंदाची सिंधुदुर्गपोलिसांची दिवाळी निवडणुकीच्या बंदोबस्तात आणि धावपळीत जाणार आहे. पोलिसांच्या रजा, सुट्ट्या २५ नोव्हेंबरपर्यंत रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे पोलिस अधिकारी, कर्मचारी यांच्या कुटुंबियांना कुटुंबप्रमुखाशिवाय सण साजरा करावा लागणार, असे चित्र दिसते. विशेष म्हणजे



जिल्ह्याबाहेरील बहुतांश पोलिस अधिकारी महाराष्ट्राच्या सीमेवरील जिल्ह्यात सेवा देत आहेत.

लोकसभा निवडणुकीत जवळपास दोन महिने पोलिस बंदोबस्तात व्यस्त होते. त्यानंतर थोड्या दिवसांची विश्रांती मिळाली. पुन्हा गणेशोत्सवात पोलिस यंत्रणा बंदोबस्तासाठी रस्त्यावर उतरल्याचे चित्र पहायला मिळाले. त्यानंतर नवरात्रोत्सवाचा बंदोबस्तही झाला. विधानसभा निवडणुकीची लगबग ऐन दिवाळीत सुरू होणार असल्याचे संकेत मिळाले होते. त्यानुसार यंदाच्या दिवाळीतच निवडणुकीची धामधूम सुरू झाली आहे.जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघात जवळपास चार हजारांहून अधिक पोलिस, होमगार्डस, राज्य राखील दलाचे पोलिस यांचा बंदोबस्त राहणार आहे. निवडणूक म्हटली की, उमेदवारांच्या अर्ज भरण्यापासून ते निकालापर्यंत पोलिसांना दक्ष राहावे लागते. कायदा व सुव्यवस्था कायम ठेवून निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी पोलिसांना रात्रंदिवस सज्ज रहावे लागते. यंदा तर दिवाळी सणाचा बंदोबस्त आणि निवडणूक दोन्हींकडे पोलिस यंत्रणेला लक्ष द्यावे लागणार आहे.

## सुनील टिंगरेंना तिकीट देणे चुकीचेच; जनताच निवडणुकीत निर्णय घेईल

### पोर्शे अपघात प्रकरण मृत अनिश अवधियाच्या वडिलांनी व्यक्त केला संताप

प्रतिनिधी
■ पुणे

पुण्यातील कल्याणीनगर परिसरात १९ मे रोजी मध्यरात्री बिल्डर विशाल अग्रवालच्या १७ वर्षीय मुलाने मद्य पार्टी केल्यानंतर विनानंबरची पोर्शे कार भरधाव चालवून अनिश अवधिया आणि अश्विनी कोष्ट या अभियंताच्या दुचाकीस पाठीमागून धडक देत त्यांचा बळी घेतला. या प्रकरणात अग्रवाल याला वाचवण्यासाठी मध्यरात्री घटनास्थळी आणि पोलिस ठाण्यात दाखल झालेले स्थानिक वडगाव शेरीचे आमदार सुनील टिंगरे यांची पोलिस चौकशीदेखील झाली. मात्र, त्यांचे दोषारोपपत्रात नाव आले नाही. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाकडून पुन्हा विधानसभा निवडणुकीत सुनील टिंगरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

यावरून या घटनेत मृत झालेल्या अनिश अवधियाच्या पालकांनी संतप्त प्रतिक्रिया देत प्रकरणात सुनील टिंगरे यांचे नाव आल्यावर त्यांना पक्षाने तिकीट देणे योग्य नव्हते. लोक सर्व



राजकारण जवळून पाहत असतात, त्यांना सर्व समजते. त्यामुळे योग्य तो निर्णय मतदार निवडणुकीत घेतील. आम्ही या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून सुनील टिंगरे यांचा गुन्ह्यात सहभाग नोंदवण्यात यावा याबाबत लवकरच दाद मागणार आहोत, अशी माहिती त्यांनी "दिव्य मराठी"शी बोलताना दिली. अनिश अवधिया याचे मध्य प्रदेशच्या उमरिया जिल्ह्यात बांधवड येथे राहणारे वडील ओम अवधिया म्हणाले, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सुनील टिंगरे यांची या प्रकरणात कोणतीही चूक नसून त्यांना अडकवले गेल्याचे चुकीचे स्पष्टीकरण दिले आहे. या प्रकरणात पोलिसांवर तसेच रुग्णालय प्रशासनावर मोठा राजकीय दबाव होता. या प्रकरणातील सत्य जनतेसमोर येण्यासाठी या घटनेची सीबीआय चौकशी होणे आवश्यक आहे. आमदारांचा कोणताही केसशी संबंध नव्हता तर त्यांनी पहाटे चार वाजता पोलिस ठाण्यात येण्याची गरज नव्हती. मृत अश्विनी कोष्टा हिचा जबलपूर येथील भाऊ सोमप्रीत यांनी सांगितले की, या प्रकरणात सुनील टिंगरे यांचा सहभाग होता की नाही याबाबतचा तपास पोलिसांनी केला आहे.

## विष्णू मनोहर यांचा पुन्हा विश्वविक्रम

### 24 तासात तब्बल 10 हजार केले डोसे

प्रतिनिधी
■ नागपूर

दिवाळीनिमित्त नागपूरमधील प्रसिद्ध सेफ विष्णू मनोहर यांनी २४ तासांत डोसे बनवण्याचा नवा विक्रम केला आहे. विष्णू मनोहर यांनी याआधी देखील अनेक विक्रम खाद्यपदार्थ बनवण्याचे केले आहे. दिवाळीनिमित्त त्यांनी १ हजार, २ हजार किंवा ३ हजार नाही तर तब्बल १० हजार डोसे बनवण्याचा विक्रम केला आहे. त्यांच्या या उत्साही उपक्रमाची सोशल मीडियावर चर्चा होत आहे. त्याचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल होत आहेत.

जवळपास १० हजारांच्यावर डोसे त्यांनी बनविले. या डोशांचा आस्वाद घेण्यासाठी नागपुरकरांनी मोठी गर्दी केली होती. जवळपास ३०० किलोपेक्षा जास्त डोशाच्या बॅटरपासून त्यांनी १० हजार डोसे तयार केले.



आतापर्यंत २५ विश्वविक्रम केले आहेत. डोसा चॅलेंजपूर्वी त्यांनी अयोध्येत ७००० किलो 'राम हलवा' शिजवला होता. त्यांनी सर्वात मोठा शाकाहारी कबाब तसेच देशातील सर्वात मोठा पराठा बनवला आहे. डोसा चँलेंजमध्ये त्यांनी पहिल्या ९ तासांत तब्बल ६,७५० डोसे तयार केले. त्याची जादू पाहण्यासाठी हजारो नागपुरकर आले होते. नागपूरच्या बजाजनगर येथे विष्णुजी की रसोई येथे त्यांनी डोसे बनवण्याचा विक्रम केला. विष्णू प्रभाकर यांनी ८ तव्यासह ३ शेगड्या वापरल्या. याठिकाणी विष्णू मनोहर यांनी तयार केलेल्या १० हजार डोशांसोबत नागरिकांनी चटणी आणि सांबारवर ताव मारला.

*मुंबई : शिवसेना शाखा क्रमांक २०६ शिवडी काळाचौकी च्या वतीने विभागातील नागरिकांना दिवाळी निमित्त घरोघरी जावून सुगंधी उटणे वाटप करण्यात येणार आहे या उपक्रमाची सूरवात आजपासून करण्यात आली यावेळी मा. शिवसेना नगरसेवक श्री सचिन देवदास पडवळ, महिला उपविभाग संघटिका श्वेता राणे, शाखाप्रमुख हनुमंत बैजू हिंदोळे, महिला शाखासंघटक शुभदा पाटील, महिला शाखा समन्वयक भारती देवाडिका तसेच उपशाखाप्रमुख व शिवसैनिक उपस्थित होते*



### पाकिस्तान क्रिकेटमध्ये उलथापालथ

# 6 महिन्यातच मुख्य प्रशिक्षक कर्स्टन यांनी दिला राजीनामा



वृत्तसंस्था
■ लाहोर

सतत चढ-उतारांशी झुंजणाऱ्या पाकिस्तानी क्रिकेटला आता आणखी एक जबर धक्का बसला आहे. आता व्हाईट बॉल फॉरमॅटचे मुख्य प्रशिक्षक गॅरी कर्स्टन यांनी तत्काळ प्रभावाने आपले पद सोडले आहे. गॅरीचा पाकिस्तान क्रिकेट बोर्डाशी (पीसीबी) काही खेळाडूंबाबत वाद झाला होता. पीसीबीने गॅरी कर्स्टनसोबत दोन वर्षांचा करार केला होता पण अवघ्या ६ महिन्यांनंतर त्याने संघ सोडण्याचा निर्णय घेतला.

अलीकडेच इंग्लंडविरुद्ध कसोटी मालिका जिंकल्यानंतर मायदेशात चॅम्पियन्स ट्रॉफी (ICC चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ ) आयोजित करण्याच्या तयारीत व्यस्त असलेल्या पाकिस्तानसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. पुढील वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये ही स्पर्धा पाकिस्तानमध्ये खेळवली जाणार आहे आणि त्याआधी मुख्य प्रशिक्षकाने संघ सोडणे हा संघासाठी कठीण निर्णय आहे. क्रिकेट वेबसाइट क्रिकइन्फोच्या वृत्तानुसार, अलीकडेच पीसीबीने मुख्य प्रशिक्षकांकडून संघ निवडीचे अधिकार काढून घेतल्यानंतर गॅरी कर्स्टन यांनी हा निर्णय घेतला आहे. आता संघ निवडीचे अधिकार पूर्णपणे पीसीबीच्या निवड समितीकडे आहेत, तर यापूर्वी निवड समितीसह मुख्य प्रशिक्षकाचा सल्लाही आवश्यक होता. रावळपिंडी कसोटीत कसोटी संघाचे मुख्य प्रशिक्षक जेसन गिलेस्पी यांनीही याबाबत उघडपणे नाराजी व्यक्त केली होती. मात्र गॅरीने मीडियामध्ये कोणतीही प्रतिक्रिया न देता हा निर्णय घेतला.

रविवारीच पीसीबीने आपल्या पांढऱ्या चेंडूचा कर्णधार बदलण्याची घोषणा केली होती. त्याने बाबर आझमच्या जागी यष्टिरक्षक फलंदाज मोहम्मद रिझवानकडे संघाची कमान सोपवली होती, त्यानंतर गॅरीने संघ सोडण्याचा हा मोठा निर्णय घेतला. अलीकडच्या काळात पाकिस्तान क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटमध्ये पिछाडीवर आहे. २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषक आणि २०२४ च्या टी २० विश्वचषक स्पर्धेत ते गट टप्प्यातून बाहेर पडले.

### भारतानंतर श्रीलंकेला दणका देत रचला इतिहास

# अफगाणिस्तानने पहिल्यांदाच उंचावली इमर्जिंग आशिया कप ट्रॉफी

वृत्तसंस्था
■ कोलंबो

अफगाणिस्तानने इतिहास रचला आहे. आधी भारतीय संघाला स्पर्धेतून बाहेर केले. आता थेट स्पर्धेच्या जेतेपदावर नाव कोरले आहे. एमर्जिंग एशिया कप स्पर्धेतील फायनलचा सामना अफगाणिस्तान आणि श्रीलंका या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात अफगाणिस्तानने ७ विकेट राखून विजय मिळवला. यासह पहिल्यांदाच या स्पर्धेची ट्रॉफी अफगाण संघाने उंचावली आहे.



अफगाणिस्तानला हा सामना जिंकण्यासाठी १३४ धावांची गरज होती. या धावांचा पाठलाग करताना अफगाणिस्तानने १८.१ षटकात दिलेलं आव्हान पूर्ण केले. अफगाणिस्तानकडून फलंदाजी करताना सेदीकुल्लाहने ५५ चेंडूंचा सामना करत ५५ धावांची शानदार खेळी केली. या खेळी दरम्यान त्याने ३ चौकार आणि १ षटकार खेचला. यासह करीम जनतने ३३ धावांची खेळी केली. तर रसूलीने २० चेंडूत २४ धावांची खेळी केली.

शेवटी फलंदाजी करताना मोहम्मद ईशाकने ६ चेंडूंचा सामना करत १६ धावांची शानदार खेळी केली. या धावांचा पाठलाग करताना अफगाणिस्तानला चांगली सुरुवात करता आली नव्हती. सलामीवीर फलंदाज स्वस्तात माघारी परतले होते. मात्र त्यानंतर फलंदाजांनी कमबॅक केलं आणि सामना जिंकून देण्यात मोलाची भूमिका बजावली.

श्रीलंकेकडून गोलंदाजी करताना इशान मलिंगा, दुशान हेमंथा आणि सहान आरासिंघेने प्रत्येकी १-१ गडी बाद केला. तर श्रॉलंकेच्या फलंदाजीबद्दल बोलायचं झालं तर, श्रीलंकेला २० षटकांत ७ गडी बाद १३३ धावा करता आल्या. श्रीलंकेकडून फलंदाजी करताना सहान आरासिंघेने तुफान फटकेबाजी करत ६४ धावांची शानदार खेळी केली. तर विमुखीने २३ धावांचे योगदान दिले.

### सुवर्ण महोत्सवी राज्य कुमार व मुली खो-खो

# नंदुरबारच्या रोहिणी गावितची नाबाद नऊ मिनिटे खेळी

### मुलींच्या गटात रायगड, नंदुरबारचे शानदार विजय



प्रतिनिधी
■ धाराशिव

सुवर्ण महोत्सवी ५० वी कुमार व मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेत मुलींच्या गटात नंदुरबारने छत्रपती संभाजीनगरचा ६-१ असा पाच गुणांनी पराभव केला.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व उस्मानाबाद जिल्हा खो खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत रोहिणी गावित हिने सलामीचा सायंकाळचा दिवस गाजविला. तिने पहिल्या डावात ८.४० व दुसऱ्या डावात नाबाद नऊ मिनिटे संरक्षण केले. छत्रपती संभाजी नगरच्या दिशा इंगळे हिनेही २.४० व ७.१० मि. पळती करीत लढत दिली. अन्य एका सामन्यात रायगडने लातूरला १६-१४ असे २ गुणांनी नमविले. मध्यंतराची सहा पाच ही एका गुणाची आघाडीच रायगडला विजय मिळवून दिली. संजीवनी जगदाळे हिने २. ३० मिनिटे नाबाद पळती करीत आक्रमणात सहा गडी बाद केले. लातूरच्या पायल माने हिची लढत अपुरी पडली. तिने आपल्या धारदार आक्रमणात सात गडी बाद करीत १.१० मिनिटे संरक्षण केले. अन्य सर्व सामने एकतर्फी झाले.

या स्पर्धेचे उद्घाटन धाराशिवचे जिल्हाधिकारी सचिन ओम्बासे यांनी केले. अध्यक्षस्थानी लातूर विभागाचे शिक्षण उपसंचालक गणपतराव मोरे होते. सुरुवातीस ध्वजारोहण आणि त्यानंतर क्रीडा ज्योतीचे आगमन झाले. ती ज्योत प्रमुख पाहुण्यांनी प्रज्वलित केली. त्यानंतर राणी लक्ष्मी आणि जानकी पुरस्कार प्राप्त आश्विनी शिंदे हिने खेळाडूंना शपथ दिली.

यावेळी द्वापेट कॉलेजचे प्राचार्य डॉ. दयानंद जटमुरे, शि. प्र. मंडळ प्रशासकीय अधिकारी आदित्य पाटील, अर्जुन पुरस्कार विजेते सारिका काळे, महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे खजिनदार ॲड. गोविंद शर्मा, उपाध्यक्ष अश्विनी पाटील, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त जे. पी. शेळके, सुजाता शानमे, रोहिणी आवारे, सुप्रिया गाढवे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुभाष वाघ, शिवतेज प्रतिष्ठान रेहमान काझी आदी मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजित जाधव यांनी प्रास्ताविक केले. उपस्थितांचे स्वागत उस्मानाबाद खो खो असोसिएशनचे सचिव प्रवीण बागल, अभय इंगळे, प्रदीप होले, प्रभाकर काले, शोभना वाकुरे, विवेक कापसे, वर्षा जचव, निकिता पवार, गौरी शिंदे, संपदा मोरे,आकाश लोखंडे, अभिजित पाटील, रितेश जाधव, सुजित साळुंखे यांनी केले.

## द.आफ्रिका दौऱ्यात लक्ष्मण टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक

**नवी दिल्ली :**भारतीय संघ न्यूझीलंडविरुद्धची सध्याची कसोटी मालिका संपल्यानंतर भारतीय संघ दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर चार टी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. या दौऱ्यात भारतीय संघ ८ नोव्हेंबरला डर्बनमध्ये पहिला टी-२० सामना खेळणार आहे. त्यानंतर १० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या दुसऱ्या टी-२० सामन्यासाठी संघ गाकेबरहा येथे जातील. त्यानंतर उर्वरित दोन सामने सेंच्युरियन (१३ नोव्हेंबर) आणि जोहान्सबर्ग (१५ नोव्हेंबर) येथे खेळवले जातील. या दौऱ्यापूर्वी मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरबद्दल मोठा निर्णय घेण्यात आला आहे.गौतम गंभीरच्या अनुपस्थितीत दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर व्हीव्हीएस लक्ष्मण भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक असतील.

# मुंबईची त्रिपुरावर 155 धावांची महत्वपूर्ण आघाडी

### हिमांशू सिंग, शम्स मुलानी यांची प्रभावी गोलंदाजी

वृत्तसंस्था
■ आगरताळा

येथे खेळवण्यात येत असलेल्या अ गट रणजी लढतीच्या प्रारंभिक फेरीत मुंबईने पहिल्या डावात सर्वबाद ४५० अशी दमदार धावसंख्या नोंदवल। त्यानंतर हिमांशु सिंग आणि शम्स मुलानी यांच्या

प्रभावी गोलंदाजीच्या बळावर यजमान त्रिपुराचा डाव ९५ ४ षटकांत ३०२ धावांत गुंडाळला त्यामुळे मुंबईला पहिल्या डावात १४८ धावांची मोठी आघाडी मिळाली.त्यात दिवसाखेर मुंबईने ७ धावांची भर घातल। पण दुसऱ्या डावात मुंबईला ७ धावांतच २ विकेट गमवावे लागले त्यामुळे आज लढतीच्या तिसऱ्या दिवसाखेर मुंबईची स्थिती मजबूत झाली आहे.उद्या लढतीचा चौथा आणि अखेरचा दिवस आहे.

मुंबईच्या हिमांशू सिंग आणि शम्स मुलानी यांनी प्रभावी मारा करीत यजमान संघाच्या ९ फलंदाजांना तंबूत धाडलेमुंबईच्या हिमांशू सिंग आणि शम्स मुलानी यांनी प्रभावी मारा करीत यजमान संघाच्या ९ फलंदाजांना तंबूत धाडल। सिंगने ६ तर मुलानीने ३ विकेट घेतल्य। त्रिपुराच्या वतीने जीवनज्योत सिंगने १८८ चेंडूंत ११८ धावांची शानदार शतकी खेळी साकारली. पण त्याची झुंज संघाला आघाडी मिळवून देण्यात अपयशी ठरली. त्याला श्रीदाम पॉल (५२ ) आणि कर्णधार मनदीप सिंग (नाबाद ६२ ) यांनी उत्तम साथ दिली. पण अखेर त्रिपुराचा पहिला डाव ९। ४ षटकांत ३०२ धावांवरच आटोपला. मुंबईचे अंगक्रिश रघुवंशी (६ ) आणि आयुष्य म्हात्रे (१ ) हे सलामीवीर झटपट तंबूत परतले.

***संक्षिप्त धावफलक -***
***मुंबई पहिला डाव*** *- १२२. ४ षटकांत सर्वबाद ४५० ( अजिंक्य रहाणे ३५ ,सुर्यांश शेडगे ९९ ,शम्स मुलानी ७१ ,हिमांशू सिंग ५९,शार्दूल ठाकूर ६२ :मणिशंकर मुरसिंग ११७ धावांत ३ विकेट ,अभिजित सरकार ५९ धावांत २ ,परवेझ सुलतान ८३ धावांत २ विकेट ),दुसरा डाव ७ धावांत २ विकेट*
***त्रिपुरा,पहिला डाव*** *- ९५. ४ षटकांत सर्वबाद ३०२ ( जीवनज्योत सिंग ११८ ,श्रीदाम पॉल ५२,मनदीप सिंग ६२ : हिमांशू सिंग ६५ धावांत ६ विकेट ,शम्स मुलानी ८८ धावांत ३ विकेट )*

# चांदिवलीतुन नसीम खान यांचा उमेदवारी अर्ज

प्रतिनिधी
■ मुंबई

काल काँग्रेस प्रदेश कार्याध्यक्ष मो. आरिफ (नसीम) खान यांनी चांदिवली विधानसभा मतदार संघातून महाविकास आघाडीच्या काँग्रेस उमेदवार म्हणून नामांकन अर्ज दाखल केला. सकाळी ठीक 10 वाजता साकीनाका मेट्रो स्टेशन पासून 90 फूट रोड, काजूपाडा पाईपलाईन मार्गे एलबीएस रोड करीत विद्याविहार येथील 168 निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी काल त्यांच नामांकन अर्ज दाखल केला.



साकीनाका ते विद्याविहार निवडणूक कार्यालयापर्यंत सुमारे 8 ते 10 हजार लोकांचा जणू जनसागरच उसळुन आला होता. जागोजागी महिलांनी त्यांची आरती ओवाळून त्यांना निवडणुकीत विजयी होण्याच्या आशीर्वाद दिल्या तसेच ठिक-ठिकाणी पुष्प वर्षा व पुष्पमाला घालीत त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

यावेळी काँग्रेसचे आमदार भाई जगताप, माजी मंत्री सुरेश शेट्टी, मुंबई काँग्रेस कार्याध्यक्ष चरणसिंग सप्रा, शिवसेना (उबाठ) गटाचे विजू शिंदे, सोमनाथ सांगळे, एस अण्णामलाई, बालाजी सांगळे, सनी आचरेकर, प्रशांत नलगे, हिरालाल यादव, बालकृष्ण गटे, मयूर राठोड, उमाकांत भांगिरे, प्रशांत मोरे, चंदन सावंत, साईनाथ कटके राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचे मुंबई सरचिटणीस बाबू बत्तेली, तालुका अध्यक्ष अबू स्वालेहा, रत्नाकर शेट्टी, व्यासदेव पवार, चेतन जाधव, फरमान राईन, शांताराम मोरे, आरिफ शेख, राजेंद्र ढवळे, महिला तालुका अध्यक्षा छाया मयेकर यांच्यासह समाजवादी पक्षाचे तसेच व इतर पक्षाचे नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुंबईतील मतदार जनजागृतीचा डॉ. अश्विनी जोशी यांनी घेतला आढावा

प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या पार्श्वभूमीवर, मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभागासाठी सुनियोजित कार्यक्रम (SVEEP) अंतर्गत, मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी सुरु असलेल्या विविध जनजागृती उपक्रमांचा तसेच पुढील नियोजनाचा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी आढावा घेतला.

जिल्हा निवडणूक अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या वतीने व त्यांच्या निर्देशानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात अतिरिक्त आयुक्तांचे दालनात काल ही बैठक घेण्यात आली. यावेळी समन्वय अधिकारी (निवडणूक) तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीमती फरोग मुकादम, मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभागासाठी सुनियोजित कार्यक्रम (SVEEP) चे मुंबई उपनगर जिल्हा समन्वयक तथा एमएमआरडीएचे उपआयुक्त किरण महाजन, मुंबई शहर जिल्हा समन्वयक तथा उपजिल्हाधिकारी विजयकुमार सूर्यवंशी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.



विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मुंबई महानगरपालिका क्षेत्रात (मुंबई उपनगर जिल्हा व मुंबई शहर जिल्हा) मतदानाचे प्रमाण वाढावे, यासाठी विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून आतापर्यंत हाती घेण्यात आलेल्या उपक्रमांची तसेच यापुढे नियोजित उपक्रमांची सविस्तर माहिती फरोग मुकादम तसेच समन्वय अधिकारी महाजन व सूर्यवंशी यांनी सादर केली.

मुकादम यांनी विशद केले की, सार्वजनिक ठिकाणांवर फलक (होर्डिंग्ज्), बॅनर, भित्तीपत्रकं प्रदर्शित करणे, विविध शासकीय कार्यालयांमध्ये देखील बॅनर, भित्तीपत्रकं, स्टॅण्डीज प्रदर्शित करणे, बेस्ट बसेस व बस थांब्यांवर प्रसिद्धी करणे, मोठ्या मंडई तसेच व्यापारी संकूल, महत्त्वाची व पर्यटकांचा अधिक वावर असलेली ठिकाणे इत्यादी जागी पथनाट्य व फ्लॅशमॉब सादर करणे यासारख्या माध्यमांचा मतदारांमध्ये जनजागृतीसाठी अवलंब करण्यात आला आहे. त्यासोबतच, विविध प्रसारमाध्यमे, चित्रपटगृहे, वीजकीय साधने यांचा देखील अवलंब करण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई पोलीस यांच्यासह सर्व शासकीय, निमशासकीय यंत्रणांच्या समन्वयाने व्यापक जनजागृतीचा आराखडा तयार करण्यात आला आहे, अशी माहिती फरोग मुकादम यांनी दिली.



*मुंबई : शिंदे शिवसेनेच्या भायखळा विधानसभा उमेदवार यामिनी जाधव यांनी सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी शिवसेना नेत्या मिना कांबळी,शिवसेना उपनेते यशवंत जाधव , शिवसेना सचिव किरण पावसकर,दिलीप नाईक, वैभव थोरात,भाजपच्या माजी नगरसेविका सुरेखा लोखंडे,रोहीदास लोखंडे हे मान्यवर उपस्थित होते.*



*मुंबई : मुंबई - मुंबई महापालिकेचे माजी शिक्षणाधिकारी राजू तडवी यांनी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश करून चोपडा विधानसभा मतदारसंघात उमेदवारी मिळवली आहे . उद्धव ठाकरे यांनी राजू तडवी यांना एबी फॉर्म दिला असून चोपडा विधानसभा मतदारसंघाचे ते उमेदवार असतील .काही दिवसापूर्वीच राजू तडवी यांनी मुंबई महापालिका शिक्षण अधिकारी पदावरून स्वेच्छा निवृत्ती घेतली आणि आपली राजकीय कारकीर्द सुरू केली आहे.*

# चांदिवलीतील महायुतीच्या मेळाव्यात दिलीप लांडे यांना विजयी करण्याचा केला संकल्प

### पवईचे सौन्दर्यीकरण करून गडकरींसारखे काम चांदिवलीमध्ये करायचेय

प्रतिनिधी
■ मुंबई

चांदिवली विधानसभा क्षेत्रातील शिवसेना महायुतीचे उमेदवार दिलीप लांडे यांच्या प्रचारासाठी महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा भव्य विजयी संवाद मेळावा साकीनाका गेलेक्सी हॉल येथे आयोजित करण्यात आला होता.

यावेळी उपस्थित मान्यवर पदाधिकाऱ्यांनी बूथ लेव्हलच्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी आमदार दिलीप लांडे, भाजप जिल्हा अध्यक्ष सुषम सावंत, तालुका अध्यक्ष प्रकाश मोरे, निवडणूक समन्वयक हरिष भार्दीगे,शुभ्राशु दीक्षित, शिवसेना विधानसभा प्रमुख अशोक माटेकर,चंद्रप्रभा मोरे,शिवसेना माजी नगरसेविका लीना हरिष शुक्ला, वाजीद कुरेशी, युवासेना कार्यकारणी सदस्य प्रयाग लांडे, एनसीपी जिल्हाध्यक्ष हर्षद अमीन, तालुका अध्यक्ष सुरेंद्र सिंह झिंटू, आदिसह अन्य पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने महायुतीचे कार्यकर्ते सदस्य या मेळाव्यात उपस्थित होते. यावेळी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी दिलीप लांडे यांना विजयी करण्याचा संकल्प केला.

या मेळाव्यात मार्गदर्शन करताना आमदार उमेदवार दिलीप लांडे म्हणाले की महाराष्ट्रातील मोठे नेते नितीन गडकरी आणि माझे फोन वरून बोलणे झाले ते म्हणाले मी मतदार संघात प्रचारात जास्त फिरत नाही असे



विभागात काम करून ठेवले आहे. मी नागपूर मध्ये असताना ते काम पाहण्याची संधी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यासोबत मला मिळाली. त्यावेळीच ठरवले की मला पवई तलाव क्षेत्रात छत्रपती महाराजांचा इतिहास सादर करायचाय हा विषय मुख्यमंत्र्यांकडे केला आणि याला तात्काळ प्रतिसाद देत त्यांनी मनपा अतिरिक्त आयुक्तांना सांगितले हे काम झाले पाहिजे, उपनगरामध्ये चौपाटी सारखे सौन्दर्यकरण करून गडकरी यांच्या सारखे काम चांदिवली मध्ये करायचे आहे.

मला पुन्हा एकदा ५ वर्ष द्या मी अशा प्रकारची विकासाची कामे करतो की मला ही गडकरी साहेबांसारखे प्रचाराची आवश्यकता लागणार नाही. कार्यकर्त्यांनी गाफिल राहून चालणार नाही, लोकसभेत गफलत झाली तसे होता कामा नये मामांनी काम केली आहेत मात्र तरीही तुम्हाला मेहनत करायची आहे,हात जोडतो गाफिल राहू नका एक एक मत महत्वाचे आहे.यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष सुषम सावंत म्हणाले की मुंबई मध्ये कुठे चाणले काम झाले असेल तर तो चांदिवली विधानसभा आहे, प्रत्येकाने प्रामाणिक बूथ लेव्हल पर्यंत काम करायचे आहे, मामा एकटे आमदार नाहीत तर येथील नगरसेवक आणि महिला पुरुष पदाधिकारी हे सुद्धा आमदार आहेत. दरम्यान भाजप तालुकाध्यक्ष प्रकाश मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की मामांना प्रचंड बहुमतांनी विधानसभेवर पाठवायचे आहे.

***दिलीप लांडे यांचा आज उमेदवारी अर्ज दाखल होणार***

*चांदिवली विधानसभा क्षेत्रातील शिवसेना महायुतीचे अधिकृत उमेदवार दिलीप लांडे यांचा आज निवडणूक अर्ज दाखल करण्यात येणार आहे. निवडणूक अर्ज भरण्यासाठी आमदार दिलीप लांडे यांच्या समर्थकांनी विभागात गर्जना सुरु केली आहे. चला फॉर्म भरायला, विजयाचा शंखनाद करायला, विधानसभा निवडणूक 2024 168-चांदीवली विधानसभा मतदार संघाचे शिवसेना,भाजप,राष्ट्रवादी, आरपीआय महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार दिलीप मामा लांडे यांचा मंगळवार दिनांक 29 ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येणार आहे. आमदार दिलीप लांडे निवडणूक अर्ज दाखल करण्यासाठी कुर्ला पश्चिम काजूपाडा छत्रपती शिवाजी मैदान येथून वाजत गाजत, ढोल ताशाच्या गजरात, गुलाल उधळत, सांस्कृतिक पोशाख परिधान करून फटाक्यांची अतिशबाजी करत शिव मंदिर मध्ये जालाभिषेक करून अर्ज भरण्यास जाणार आहेत. यावेळी मोठ्या संख्येने महायुतीचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी रॅलीत सहभागी होणार आहेत.*

# मतदार जनजागृतीसाठी 'पेडल फॉर डेमोक्रसी' सायकल रॅली संपन्न




प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता मतदार जनजागृतीचा एक भाग म्हणून घाटकोपर मध्ये 'पेडल फॉर डेमोक्रसी' ही सायकल रॅली रविवारी काढण्यात आली होती. बृहन्मुंबई महानगरपालिका आणि १७० - घाटकोपर पूर्व विधानसभा मतदारसंघ यांच्या संयुक्त विद्यमाने पहाटे सहा वाजता ही सायकल रॅली आयोजित करण्यात आली होती.

महाराष्ट्र पोलीस दलातील फोर्स वन चे प्रमुख, अतिरिक्त पोलीस महासंचालक कृष्णप्रकाश, समाज कल्याण विभागाचे उपायुक्त प्रसाद खैरनार, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सहायक आयुक्त गजानन बेल्लाळे आणि संबंधित अधिकारी तसेच नागरिक यावेळी उपस्थित होते.

घाटकोपर पूर्व येथील पूर्व द्रुतगती महामार्गापासून सुरू झालेली ही सायकल रॅली विविध भागातून नेण्यात आली. सायकल रॅलीत सहभागी स्पर्धकांना विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ 'स्वीप' उपक्रम अंतर्गत मतदान करण्याविषयी शपथ देण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालय विद्यार्थ्यांनी देखील वेगवेगळ्या आशयाचे संदेश फलक झळकावून नागरिकांमध्ये जागृती केली.

## निवडणुकीच्या 8 दिवस आधी बायडेन करणार मतदान

**वॉशिंग्टन :** राष्ट्राध्यक्ष जो बायडेन आज सोमवारी अमेरिकेत मतदान करणार आहेत. बीबीसीच्या म्हणण्यानुसार, माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी गेल्या आठवड्यात मेलद्वारे मतदान केले होते. शनिवारपर्यंत 4.2 कोटींहून अधिक लोकांनी निवडणुकीपूर्वीच मतदान केले आहे. NBC नुसार, अमेरिकेतील सुमारे 70% लोक यावर्षी निवडणुकीपूर्वी मतदान करू शकतात. निवडणुकीपूर्वी मतदान करण्याच्या या प्रक्रियेला प्री पोल व्होटिंग असे म्हणतात. अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी 6 नोव्हेंबरला (भारतीय वेळेनुसार) मतदान होणार आहे. अमेरिकेतील निवडणुकीला आता अवघे 8 दिवस उरले आहेत. अशा परिस्थितीत ट्रम्प आणि कमला हॅरिस या दोघांचा निवडणूक प्रचार अंतिम टप्प्यात आहे. ट्रम्प यांनी रविवारी न्यूयॉर्कच्या मॅडिसन स्क्वेअर गार्डनमध्ये शेवटची सभा घेतली. यात ट्रम्प यांच्या पत्नी मेलानियाही सहभागी झाल्या होत्या. यावेळी ट्रम्प यांनी पत्नीसोबत स्टेजवर डान्सही केला.



# भाजप नियोजनबद्धरित्या समाजात द्वेष आणि राग पसरवतोय!

**वृत्तसंस्था**
**वायनाड**

प्रियंका गांधी यांनी सोमवारपासून वायनाड लोकसभा मतदारसंघातून निवडणूक प्रचाराला सुरुवात केली. राहुल गांधींनी रायबरेलीची जागा निवडल्यानंतर काँग्रेसने प्रियंका यांना वायनाड मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. 20 नोव्हेंबरला येथे निवडणूक आहे. 23 नोव्हेंबरला निकाल लागणार आहे.



वायनाडला पोहोचल्यावर प्रियांकांनी आधी रोड शो केला आणि नंतर मीनांगडीमध्ये रॅली काढली. त्या म्हणाल्या की, आपण ज्या युगात आहोत त्या काळात केंद्रात भाजपचे सरकार आहे. हे सरकार नियोजनबद्धरित्या समाजात द्वेष आणि राग पसरवते. अल्पसंख्याकांवर होणारे हल्ले आपण पाहिले आहेत, मणिपूरमध्ये काय झाले ते सर्वांनी पाहिले आहे.

त्या म्हणाल्या की, आपल्या राज्यघटनेतील मूल्ये सातत्याने पुसली जात आहेत. सार्वजनिक कल्याणाऐवजी पंतप्रधानांच्या खास मित्रांच्या कल्याणाची धोरणे आखली जात आहेत. शेतकरी आणि आदिवासींच्या जमिनी बड्या उद्योगपतींना दिल्या जात आहेत. प्रियंका म्हणाल्या की, माझा भाऊ राहुलसारखे होणे सोपे नाही. त्यांना 10 वर्षे भाजपकडून क्रूर हल्ल्यांचा सामना करावा लागला. त्यांच्याबद्दल खोटे पसरवले गेले. जागतिक राजकारणात हे घडणे खूप वेगळे आहे.

प्रियंकांनी सांगितले की, उमेदवारी दाखल केल्यानंतर त्या एका सैनिकाला भेटल्या. मी त्यांच्या घरी गेले. त्यांच्या आईला भेटले. मी त्यांची मुलगी असल्यासारखे त्या सैनिकाच्या आईने मला मिठी मारली. यानंतर त्यांनी मला पुष्पहार दिला. आणि आईला द्या असे सांगितले. मला मिठी मारली.

त्या म्हणाल्या की, माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर 6-7 महिन्यांनी मदर तेरेसा माझ्या आई सोनिया गांधींना भेटण्यासाठी आमच्या घरी आल्या. त्यावेळी मी 19 वर्षांची होते. मदर तेरेसा मला भेटल्या, मला ताप आला होता. त्यांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला. त्यांनी माझ्या हातात पुष्पहार दिला.

त्यांनी सांगितले की, लग्नानंतर मी दिल्लीतील मदर तेरेसा सिस्टर्स (NGO) मध्ये रुजू झाले. तिथे लहान मुलांना इंग्रजी आणि हिंदी शिकवले. तिथे त्या बाथरूम आणि फरशी साफ करायच्या आणि जेवण बनवायच्या.

# शिंजो आबेंचा पक्ष 15 वर्षांनंतर बहुमतापासून दूर

## जपानमध्ये कोणालाच बहुमत नाही

**वृत्तसंस्था**
**टोकियो**

जपानमधील सत्ताधारी लिबरल डेमोक्रॅटिक पार्टी (LDP) आघाडीला संसदेत बहुमत मिळवता आलेले नाही. एलडीपीला केवळ 191 जागा मिळाल्या आणि 65 जागा गमावल्या. गेल्या 15 वर्षातील पक्षाचा हा सर्वात वाईट परिणाम आहे. एलडीपी आणि त्याचा मित्रपक्ष कोमेटो यांना मिळून 215 जागा मिळाल्या आहेत.

सरकार चालवण्यासाठी युतीला 233 जागा मिळवाव्या लागतील. जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांनी गेल्या महिन्यात पक्षाच्या अध्यक्षपदाची निवडणूक जिंकली, त्यानंतर ते देशाचे पंतप्रधान झाले. यानंतर इशिबाने निवडणूक घेण्याची घोषणा केली होती.

निवडणुकीच्या निकालानंतर जपानी पंतप्रधान म्हणाले की, निवडणुकीचे निकाल त्यांच्या बाजूने लागलेले नाहीत. जनतेने कठोर निवाडा दिला आहे. ते नम्रपणे ते स्वीकारत आहेत, परंतु सध्या ते आणखी पक्ष जोडण्याचा प्रयत्न करत नाहीत.

निवडणुकीपूर्वी जपानी मीडियामध्ये असा दावा केला जात होता की, एलडीपीला बहुमत मिळाले नाही तर पंतप्रधान इशिबा पद सोडू शकतात. असे झाले असते तर ते



दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वात कमी कालावधीसाठी पंतप्रधान म्हणून काम करणारे व्यक्ती बनले असते. मात्र, आपण या पदावर कायम राहणार असल्याचे इशिबाने सांगितले. 2009 नंतर एलडीपीला बहुमत न मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे. बीबीसीच्या म्हणण्यानुसार, बहुमत न मिळण्यामागील कारण म्हणजे एलडीपी नेते अनेक घोटाळ्यांमध्ये वेढलेले आहेत. यामुळेच LDP ची लोकप्रियता सतत घसरत चालली आहे. या वर्षाच्या सुरुवातीला, एलडीपीचे मंजूरी रेटिंग 20% च्या खाली घसरले. LDP खासदारांवर पक्षाला मिळालेल्या राजकीय देणग्यांचा अपहार केल्याचा आरोप होता. खात्यात फेरफार करून त्यांनी पक्षाचे पैसे स्वतःच्या खात्यात वर्ग केले. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर पीएम किशिदा यांनी अनेक कॅबिनेट मंत्री आणि इतरांना त्यांच्या पदारून हटवले होते.

मात्र, यामुळे जनतेचा रोष शांत झाला नाही. यामुळे फुमियो किशिदा यांना पंतप्रधानपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. एलडीपीचा सर्वात मोठा प्रतिस्पर्धी, जपानच्या कॉन्स्टिट्यूशनल डेमोक्रॅटिक पार्टी (CDP) ने चांगली कामगिरी केली. सीडीपी नेते योशिहिको नोडा म्हणाले की, ते सध्याचे सरकार घालवण्यासाठी युती करण्याचा प्रयत्न करत आहेत. सीडीपी आघाडीकडे सध्या 163 जागा असून ते सरकार स्थापनेपासून दूर आहे.

### विक्रमी संख्येने महिला उमेदवार विजयी

*यावेळी महिलांनी विक्रमी मतांनी जपानमध्ये खासदार बनण्यात यश मिळवले आहे. यावेळी 465 जागांच्या सभागृहात 73 महिला विजयी झाल्या. 2021 मध्ये केवळ 45 महिला निवडणूक जिंकू शकल्या.*

पान ९ वरुन

### 2 जागा, 1 कॅबिनेट, ४ महामंडळे...

संचालक पदे, महापालिका जिल्हा परिषदा स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये रिपब्लिक पक्षाला जागा देण्याचे आश्वासन फडणवीस यांनी दिल्याचे केंद्रीय मंत्री आठवले यांनी सांगितले. देवेंद्र फडणवीस यांच्या आश्वासनानंतर रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी नाराजी बाजूला सारून नव्या दमाने महायुतीला विजयी करण्यासाठी प्रचाराला लागावे, असे आवाहन केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी दिले आहे. ते मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे, मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### मी मुख्यमंत्री नाही पण उपमुख्यमंत्री होणार

हसन मुश्रीफ हे पुन्हा एकदा कागलमधून विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. दरम्यान, स्वतःचा प्रचार करत असताना कागलमध्ये आयोजित एका प्रचारसभेत त्यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्रिपदाबाबत भाष्य केलं आहे. मुश्रीफ म्हणाले, "विधानसभा निवडणुकीत महायुती विजयी होऊन आपली राज्यात सत्ता येणार आहे. कारण लाडक्या बहिणींनी तसं ठरवलं आहे. राज्यात पुन्हा एकदा आमची सत्ता आली तर याहीपेक्षा अधिक चांगलं खातं मला मिळणार असून उपमुख्यमंत्रीपद मिळण्याचीही शक्यता आहे."

### खलाशाने तांडेलाचे डोके कापून बोट पेटवली

दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार आरोपी खलाशाची मानसिक स्थिती व्यवस्थित नसल्याचे समजते. त्या बोटीवर 35 ते 40 जण असण्याची शक्यता असून त्या सगळ्यांना वाचवण्यात यश आले आहे. पोलिसांच्या बोटी घटनास्थळी पोहोचल्या असून आग विझविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.तसेच खलाशांना किनारी आणण्यात येत होते. बोटीवर वाद झाल्यास खलाश्यांना नियंत्रित करणे शक्य होत नाही. त्यामुळे खलाशांमध्ये योग्य ताळमेळ असणेही आवश्यक असतो. मात्र मानसिक प्रकृती योग्य नसलेला खलाशी समुद्रात बोटीवरुन नेलाच का, हा प्रश्नही या घटनेने समोर येत आहे.

### आपले सेवा केंद्राचा बोजा ग्रामपंचायतींवर

नकार दिल्याने सेवा केंद्र चालक अडचणीत आले होते. परिणामी, ग्रामपंचायतीच्या कारभारात अडचणी येत होत्या. दरम्यान, राज्य शासनाने 10 ऑक्टोबर 2024 ला मंत्रिमंडळ बैठकीत केंद्रचालक (ग्रामोद्योजक) यांचे मानधन ग्रामपंचायतस्तरावरून अदा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे दरमहा दहा हजार रुपये ग्रामपंचायतीने दोन लाखांच्या आत उत्पन्न असणाऱ्या ग्रामपंचायतींपुढे अडचण अदा करायचे आहेत. केंद्रचालकाची नेमणूक करण्याची कार्यपद्धती व इतर संबंधित बाबी ग्रामरोजगार सेवकांप्रमाणे असणार आहेत. राज्यात 28 हजार 813 ग्रामपंचायतीं आहेत .

# देशात २०२५ पासून जनगणना सुरु होणार

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

देशातील जनगणनेसंदर्भात महत्वाची माहिती समोर आली आहे. केंद्र सरकार २०२५ मध्ये भारताच्या जनगणनेला सुरुवात करण्याची शक्यता आहे. २०२५ मध्ये जनगणनेला सुरुवात केल्यानंतर २०२६ पर्यंत ही जनगणना पूर्ण होण्याचा अंदाज आहे. यासंदर्भात केंद्र सरकारने नियोजन सुरू केलं असल्याची माहिती सांगितली जात आहे. दर दहा वर्षांनी देशातील जनगणना केली जात असते. मात्र. कोरोनाच्या काळात २०२१ ची जनगणना लांबणीवर पडली होती. त्यानंतर आता केंद्र सरकार २०२५ मध्ये जनगणना करणार असल्याची



माहिती समोर आली आहे.

दरम्यान, केंद्र सरकारने या संदर्भात अद्याप अधिकृत कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, पुढील २०२५ या वर्षापासून केंद्र सरकार जनगणनेला सुरुवात करणार असल्याचं सांगितलं जात आहे. जर केंद्र सरकारने २०२५ मध्ये जनगणना करण्यास सुरुवात केली तर २०२६ पर्यंत पूर्ण होऊन त्या जनगणनेचा अंतिम अहवाल २०२६ मध्ये येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे भारताच्या लोकसंख्या आकडा या माध्यमातून समोर येणार आहे. यासंदर्भातील वृत्त इंडिया टुडेच्या हवाल्याने एका इंग्रजी दैनिकानं दिलं आहे.

# बिश्नोईच्या एन्काऊंटरसाठी 1 कोटी 11 लाख 11 हजारांचे बक्षीस

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

लॉरेन्स बिश्नोईचा एन्काऊंटर करणाऱ्यासाठी क्षत्रिय करणी सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राज शेखावत यांच्याकडून काही दिवसांपूर्वी 1 कोटींचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. यानंतर आता 1 कोटींची ऑफर डॉ. राज शेखावत यांनी साबरमती कारागृहात असलेल्या कैद्यांसाठी असल्याचे म्हटले आहे. गुजरातमधील वडोदरा येथून डॉ. राज शेखावत हे क्षत्रिय करणी सेना संघटना चालवतात. त्यांनी आठवड्याभरापूर्वी डॉ. राज शेखावत यांनी गोगामेडी यांच्या हत्येप्रकरणी सध्या चर्चेत असलेला गुंड लॉरेन्स बिश्नोई याच्यावर आरोप करत 1 कोटी 11 लाख 11 हजार आणि 111 रुपये देण्याची घोषणा केली होती. ही ऑफर त्यांनी एन्काऊंटर करणाऱ्या पोलिसांसाठी ठेवली होती. यानंतर आता त्यांनी एन्काऊंटर करण्याची ऑफर कायम ठेवत साबरवती कारागृहातील एखाद्या कैद्याने लॉरेन्स बिश्नोईची हत्या केल्यास त्यालाही 1 कोटी 11 लाख 11 हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे.

# हैदराबादमध्ये फटाक्यांच्या दुकानाला भीषण आग, आठ गाड्या जळून खाक

**हैदराबाद**

हैदराबादमध्ये एका फटाक्यांच्या दुकानाला भीषण आग लागल्याची घटना रात्री 10.30 च्या सुमारास घडली आहे. या आगीत आठ गाड्या जळून खाक झाल्याची माहिती यावेळी पोलिसांनी दिली. तसेच अग्निशमक दलाला आग आटोक्यात आणण्यात यश आले असून, या अपघातात एक रेस्टॉरंट पूर्णपणे जळून खाक झाले आहे. तसेच एक महिला किरकोळ जखमी देखील झाल्याचे पाहायला मिळाले आहे. हैदराबादच्या अबिड्स येथील हनुमान टेकडी भागात असलेल्या पारस फायर वर्क्स फटाक्यांच्या दुकानाला काल रात्री भीषण आग लागली.

# कर्नाटकात 8 कोटी रुपयांसाठी पतीची हत्या

## कोडागु येथील कॉफी इस्टेटमध्ये आढळला मृतदेह

**वृत्तसंस्था**
**कोडागू**

तेलंगणातील एका कॉफी व्यावसायिकाच्या हत्येचे गूढ कर्नाटक पोलिसांनी उकलले आहे. कोडागु येथील एका इस्टेटमध्ये रमेश नावाच्या या व्यक्तीचा मृतदेह जळालेल्या अवस्थेत आढळून आला. या हत्येची उकल करण्यासाठी पोलिसांनी चार पथके तयार केली होती. रमेशच्या दुसऱ्या पत्नीसह तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. 8 कोटी रुपयांची मालमत्ता हडप करण्यासाठी महिलेने पतीची हत्या केल्याचे तपासात समोर आले आहे. त्यानंतर त्याचा मृतदेह 840 किमी दूर नेऊन जाळण्यात आला. वास्तविक रमेशने एक मालमत्ता विकली होती, 8 कोटी रुपये मिळवण्यासाठी त्याच्या पत्नीने त्याच्या हत्येचा कट रचला होता.

पोलिसांनी 500 सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज स्कॅन केले रमेश असे मृताचे नाव असून तो 54 वर्षांचा होता. 8 ऑक्टोबर रोजी कोडागु येथील कॉफी इस्टेटमध्ये पोलिसांना अर्धा मृतदेह सापडल्यानंतर तपास सुरू झाला. पोलिसांच्या चार पथकांनी 500 हून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासले. 10 दिवसांचा तांत्रिक डेटा गोळा केला.

गुन्ह्यात वापरलेल्या कारमुळे पोलीस रमेशच्या घरी पोहोचले. यानंतर पोलिसांनी रमेशची दुसरी पत्नी निहारिका आणि तिचे दोन मित्र डॉ. निखिल आणि अंकुर राणा यांना अटक केली.

# खासदार तेजस्वी सूर्या ठरले 'आयर्नमॅन'

## 8.5 तासांत 113 किमी अंतर कापले

**वृत्तसंस्था**
**पणजी**

भारतीय जनता पक्षाचे बेंगळुरू दक्षिणचे खासदार तेजस्वी सूर्या यांनी आपल्या नावावर एक महत्वाचा विक्रम केला आहे. तेजस्वी सूर्या यांनी आयर्नमॅन ही स्पर्धा पूर्ण केला आहे. त्यामुळे आयर्नमॅन ही स्पर्धा पूर्ण करणारे ते देशातील पहिले लोकप्रतिनिधी ठरले आहेत. गोव्यात रविवारी आयर्नमॅन ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत खासदार तेजस्वी सूर्या यांनी



सहभाग घेत एक खास विक्रम केला आहे. तेजस्वी सूर्या यांनी ही स्पर्धा पूर्ण करत केलेल्या विक्रमाबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचं कौतुक केलं आहे. यासंदर्भात पंतप्रधान मोदी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवरून एक पोस्ट करत तेजस्वी सूर्या यांच्या फिटनेसचेही कौतुक केले आहे.

तेजस्वी सूर्या यांनी गोव्यात आयर्नमॅन स्पर्धेचं चॅलेंज पूर्ण केलं. या स्पर्धेमध्ये २ किमी पोहणे, ९० किमी सायकलिंग करणे आणि २१ किमी धावण्याचा समावेश आहे. तेजस्वी सूर्या यांनी हे संपूर्ण आव्हान फक्त ८ तास, २७ मिनिटं आणि ३२ सेकंदात पूर्ण केलं आहे. ही स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर स्पर्धा खासदार तेजस्वी सूर्या यांनी प्रतिक्रिया देत नंतर आनंद व्यक्त केला आहे. प्रतिक्रिया देताना त्यांनी म्हटलं की, "आयर्नमॅन स्पर्धेचं चॅलेंज पूर्ण करण्यासाठी खूप कठोर मेहनत घेतली." दरम्यान, आयर्नमॅन या स्पर्धेमध्ये देशातील ५० पेक्षा अधिक जास्त खेळाडूंनी सहभाग घेतला होता. मात्र, तेजस्वी सूर्या यांनी ही स्पर्धा यशस्वी पूर्ण करत विक्रम केला आहे.

# राहुल गांधींनी केली सलून चालकाची मदत

**नवी दिल्ली**

राहुल गांधी यांनी रविवारी दिल्लीत सलून चालवणाऱ्या अजित यांना त्यांच्या दुकानासाठी आवश्यक वस्तू पुरवल्या. राहुल यांनी त्यांच्या व्हॉट्सअॅप चॅनेलवर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे, ज्यामध्ये अजित वस्तू खरेदी करत आहेत. राहुल यांनी पोस्टमध्ये लिहिले की, 'मी भारतातील प्रत्येक गरीब आणि मध्यमवर्गीय व्यक्तीला वचन देतो की मी त्यांच्या चेहऱ्यावर हास्य परत आणीन.' राहुल यांचे आभार मानताना अजित म्हणाले, 'राहुल गांधी मला भेटून मदत करतील, असे मला वाटले नव्हते. मला सर्व आवश्यक वस्तू मिळाल्या, कोणतीही कमतरता नाही. राहुल 25 ऑक्टोबर रोजी दिल्लीतील उत्तम नगर येथील अजित यांच्या सलूनमध्ये गेले होते. तिथे दाढी करताना अजित यांच्याशी ते बोलले. राहुल यांनी X वर त्याचा व्हिडिओही शेअर केला होता.

# खासदार पप्पू यादव यांना जीवे मारण्याची धमकी

**वृत्तसंस्था**
**पाटणा**

बिहारचे पूर्णियाचे खासदार पप्पू यादव यांना जीवे मारण्याच्या धमक्या आल्या आहेत. कॉल करणाऱ्याने स्वतःला लॉरेन्स बिश्नोई टोळीचा सदस्य असल्याचे सांगितले आहे. धमकी देणाऱ्या व्यक्तीने पप्पू यादव यांना सलमान खान प्रकरणापासून दूर राहण्याची सूचनाही केली आहे. तो कॉलवर म्हणाला, 'सलमानच्या केसपासून दूर राहा, आम्ही कर्म आणि कांड दोन्ही करतो.'

धमकी देणाऱ्याचा दावा आहे की, 'लॉरेन्स बिश्नोई तुरुंगात



तासाला एक लाख रुपये देऊन जॅमर बंद करून पप्पू यादवशी बोलण्याचा प्रयत्न करत आहे, पण पप्पू यादव फोन उचलत नाही.'

12 ऑक्टोबर रोजी माजी आमदार बाबा सिद्दिकी यांची मुंबईत हत्या झाली होती, त्याची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोई टोळीने घेतली होती. यानंतर पूर्णियाच्या खासदाराने सोशल मीडियावर सांगितले होते की, लॉरेन्स टोळीचा 24 तासांत खात्मा केला जाईल.

गेल्या गुरुवारी पप्पू यादवने बाबा सिद्दिकी यांचा मुलगा झिशान सिद्दिकी यांची मुंबईत भेट घेतली. व्यस्त वेळापत्रकामुळे ते अभिनेता सलमान खानला भेटू शकले नाही. मात्र आपण प्रत्येक परिस्थितीत सलमान खानसोबत असल्याचे खासदाराने आपल्या पोस्टद्वारे म्हटले होते.

# मोदी युद्धावर प्रभाव टाकू शकतात- झेलेन्स्की

## दुसरी युक्रेन पीस समिट भारतात व्हावी; पुतिन यांच्याकडे हजार मुले परत मागितली

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

रशिया-युक्रेन युद्ध संपवण्यात पंतप्रधान मोदींचा मोठा प्रभाव पडू शकतो, असे युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी म्हटले आहे. एका इंग्रजी दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष म्हणाले की, त्यांना दुसरी युक्रेन शांतता शिखर परिषद नवी दिल्लीत व्हावी अशी त्यांची इच्छा आहे. मोदींची इच्छा असेल तर ते हे करू शकतात.

झेलेन्स्की म्हणाले की, मोदी हे लोकसंख्या आणि अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने खूप मोठ्या देशाचे पंतप्रधान आहेत. कोणताही संघर्ष रोखण्यात भारत आणि मोदी यांचा मोठा प्रभाव पडू शकतो. पंतप्रधान मोदी युक्रेन आणि रशिया यांच्यात चर्चा करण्याच्या शक्यतेवर ते म्हणाले की ते नक्कीच करू शकतात.



झेलेन्स्की म्हणाले की, रशियाने हजारो युक्रेनियन मुलांचे अपहरण केले आहे. आमच्या मुलांना परत आणण्यासाठी मोदींनी मदत करावी अशी आमची इच्छा आहे. ते पुतीनला 1,000 युक्रेनियन मुले देण्यास सांगू शकतात, जे आम्ही युक्रेनला परत करू. जर मोदींनी हे केले तर आम्ही आमच्या बहुतेक मुलांना परत आणण्यात यशस्वी होऊ शकतो.

झेलेन्स्की म्हणाले, ब्रिक्स शिखर परिषद अयशस्वी झाली झेलेन्स्की म्हणाले की, रशियातील ब्रिक्स परिषदेत अनेक देशांचे नेते उपस्थित होते, परंतु त्यापैकी बहुतेक ते होते ज्यांच्यावर पुतिन यांचा विश्वास नाही. सौदी अरेबियाला संघटनेत सामील होण्याचे निमंत्रण देण्यात आले होते परंतु ते सामील झाले नाहीत. पुतीन यांना या शिखर परिषदेच्या माध्यमातून जगाचा मोठा भाग आपल्या बाजूने आणायचा होता पण ते तसे करू शकले नाहीत.

संयुक्त राष्ट्रांच्या सरचिटणीस ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होताना झेलेन्स्की म्हणाले की, जर कोणी म्हणत असेल की तो युक्रेन-रशिया युद्धात तटस्थ आहे, तर त्याचा अर्थ तो रशियासोबत आहे. झेलेन्स्की म्हणाले की तटस्थता केवळ रशियाला मदत करते. हल्लेखोर आणि पीडित यांच्यात तटस्थता असू शकत नाही. गेल्या आठवड्यात पंतप्रधान मोदी रशियाच्या कझान शहरात 16 व्या ब्रिक्स परिषदेत सहभागी झाले होते. यादरम्यान मोदींनी रशियाचे अध्यक्ष पुतिन यांच्याशी झालेल्या द्विपक्षीय चर्चेत रशिया-युक्रेन युद्धाचा उल्लेख केला होता. शांततेच्या मार्गानेच समस्या सोडवल्या पाहिजेत, असे ते म्हणाले होते.

# नेतन्याहूंसमोर शेम ऑन यू अशा घोषणा

## हमासच्या हल्ल्यात मारल्या गेलेल्यांच्या स्मरणार्थ कार्यक्रमात घडला प्रकार

**वृत्तसंस्था**
**जेरुसलेम**

इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू रविवारी हमासच्या हल्ल्यात मारल्या गेलेल्यांच्या स्मरणार्थ आयोजित सभेला संबोधित करत होते. यावेळी काही लोकांनी त्यांच्या भाषणात व्यत्यय आणला आणि शेम ऑन यूच्या घोषणा दिल्या. या कार्यक्रमाचे टीव्हीवर थेट प्रक्षेपण होत होते.

घोषणा देणारे लोक हमासच्या हल्ल्यात मारले गेलेल्यांचे कुटुंब होते. किंबहुना, गेल्या वर्षी हमासचा हल्ला रोखता न आल्याबद्दल अनेक लोक नेतान्याहूंना दोष देतात. यामध्ये अशा लोकांचाही समावेश आहे ज्यांच्या कुटुंबातील सदस्यांना हमासने ओलीस ठेवले आहे.



गाझाच्या अल अक्सा शहीद रुग्णालयाचे प्रवक्ते डॉ. खलील अल डकरन यांनी सांगितले की, उत्तर गाझा येथे शनिवारी झालेल्या हवाई हल्ल्यात सुमारे 40 लोक मारले गेले. इस्रायलने उत्तर गाझामधील बीत लाहिया भागातील एका निवासी इमारतीला लक्ष्य केले होते. या हल्ल्यात 80 हून अधिक लोक जखमीही झाले आहेत.

अल डकरन म्हणाले की, या महिन्यात आतापर्यंत उत्तर गाझामध्ये इस्रायलच्या हल्ल्यांमुळे 1 हजारांहून अधिक लोक मारले गेले आहेत. त्याचवेळी, गाझाच्या आरोग्य मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, हा आकडा आणखी वाढू शकतो. रुग्णवाहिकेअभावी सर्वच लोकांना रुग्णालयात पोहोचता येत नाही. मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, इस्रायलने बेघर लोकांसाठी 5 निवारा गृहांनाही लक्ष्य केले आहे.

इस्रायली सैन्याने रविवारी सांगितले की त्यांनी दक्षिण लेबनॉनमधील बिंट जबेल भागात हिजबुल्ला कमांडर अहमद जाफर माटौकला ठार केले आहे. दुसऱ्या दिवशी, सैन्याने मातोकचा उत्तराधिकारी तसेच हिजबुल्लाहचा तोफखाना कमांडर बिंट जबीलला ठार मारले.

याशिवाय आयडीएफने हिजबुल्लाहचे सुमारे 130 रेडी टू फायर लाँचर्सही नष्ट केले आहेत. याशिवाय 160 रॉकेटने सुसज्ज असलेले 4 मोबाईल लाँचरही इस्रायली लष्कराने नष्ट केले आहेत.